सोलापूर तरुण भारत
आसमंत



# भारताचे शक्तिवर्धन

लक्ष्यवेध
**कौस्तुभ वीरकर**

**भारत हा आता आशिया खंडातील तिसरा प्रबळ देश म्हणून नावारुपाला आला आहे. ऑस्ट्रेलियामधील 'लोवी' या संस्थेने नुकताच प्रसिद्ध केलेल्या 'आशिया पॉवर इंडेक्स-२०२४' या अहवालात भारताने जपानला मागे टाकत आशियातील सर्वांत शक्तिशाली देशांमध्ये तिसरा क्रमांक पटकावला असल्याचे म्हटले आहे. या अहवालात राष्ट्राचे मूल्यमापन करताना, आर्थिक शक्ती, लष्करी सामर्थ्य, सांस्कृतिक प्रभाव आणि राजकीय लवचिकता आदी निकषांचा विचार करण्यात आला आहे.**

२०२४ साली 'लोवी' या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणामध्ये भारताने ३९.१ गुण मिळवले असून २०२३ सालच्या कामगिरीमध्ये २.७ गुणांची वाढ झाल्याचे अहवालामध्ये नमूद करण्यात आले आहे. या अहवालानुसार, ऑस्ट्रेलिया, रशिया, दक्षिण कोरिया, इंडोनेशिया आणि मलेशिया हे देश भारताच्या मागे आहेत, तर पाकिस्तान या क्रमवारीत १६व्या क्रमांकावर आहे.

अमेरिकेने ८१.७ गुणांसह प्रथम स्थान कायम राखले असून ७२.७ गुणांसह चीन दुसऱ्या स्थानावर आहे. भारताच्या या स्थान सुधारणेला अनेक घटक कारणीभूत असले तरी, गेले एक दशक भारताने आर्थिक धोरणांत राखलेले सातत्य हे मुख्य कारण मानता येईल. 'कोविड' साथरोगाचा कालखंड लक्षात घेता, गेले एक दशकभर, भारतीय अर्थव्यवस्थेने सातत्याने विकासाची कास धरलेली दिसून येते. गेल्या आर्थिक वर्षातदेखील जगात भू-राजकीय अस्थिरता असतानाही भारताने ८.२ टक्के दराने अर्थव्यवस्थेचा विकास साधला. अर्थव्यवस्थेतील या विकासगतीमुळे या सर्वेक्षणातभारताला ४.२ गुण मिळाले आहेत. त्याचप्रमाणे भविष्यातील संसाधनांबाबत भारताने ८.२ गुण मिळवले असून या प्रकारात भारताला सर्वाधिक तरुण लोकसंख्येचा फायदा मिळाल्याचे दिसते.

भारताच्या लोकसंख्यावाढीचा दर जास्त असून त्यात तरुणांची लोकसंख्या सर्वाधिक आहे. त्यामुळे भारताला जगातील 'तरुण लोकसंख्येचा देश' म्हणूनच ओळखले जाते. तसेच, जनतेच्या विकासासाठी सरकारने अनेक योजना राबविल्या असून त्याचा फायदा दारिद्र्य निर्मूलनासाठी होत आहे. याउलट, चीन आणि जपान या देशांची अवस्था आहे. आंतरराष्ट्रीय मुत्सद्दी धोरणे आणि राजकारण यांमध्ये भारताचा क्रमांक सुधारला असून गेल्या दशकभरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आंतरराष्ट्रीय धोरणातील दूरदृष्टीचे हे फलित म्हणावे लागेल. आजमितीला भारताचे आंतरराष्ट्रीय संबंध हा चर्चेचा विषय ठरत आहे. एका बाजूला रशिया आणि युक्रेन यांच्यातून अजिबात विस्तव जात नसताना, भारत दोन्ही देशांशी समान अंतर राखून सर्वप्रकारचे व्यवहार आणि शांततेसाठी मध्यस्थी करताना दिसतो, तर दुसरीकडे इस्रायल आणि पॅलेस्टाईन युद्धामध्येही भारताने आंतरराष्ट्रीय दबावाला बळी न पडता, आवश्यक अशी कठोर आणि स्वतंत्र भूमिका लीलया घेतली आहे. तसेच भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदांमध्ये वेळोवेळी सक्रिय सहभाग घेतला असून, तिथेही आपली विश्वबंधुत्वाची संकल्पना अतिशय प्रभावीपणे मांडली आहे. तसेच 'जी-२०'सारख्या जागतिक परिषदांचे यशस्वी आयोजनदेखील भारताने करून दाखवले आहे. या सगळ्याचा प्रभावदेखील या अहवालातील स्थानवृद्धीमध्ये दिसून येतो. तसेच सैन्यशक्तीमध्येही भारताने सुधारणा केली असून, आज आशिया खंडात भारतीय सैन्य हे एक शक्तिशाली सैन्य म्हणून ओळखले जात असल्याचेही या अहवालामध्ये अधोरेखित करण्यात आले आहे.

२०१४ मध्ये देशात सत्तांतरानंतर सत्तेवर आलेल्या मोदी सरकारने भारतीय सैन्याच्या आधुनिकीकरणाचा सपाटाच लावला. एकीकडे दहशतवादाला समूळ उखडून टाकण्यासाठी सैन्याला खुली सूट देताना, दुसरीकडे सैन्याच्या आधुनिकीकरणाला वेग दिला. 'आत्मनिर्भर भारत' योजनेंतर्गत अनेक जागतिक दर्जाच्या शस्त्रांची निर्मिती भारतात होऊ लागल्याने, त्याचा अर्थव्यवस्थेलादेखील मोठा फायदा झाला.

तसेच दुसऱ्या देशांबरोबर करार करताना, तंत्रज्ञान हस्तांतरणदेखील भारताने करून घेतले. त्यामुळे अर्थव्यवस्था आणि सैन्याचे आधुनिकीकरण एकमेकांना पूरक ठरले आहे. त्यामुळे याचा फायदा सैनिकांच्या विकासाच्या योजना राबविण्यासाठीही होत आहे. तसेच गेल्या काही वर्षांत भारताने अर्थसंकल्पात सैन्यासाठी भरघोस निधीची तरतूदही केली आहे. यामुळेच, सैन्याचे मनोबलही वाढलेले असल्याने, या सगळ्याचे प्रतिबिंब हे अशा जागतिक दर्जांच्या अहवालातून स्पष्ट होते. त्यामुळे भारताचा तिरंगा खऱ्या अर्थाने जगात सन्मानाने डौलत आहे.

# 'ती'चे दिवस... अश्विनातले!

**सीमोल्लंघनाच्या फेऱ्यात एका टोकाला जीवन आणि दुसऱ्या टोकाला मृत्यू का असतो, हे मग आपोआप कळतं. माहिती असणं आणि कळणं यात फरक असतो. तसाच फरक डोळे असणं अन् नजर असण्यात असतो. हा फरक कळला की, मग आपण बघत नाही, दर्शन घेतो. दिसायला फक्त सगुण साकार रूपच दिसू शकतं, पण दर्शन मात्र, निर्गुण निराकाराचंही घेऊ शकतो... हे ज्ञान आपल्याला व्हावं म्हणून त्या वेदप्रतिपाद्येने किती विविध स्त्रीरूपांत जन्माला येऊन किती अनंत लोक जन्माला घालण्याच्या यातना स्वीकारल्या, याची जाणीवही होते...**



प्रासंगिक
**स्वाती पेशवे**

आपण कितीही गंगेला टेम्सच्या प्रवाहात मिसळण्याचा प्रयत्न केला, तरीही नदीच्या किनाऱ्यांवर वसलेल्या सुपीक मातीचा अन् भाषेचा अनन्यसाधारण असा संबंध असतो. म्हणूनच कालगणना सारखीच असली जगाची, तरीही पृथ्वीच्या प्रदक्षिणांमध्ये सूर्याचे तिला गोंजारणे प्रत्येक प्रदेशात वेगळे असते. सप्टेंबरात टेम्सच्या पाण्याच्या खळखळाटात भोंडल्याची गाणी ऐकू येत नाहीत...


ऋतू त्यांची कूस पालटतात ते नदी आणि म ातीच्या सलगीतूनच. सणवार आणि उत्सवांचा संबंध मातीच्या कुसवण्याशीच असतो. भोंडल्याची गाणी आणि अश्विनातील जगदंबेच्या आरत्या इंग्रजीत अनुवादित करता येतील, पण त्यात ती जान असणार नाही. मातीचा गंध ती ग्रीष्मात तापल्यावरच येतो, बर्फवृष्टीतून माती गंधाळत नाही तसेच शब्दांनाही भावार्थाचे धुमारे फुटत नाहीत. सूर्याचे तापणे ज्यांच्या ऋतुचक्रातच नाही त्यांना 'सनी मॉर्निंग' 'फाईन'च वाटणार आहे. त्यांना अश्विनातील कोवळी उन्हे कळणारच नाही. अश्विनाचे येणेच असे पावसाच्या जाण्यासोबत असते. म्हणून अश्विन अलवार हिरवा असतो आणि त्याला पाणीदार अस्तित्व असते.

पाऊस जसा येतो तसे त्याला जावेच लागते. तसा निरोपाचा क्षण प्रत्येकाच्याच वाट्याला येतो; पण पावसासारखे अलवार निघून जाणे कुणालाच जमत नाही. नव्याने श्रीमंत झालेल्या रानाच्या आणि ओसंडून वाहणाऱ्या नद्यांच्या खाणाखुणा तो ठेवून जातो. देणाऱ्याने मागायचे नसते. तसे ते कुण्याच देणाऱ्याला जमतही नाही; पण परतणाऱ्या पावसाला रानाने कितीही हळवी साद घातली अन् नदीचे पाणी खळखळाट करीत आडवे झाले, तरी पाऊस मागे वळूनही बघत नाही. जाणाऱ्या पावसाने मागे वळून बघितले, तर त्याची निर्मिती धुवून निघण्याचा शाप त्याला आहे. आश्विनातली उन्हं भरजरी असतात. तितकीच ती कोवळीदेखील असावी, अशी अपेक्षा असते.

या दिवसांतली पहाट फुलपाखरांच्या पंखावरून झाडांच्या पानांना जोजवीत येते. रात्र दवात भिजून रानभर पसरली असते. पानांना, फुलांना, हरिततृणांना अन् बरड जमिनीलाही गंध येतो. दवाचं मग अत्तर होतं. अश्विनात धरणीमाय आपल्या लेकरांवर संपन्नतेचा हिरवा पदर धरते. कुठल्याही पाखराची चोच रिकामी राहू नये, ही तिची तळमळ असते. या दिवसात मग बुजगावण्यांही हळवं होतं. आपल्या मडक्याच्या डोक्यावर पाखरांना बिनदिक्कत घरटं बांधू देतं. चोचीत चोच घालून पक्ष्यांनी रान उष्टावल्याशिवाय ते निसवतच नाही. पाखरंही मग काही दाणे किड्यामुंग्यांसाठी सोडतात. गावानेही कुठलीच झोळी दीनवाणी होऊ नये, याची काळजी घ्यावी. तिला तुम्ही पाणी द्या, ती हिरवळ देते. तिला तुम्ही दाणे द्या, ती कणसं देते. अश्विनातले दिवस हे 'ती'चे दिवस असतात. या दिवसांत ती कुठल्या ना कुठल्या रूपांत तुमच्या घरी-दारी निनादत राहते. ती माहेरवाशीण म्हणून भुलाबाईच्या पावलांनी येते माहेरपणाला. त्या आधी भादव्यात ती नवतेचं दान घेऊन नव्हाळीच्या पिकांचा कोवळा गोडवा घेऊन तुमच्या घरात येते तेव्हा लक्ष्मी म्हणून तुम्ही तिची पूजा करता. पाऊस सरत असताना ती सगुण साकार होते. बैलाच्या पावलांनी घरात येते, तेव्हा दारची तुळस मंजिऱ्यातून लाजते. श्रमिक तिची पूजा करतो अन् ती श्रमवेड्यांची आराधना करते. तिचे शब्द मंत्र होतात अन् गाण्यांच्या आरत्या होतात. त्या आर्त तर असतातच, पण लयबद्धदेखील असतात. मग रानाचे मंदिर होते, घरांचा गाभारा होतो. परड्यांवरही मग लवलवत्या पात्यांची हिरवळ अगदी नेटकेपणानं उभी असते. रान, पिकानं डवरलं असताना ती परडीवरच्या इवल्याशा हिरवळीच्या प्रेमात पडते. नवथर नवयौवना होते. हे तिचेच दिवस असतात म्हणून तिच्या व्यथा, वेदना सुंदर होतात. त्यांची गाणी होतात, लेणी होतात. तरीही तिच्या वेदनांची आसनी घराघरांत मांडली जाते. वेदनेच्या बाहुल्यांची पूजा करण्याची प्रथाच त्यामुळे पडली आहे. त्या बाहुल्यांचा प्राण मग घराघरांत प्रत्येकीच्या श्वासात भिनतो. ती मग एकटी राहात नाही. ती त्याची होते. त्यांची वेदनेची कहाणी सोनवर्खी असते. हळद-कुंकवाने दाटलेली असते. आटून केशरी झालेल्या दुधासारख्या त्या व्यथा घोटीव असतात. तिची पावलं माहेरच्या अश्विनातून सासरच्या वैशाखापर्यंत पडतात. कोवळेपणाला पुरुषी करडेपणाची झिलई चढलेल्या उन्हावर थंडी हळुवारपणे आपला अंमल प्रस्थापित करते, ते आश्विनातले दिवस असतात. आपलं अंगण पाखरांच्या स्वाधीन करून आपणही आश्विन शुद्ध प्रतिपदेला सीमोल्लंघनाला निघावं. अंबामाताही याच वेळी सीमोल्लंघनाला निघत असते. आईचं घरात नसल्यावर लेकरांनी घराच्या मोहात पडण्याचं तसंही कारण नसतं. सभोवताली मोहक वातावरणाचं जाळं विणलं जात असताना निर्मोही होण्याचं हे दिवस सांगत असतात. या दिवसांना राखीच्या घट्ट प्रेमाचा वेढा असतो. बहिणीच्या स्नेहाचे अनुबंध विणले जात असतात अन् आईच्या ममतेचं उबदार पांघरूणही या दिवसांवर असतं. गाव सोडून निघणं तसं जिवावर येतं नेहमीच; पण या दिवसांत डोळ्यांत विजयाची ऊर्मी दाटून आली असल्यानं पावलांत वारं संचारतं अन् हातांना शस्त्र चालविण्याचा सराव करावा लागत नाही. अंबेचं सीमोल्लंघनाला निघणं म्हणजे सौंदर्यानं आपलं सामर्थ्य स्थापित करणं. धर्माच्या मर्यादा पाळण्यासाठी आदिसीता लक्ष्मणरेषा ओलांडते.

(पान ४ वर)

# 'क्वाड' देणार चीनला शह



**पंतप्रधान मोदी यांचा अमेरिका दौरा अनेक अर्थांनी महत्त्वाचा ठरला आहे. एकीकडे अमेरिकेत निवडणुकीचे वारे सुरू आहेत. कदाचित तेथे सत्ताबदलही होईल. मात्र, सत्ताबदल झाला तरी 'क्वाड'चा अजेंडा कायम राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. हिंद-प्रशांत क्षेत्रामधील नवी समीकरणे आणि चीनचा वर्चस्ववाद या पार्श्वभूमीवर 'क्वाड'ची ही बैठकदेखील महत्त्वाची ठरली आहे.**

वेधक
**पार्थ कपोले**


पंतप्रधान नरेंद्र मोदी नुकतेच अमेरिका दौऱ्यावर होते. यादरम्यान त्यांनी 'क्वाड' बैठकीत भाग घेतला. यामध्ये सदस्य देशांमध्ये अनेक गोष्टींवर एकमत झाले. या सहमतीने 'क्वाड' सदस्य देशांदरम्यान मलबार युद्ध सराव होणार आहे. चीनची जीवनरेखा असलेल्या ऊर्जा व्यापार मार्गावर (समुद्र मार्ग) प्रभाव टाकण्यासाठी हा नौदल सराव होत आहे.

चीन समुद्रात आपले वर्चस्व गाजवत आहे. हे थांबवण्यासाठीच 'क्वाड'ची स्थापना करण्यात आली आहे. चीनने नेहमीच दक्षिण चीन समुद्रावर दावा केला आहे आणि तो आपल्या इच्छेनुसार कोणत्याही क्षेत्रात प्रवेश करतो व तेथे आपल्या विस्तारवादी कारवाया सुरू करतो. त्यामुळेच चीनला वेसण घालण्यासाठी 'क्वाड' देश सज्ज झाले आहेत. चीनच्या आक्रमक धोरणाविरुद्ध चार देश सामरिक आणि मुत्सद्दीदृष्ट्या एकजूट आहेत. याच क्रमाने, चार देशांचे नौदल बंगालच्या उपसागरात 'मलबार-२४' नाविक सरावाचे आयोजन करणार आहेत. हा सराव ८ ऑक्टोबर ते १८ ऑक्टोबरदरम्यान बंगालच्या उपसागरात होणार आहे. चीनचा ८० टक्के ऊर्जा व्यापार मार्ग या समुद्रातून जातो. हा सराव दोन टप्प्यांत होणार आहे. पहिल्या टप्प्यात युद्ध सरावाची रणनीती आणि आव्हाने यावर चर्चा केली जाईल, तर दुसरा 'सी-फेज.' यामध्ये त्या रणनीतींना प्रत्यक्ष युद्ध सरावाचे स्वरूप दिले जाईल.

नौदलाला समग्र प्रशिक्षण दिले जाईल. चारही देश लांब पल्ल्याच्या गस्त घालणाऱ्या 'पी८आय' सरावात सहभागी होतील. या सरावात विनाशिका, मध्यम आकाराच्या युद्धनौका, फ्रिगेट्स, क्षेपणास्त्र नौका, हेलिकॉप्टर, सपोर्ट व्हेसल्स आणि पाणबुड्या एकत्रितपणे सराव करणार आहेत.

(पान ४ वर)

# कॉग्निटिव्ह युद्ध : सद्यस्थिती आणि उपाययोजना



विश्लेषण भाग-२

राष्ट्ररक्षा
ब्रि. हेमंत महाजन
भ्र. ९०९६७०१२५३

सतता काळात ना युद्ध ना शांतता, शस्त्रांपेक्षा मनावर हल्ले करणारी शस्त्रे अधिक प्रभावी ठरत आहेत. कॉग्निटिव्ह युद्धात माहिती, विचार आणि भावना यांचा वापर करून समाजातील लोकांच्या विश्वासावर, निर्णयांवर आणि कृतींवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला जातो. कॉग्निटिव्ह युद्ध म्हणजे मानवी मनाची शक्ती वापरून युद्ध लढणे. यात सोशल मीडिया, फेक न्यूज, प्रोपोगंडा, सायबर हल्ले आणि इतर अनेक तंत्रांचा वापर केला जातो. या युद्धात सत्य आणि असत्य यांची ओळख पटवणे कठीण होते. कॉग्निटिव्ह युद्धामुळे समाजात विभाजन निर्माण होते, राजकीय अस्थिरता निर्माण होते, मानवी हक्कांचे उल्लंघन होते. लोकशाही प्रक्रियेवर परिणाम होतो. सायबर हल्ल्यांमुळे आर्थिक नुकसान होते.

**चीन-अमेरिकेचे कॉग्निटिव्ह युद्ध**

चीन सोशल मीडियाचा वापर करून आपल्या शेजारील देशांमध्ये अस्थिरता निर्माण करतो. चीन कॉग्निटिव्ह युद्धाचा वापर करून आपल्या राजकीय आणि आर्थिक स्वार्थांना साध्य करण्याचा प्रयत्न करतो. अमेरिकादेखील कॉग्निटिव्ह युद्धाचा वापर करत आहे. अमेरिका आपल्या विरोधकांना बदनाम करण्यासाठी, आपल्या मित्रांना एकत्र करण्यासाठी कॉग्निटिव्ह युद्धाचा वापर करत आहे.

**कॉग्निटिव्ह युद्धाचे विविध प्रकार**

कॉग्निटिव्ह युद्ध हे अत्यंत व्यापक आणि गतिशील क्षेत्र आहे.

**प्रोपोगंडा:** ● सफेद प्रोपोगंडा : स्रोत स्पष्टपणे दर्शवून माहितीचा प्रसार करणे. ● **ग्रे प्रोपोगंडा:** माहितीचा स्रोत अस्पष्ट ठेवून प्रसार करणे. ● **काळा प्रोपोगंडा :** चुकीची माहिती पसरवून शत्रूला बदनाम करणे. **फेक न्यूज:** ● बनावट बातम्या पसरवून लोकांना गोंधळात टाकणे. ● सोशल मीडियाचा व्यापक वापर करून फेक न्यूजचा प्रसार करणे. **सायबर हल्ले:** ● कॉम्प्युटर सिस्टम नेटवर्क हॅक करून माहिती चोरून नेणे. ● सायबर स्पेसमध्ये अफवा पसरवणे.

● **सायबर स्पेसमध्ये अस्थिरता निर्माण करणे. सोशल इंजिनीअरिंग:** ● लोकांची भावना आणि विश्वास यांचा फायदा घेऊन त्यांना फसवणे. ● फिशिंग, स्पीयर फिशिंग आणि इतर तंत्रांचा वापर करून लोकांची माहिती चोरणे. **डीप फेक :** ● व्हिडीओ आणि ऑडीओ क्लिप्समध्ये बदल करून लोकांना फसवणे. ● राजकीय नेत्यांचे खोटे व्हिडिओ बनवून त्यांची प्रतिमा खराब करणे.

**कॉग्निटिव्ह युद्धाचा सामना कसा करावा?**

●माहितीचा चिकित्सकपणे विचार करा: कोणत्याही माहितीला स्वीकारण्यापूर्वी तिची सत्यता पडताळून पहा. ● विभिन्न स्रोतांमधून माहिती घ्या: एकाच स्रोतावर अवलंबून राहू नका. ● सोशल मीडियाचा वापर काळजीपूर्वक करा: फेक न्यूज पसरवणाऱ्या पेज आणि ग्रुप्सना फॉलो करू नका. ● आपल्या कॉम्प्युटर आणि मोबाईलची सुरक्षा करा. ● लोकांमध्ये माहितीचा चिकित्सकपणे विचार करण्याची क्षमता विकसित करा.

**भारताकडून उपाययोजना आणि अंमलबजावणी**

● भारताने सत्य माहितीचा प्रसार करण्यावर भर द्यावा. ● सोशल मीडियावर फेक न्यूज पसरवणे रोखण्यासाठी कठोर नियम असावेत. ● भारताने आपल्या सुरक्षा यंत्रणांना कॉग्निटिव्ह युद्धाचा सामना करण्यासाठी प्रशिक्षित करावे. ● भारताने इतर देशांसोबत मिळून कॉग्निटिव्ह युद्धाचा सामना करण्यासाठी एकत्रितपणे काम करावे.

**कॉग्निटिव्ह युद्धापासून बचाव करण्याकरिता काय करावे?**

भारताचे शत्रू कॉग्निटिव्ह युद्धाच्या तंत्राचा वापर करीत आहेत. कॉग्निटिव्ह युद्धाचे विविध अंग वापरून भारताच्या आंतरिक सुरक्षा, सामाजिक एकता आणि आंतरराष्ट्रीय प्रतिमा यावर परिणाम करण्याचा प्रयत्न केला जात आहे. या संदर्भात भारताने नेमके काय केले पाहिजे?

**खोटी माहिती, अफवा पसरवणे**

माध्यमांद्वारे आणि सोशल मीडियावर प्रभावी प्रचार मोहीम राबवून जनमत आणि विचारांवर नियंत्रण ठेवण्याचाप्रयत्न केला जातो. भारताच्या शत्रू देशांद्वारे सोशल मीडियावर आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्सवर खोटी माहिती आणि अफवा पसरवल्या जातात. यामध्ये धार्मिक, वांशिक आणि प्रादेशिक संघर्षांना हवा देऊन सामाजिक अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. भारतातील हिंसाचाराच्या घटनांचे विकृत स्वरूप दाखवून वातावरण तापविणे.

**बचाव: मजबूत तथ्य पडताळणी यंत्रणा:** सरकारने आणि खाजगी संस्थांनी एकत्र येऊन तथ्य पडताळणी यंत्रणा मजबूत करावी. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर खोटी माहिती ओळखून ती लगेच दूर करण्यासाठी कडक उपाययोजना करायला हव्यात. आपल्या महत्त्वाच्या सामरिक आणि युद्ध संबंधित माहितीचे संरक्षण करण्यासाठी अत्यंत दक्ष राहावे. शत्रूच्या हल्ल्यांपासून माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करा. जनतेला खोटी माहिती ओळखण्याबद्दल आणि त्यापासून सावध राहण्याबद्दल जागरूक करणे आवश्यक आहे.

**समाजात फूट पाडणे**

भारताच्या शत्रू देशांनी धार्मिक आणि प्रादेशिक अस्मिता वापरून देशातील समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न केला आहे. विशेषत: धार्मिक तणाव आणि जातीय संघर्ष वाढविण्यासाठी खोट्या अफवा पसरवल्या जातात.

**बचाव : सामाजिक एकता मजबूत करणे:** सरकारने आणि स्थानिक नेतृत्वाने एकत्र येऊन समाजातील सर्व घटकांमध्ये एकता वाढविण्यासाठी कार्य करायला हवे. विविधतेतून एकता हा भारताचा मुख्य आधार आहे आणि त्याला धोका पोहोचविणाऱ्या घटकांना निष्प्रभ करण्यासाठी सर्व स्तरांवर प्रयत्न करायला हवेत. धर्म आणि समुदायांना समान वागणूक देणारी धोरणे आखणे; जेणेकरून शत्रूला फूट पाडण्याची संधी मिळणार नाही.

**भारताच्या जागतिक प्रतिमेला तडा देणे:**

शत्रू देश भारताच्या जागतिक प्रतिमेला धक्का देण्यासाठी खोटी माहिती पसरवतात. भारताच्या मानवाधिकारांविषयी चुकीच्या कथा आणि घटकांची निर्मिती करून जागतिक स्तरावर भारताची बदनामी करण्याचा प्रयत्न केला जातो.

**बचाव: सक्रिय सार्वजनिक धोरणे :** भारताने आपल्या जागतिक प्रतिमेला कायम ठेवण्यासाठी जागतिक मंचांवर आपली बाजू मांडली पाहिजे. बाहेरच्या देशांमध्ये भारतीय दूतावासांना अधिक सक्रिय केले पाहिजे; जेणेकरून खोटी माहिती पसरवणाऱ्यांना त्वरित प्रत्युत्तर दिले जाईल.

**जागतिक मीडिया प्लॅटफॉर्म्सवरील उपस्थिती वाढविणे:** भारताने आपले दृष्टिकोन आणि धोरणे स्पष्ट करण्यासाठी आंतरराष्ट्रीय माध्यमांमध्ये अधिक सक्रिय भूमिका बजावली पाहिजे. जागतिक समुदायाच्या विचारांवर आणि राजकीय दृष्टिकोनांवर प्रभाव टाकण्यासाठी सार्वजनिक धोरणांच्या माध्यमातून कार्य करा. प्रयत्नांत आपली बाजू अधिक सकारात्मक दाखवा. सायबर हल्ले आणि तंत्रज्ञानावर हल्ले शत्रू देश भारताच्या माहिती तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधांवर सायबर हल्ले करून महत्त्वाची माहिती चोरण्याचा आणि तिचा वापर करून भारताला गोंधळात टाकण्याचा प्रयत्न करत आहेत.

**बचाव : सायबर सुरक्षा मजबूत करणे :** भारताने आपल्या सायबर संरचनेची सुरक्षा वाढवावी. सायबर हल्ल्यांना रोखण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा आणि सायबर सुरक्षा तज्ज्ञांची एक प्रभावी टीम तयार करावी.

**सतत प्रशिक्षण आणि अपडेट्स :** सरकारी आणि खाजगी क्षेत्रातील माहिती तंत्रज्ञान संबंधित कर्मचाऱ्यांना सतत प्रशिक्षण देऊन त्यांना नवीनतम हल्ले आणि धोरणांविषयी अपडेट ठेवणे गरजेचे आहे. सायबर हल्ल्यांद्वारे शत्रूच्या माहिती तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधांवर आघात करा, ज्यामुळे त्यांच्या संगणकीय प्रणालीवर परिणाम होतो आणि शत्रूच्या निर्णय क्षमतेवर प्रभाव पडतो. उद्देश आहे, शत्रूला माहितीच्या बाबतीत गोंधळात टाकणे.

**मनोवैज्ञानिक ऑपरेशन्स**

शत्रू सामान्य नागरिकांमध्ये मानसिक दबाव निर्माण करण्यासाठी मनोवैज्ञानिक ऑपरेशन्सचा वापर करतो. याद्वारे जनतेला भयभीत करण्यासाठी आणि त्यांचा आत्मविश्वास खालावण्याच्या प्रयत्नात असतो. प्रचार साहित्य, चित्रफिती आणि संदेशांचा वापर करून मनःस्थितीवर हल्ला केला जातो. शत्रू देश मनोवैज्ञानिक हल्ल्यांचा वापर करून भारतीय सैनिकांचे, जनतेचे मनोधैर्य खालावण्यासाठी, समाजातील लोकांमध्ये असंतोष पसरविण्यासाठी प्रयत्न करतात.

**बचाव: मनोबल वाढविणारी धोरणे :** सरकारने आणि लष्कराने सैनिकांचे, जनतेचे मनोधैर्य कायम राखण्यासाठी तणाव व्यवस्थापनाच्या आणि प्रेरणादायी कार्यक्रमांची अंमलबजावणी करावी.

**माध्यमांवर कडक नियंत्रण:** ज्या माध्यमांद्वारे मनोवैज्ञानिक हल्ले होतात त्यावर नियंत्रण ठेवून त्यांना वेळीच प्रत्युत्तर देणे महत्त्वाचे आहे. निष्कर्ष शत्रू देशांनी कॉग्निटिव्ह युद्धाच्या तंत्राचा वापर करून भारताच्या आंतरिक सुरक्षेला आणि एकतेला आव्हान दिले आहे. याला उत्तर देण्यासाठी भारताने एक व्यापक धोरण आखणे गरजेचे आहे, ज्यात सायबर सुरक्षा, माहिती व्यवस्थापन, जागरूकता आणि सामाजिक एकतेवर भर दिला जाईल. धोरणांची अंमलबजावणी जास्त महत्त्वाची आहे. कॉग्निटिव्ह युद्ध हा एक गंभीर धोका आहे. आपल्याला या युद्धाचा सामना करण्यासाठी सतर्क आणि सज्ज राहणे आवश्यक आहे. (लेखक संरक्षणविषयक तज्ज्ञ आहेत.)

---

# संतांनी सांगितलेला आचारधर्म 'आचार प्रथमो धर्मः'

संत प्रबोधन
प्रा. डॉ. हरिदास आखरे

जीवन जगताना प्रत्येकाला कोणते ना कोणते कर्म करावे लागते. कर्माचे विविध प्रकार असले, तरी सर्व कर्मांमधून व्यक्तीने जे कर्म विहित असेल तेच करावे, असा उपदेश भगवान श्रीकृष्णाने गीतेमध्ये पार्थाला हेतुरहित कर्म सांगताना केला आहे. हा कर्मयोग सर्वांसाठी अनुकरणीय आहे. आध्यात्मिक जीवनामध्ये रामनाम उच्चारास महत्त्व आहे. त्याचप्रमाणे जीवनामध्ये उचित शब्द वापरणे व योग्य कर्म करणे आवश्यक आहे.

संत तुकारामांनी पुढील अभंगातून सांगितले आहे की, आपला आचार, विचार व व्यवहार योग्य असल्याशिवाय आपण समाधानी व शांत जीवन जगू शकत नाही. आपल्या दैनंदिन व्यवहारातही नैतिकता, सचोटी व परोपकारी वृत्ती असेल, अंतःकरणामध्ये भूतदया असेल तर आपण परमपदाचा जो मोक्ष आहे त्या पदाला पोहोचू. वैराग्याचे आत्मबळ प्राप्त करून देण्याचे सामर्थ्य अशा सात्त्विक, नैतिक व परोपकारी आचारामध्ये आहे. समाजामध्ये जीवन जगताना कोणती आचारसंहिता पाळावी, यासंबंधी संत तुकाराम सांगतात **जोडोनिया धन उत्तम वेव्हारे । उदास विचारे वेच करी।। उत्तमची गती तो एक पावेल। उत्तम भोगील जीव खाण।। परउपकारी नेणे परनिंदा। परस्त्रिया सदा बहिणी माय।। भूतदया गाई पशूंचे पालन। तान्हेल्या जीवन वनामाजी।। शांतिरूपे नव्हे कोणाचा वाईट। वाढवी महत्त्व वडिलांचे।। तुका म्हणे हेचि आश्रमाचे फळ। परमपद बळ वैराग्याचे।।** (तु. गा. २८५४) योग्य वेळी योग्यच गोष्ट करावी. आहार, विहार, निद्रा योग्य प्रमाणात असल्यास जीवनामध्ये चैतन्य निर्माण होईल. चित्तशुद्धीसाठी कर्ममार्गाचे आचरण साधकाला करावेच लागत असल्याने निषिद्ध कर्म त्यागून विहित कर्माचे सदासर्वकाळ आचरण करावे. जसे कर्म तसेच फळ निश्चित मिळेल. आरशात जसे पाहावे तसे प्रतिबिंब दिसते. प्रत्येक कर्माचेही फळ तसेच मिळते. समाजशिक्षणाचे व्रत घेतलेल्या कीर्तनकार लोकशिक्षकांनाही त्यांचे आचरण कसे असावयास पाहिजे यासंबंधीची काटेकोर आचारसंहिता संत तुकाराम विशद करतात. ती अशी, **जेथे कीर्तन करावे। तेथे अन्न न सेवावें।। बुका लावू नये भाळा। माळ घालू नये गळा।। तटावृषभासी दाणा । तृण मागू नये जाणा ।। तुका म्हणे द्रव्य घेती। देती ते ही नरका जाती ।।** (तु. गा. ३०७४) जमिनीवर पाऊस सर्वत्र जवळपास सारखाच पडतो. परंतु, बीजाप्रमाणेच फळाची निर्मिती होते. त्यामुळेच निष्काम बुद्धीने कर्म करावे. त्यातूनच उपासनेचा प्रारंभ होतो. सूर्योदय झाल्यावर अनेक मार्ग आपल्याला दिसतील. परंतु, आपल्याला ज्या गावी, ज्या स्थळी जायचे आहे त्या गावाच्या मार्गाने गेल्यास त्याच गावी पोहोचता येते. या गुणधर्मानुसार उपासनेचे, विविध धर्मांचे वेगवेगळे मार्ग असले, तरी सर्वांचा देव, सर्वांभूती परमेश्वर एकच आहे. त्या एकाच परमेश्वराच्या ठायी अभेद दृष्टीने निष्ठा ठेवावी व आचार मात्र जो उचित आणि सर्वमान्य असेल तोच आचरावा. कर्मे जी हेतुरहित आणि समाजमान्य आहेत तीच करावीत. आता तरी पुढे हाचि उपदेश। नका करू नाश आयुष्याचा।। सकळांच्या पाया माझे दंडवत। आपुलाले चित्त शुद्ध करा।। हित तें करावें देवाचे चिंतन। करूनिया मन एकविध।। तुका म्हणे लाभ होय तो व्यापार । करा काय फार शिकवावे।। (तु. गा. १०१) संत ज्ञानेश्वर प्रस्तुत ओवीतून तेच सांगतात. म्हणोनी जें जें उचित । आणि अवसरें करोनी प्राप्त । ते कर्म हेतुरहित । आचर तूं । (ज्ञानेश्वरी ३/७८) संत तुकारामांनी आचारसंहिता मांडली आहे, ती अशी १) विरक्त व कर्मत्याग केलेल्या पुरुषांकरिता ज्ञानयोग सांगितला आहे. २) अविरक्त प्रापंचिक लोकांसाठी कर्मयोग मांडलेला आहे. ३) ज्यांच्याकडे विषयाचा त्याग करण्याची हिंमत नाही, अशा सामान्य माणसांकरिता उपासना किंवा भक्तियोग प्रतिपादन केलेला आहे. लोकांनी कर्मकांड न करता परमेश्वरप्राप्तीकरिता काय केले पाहिजे, ते संत तुकाराम सांगतात, **साधकाची दशा उदास असावी। उपाधि नसावी अंतर्बाही।। लोलुपता काय निद्रेतें जिणावें। भोजन करावे परमित।। एकांती लोकांती स्त्रियांशी वचन। प्राण गेल्या जाण बोलो नये । तुका म्हणे ऐसा साधनी जो राहे। तो चि ज्ञान लाहे गुरुकृपा ।।** (तु. गा. २८३६) संत एकनाथांनीही अशीच साधकाची आचारसंहिता त्यांच्या भागवतातून मांडली आहे. आपल्या आयुष्यात निषिद्ध कर्माचा लवलेशही येऊ न दिल्यामुळे मनुष्य भयापासून मुक्त होतो व आत्मजागृतीचा ठेवा मिळवतो. वैराग्य म्हणजे आत्मज्ञानरूपी सूर्याचा उदय होय. विहित कर्म हाच आपल्या कल्याणाचा मार्ग आहे. त्या मार्गानेच जीवनात मार्गक्रमण करणे हेच त्याच्यापर्यंत पोहोचण्याचे गमक आहे. यापेक्षा श्रेष्ठ त्याची सेवा नाही. स्वधर्माचे आचरण हाच मुख्य धर्म होय. ज्याचे जे विहित कर्म नियोजिलेले आहे, ते त्याने मनोभावे करणे, हेच भगवंताचे स्मरण आहे. अशा कर्मयोगाचे आचरण केल्यास निःसंशय त्याची प्राप्ती झाल्यावाचून राहत नाही. स्वधर्माचरण केल्याने ते कर्म ईश्वरार्पण होते. रज तमाचा लोप होऊन शुद्ध, सात्त्विक गुणांची वृद्धी झाल्यावर आत्मस्वरूपाचे ज्ञान होते. संकल्प व फलाशाविरहित निष्कर्मता प्राप्त होते. फलाशा व अहंकार सोडून निर्विकल्प स्वधर्माचरण हेच माझे भजन. त्यायोगे मी प्रसन्न होऊन भक्तांना विवेक, वैराग्य, ज्ञान देतो. त्या ज्ञानाने त्याचे मन शुद्ध होऊन त्याला माझी परमभक्ती लाभते. त्या परमभक्तीने माझी प्राप्ती होते, असे भगवंत उद्धवाला म्हणाले.



स्वधर्मानुसार कर्माचरण केल्याने वैराग्य वाढते. त्यायोगे ईश्वराच्या सर्वात्मकपणाचे ज्ञान, ज्ञानाने भक्ती, भक्तीने सुख वाढत जाऊन अंती ईश्वरप्राप्ती होते. निष्काम कर्माने वासनांचा लय होतो. ज्ञानी पुरुषाचे सर्वच कर्म फलेच्छारहित असल्यामुळे ते निष्काम कर्म होते. त्याची सर्व क्रिया भगवंताकरिताच असते. त्याचा विषयच मुळी भगवंत झालेला असतो. निष्काम कर्म केल्याने ब्रह्मस्वरूप झालेल्या भक्तांचे कर्मही ब्रह्मस्वरूपच होते. (मराठी संतांचा आध्यात्मिक विचार -डॉ. शंकर चतुरकर, पृ. ७४ वरून) भगवंताच्या नित्य चिंतनाने निष्काम कर्म घडते. भक्तीवाचून निष्काम कर्म होत नाही. आत्मप्राप्तीकरिता परमार्थ साधनेत भक्ती अखंड अनुस्यूत आहे. स्वधर्मकर्माचरणाचे फळ म्हणजे ईश्वरप्राप्तीशिवाय कशाचीही इच्छा धरू नये.


(पान ६ वर)

---

## किताबे बहुत-सी पढी होगी तुमने..

# एक चिरंतन उपेक्षित - सिने-साहित्य...

सिनेजगत
देवेंद्र प्रभुणे



चित्रपट माध्यमास लक्ष्यित रसिकवर्ग साक्षर असण्याची आवश्यकता नसते. दृक-श्राव्य बोध-इंद्रिये सुव्यवस्थित असणारा कोणीही व्यक्ती चित्रपटाचा आस्वाद घेऊ शकतो. म्हणूनच चित्रपट जे जनसामान्यांपर्यंत पोहोचलेले सर्वात प्रभावी माध्यम आहे. अधिक जमेची बाजू म्हणजे चित्रपटास जन्मताच चिरंतनत्वाचे वरदान आहे. रसिकांच्या बदलत्या मनोवृत्ती व आयूनुसार चित्रपटाचे आकलन करण्याची सुविधा चित्रपट प्रदान करतो. आशियायी देशांमध्ये चित्रपट माध्यम अतीव लोकप्रिय होण्यामागे जी अनेकविध कारणे आहेत, त्यात उपरोल्लिखित कारण हे प्रधान आहे. असे निदर्शनास आले आहे की, जशीजशी बौद्धिक व आर्थिक पातळी वृद्धिंगत होत जाते, तसेतसे व्यक्तीवर असणारा प्रभाव कमी कमी होत जातो.

अगोदरच बऱ्याचदा ऊहापोह केल्यानुसार चित्रपट हे कला व शास्त्र यांच्या मनोहारी संगम! तसेच हे माध्यम पूर्णत: व्यावसायिक माध्यम आहे. असे गमतीने म्हणतात की, 'बिन पैशाचा तमाशा होऊ शकतो, बिन पैशाचा चित्रपट होऊ शकत नाही!' भारतासारख्या खंडप्राय व शतकानुशतके मौखिक परंपरांमधून ज्ञान-प्रसार करणाऱ्या देशात औपचारिक साक्षरता प्रारंभापासून फार कमी होती. विशेषत: स्वातंत्र्यपूर्व काळात साक्षरता दर हा दयनीय होता व त्यातही, महिलांची साक्षरता अतिशय कमी होती. अशा प्रतिकूल वातावरणातही चित्रपटास वाहून घेतलेली नियतकालिके व सिनेमा हा गंभीर अध्ययनाचा विषय मानून केलेले लेखन व त्याचाच परिपाक म्हणून प्रकाशित झालेली पुस्तके हा भारतातील चित्रपट-प्रभाव व अभिरुची संवर्धनाचा एक लखलखीत पैलू आहे. भारतात सिनेपत्रकारितेची व चित्रपटास वाहिलेले नियतकालिक प्रकाशित होण्याचा प्रारंभ बंगाली भाषेत झाला. ते वर्ष होते १९२०. 'बिजोली' नावाचे हे नियतकालिक कोणत्या स्वरूपाचे होते, चित्रपटाचा त्याचा अभ्यास विषय काय होता तसेच याचे संपादक कोण होते याविषयी आज फारशी माहिती उपलब्ध होत नाही. पण उपलब्ध माहितीनुसार, हे नियतकालिक नलिनी कांता सरकार, बारींद्रकुमार घोष, सच्चिदानंद सेनगुप्ता, अरुण सिंग व दिनेश रंजन दास यांच्या संयुक्त मालकीचे होते तसेच प्रबोधकुमार संन्याल हे संपादन करीत असत, असा पुसटसा उल्लेख आढळतो. अर्थात, या नियतकालिकात चित्रपटास संपूर्ण स्थान नव्हते. खऱ्या अर्थाने, संपूर्णत: चित्रपटास वाहून घेतलेले चित्रपट नियतकालिक म्हणजे १९२४ साली प्रारंभ झालेले 'मौज मजा' हे गुजराती भाषेतील मुंबई येथून प्रकाशित झालेले नियतकालिक. जे. के. द्विवेदी यांनी हे नियतकालिक सुरू केले होते. एक बाब या संदर्भात लक्षात येते की, तो मूकपटांचा काळ होता त्यामुळे चित्रपट अखिल भारतवर्षात प्रदर्शित होण्यात अडचण येत नसे. तद्वतच भाषिक चित्रपटसृष्टीचा उद्गम पर्यायाने झाला नव्हताच. चित्रपटाची कथा व अभिनय आणि चित्रपटसृष्टीतील घडामोडी याच या नियतकालिकाच्या केंद्रस्थानी होत्या. १९३१ साली भारतातील पहिला बोलपट 'आलमआरा' प्रदर्शित झाला व चित्रपट माध्यमाने भारतीय समाजात आपला सर्वंकष प्रभाव निर्माण करण्यास प्रारंभ केला. त्याचबरोबर, विविध भाषिक चित्रपट निर्माण होण्यासही प्रारंभ झाला. या पृष्ठभूमीवर हिंदी भाषेतील चित्रपट सर्वात प्रभावशाली व महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त करते झाले. हिंदी भाषेतील व मुख्यत्वे हिंदी भाषेतील चित्रपटांचा व चित्रपटसृष्टीचा समग्र आढावा घेणारे पहिले नियतकालिक 'चित्रपट' दिल्ली येथून प्रकाशित होऊ लागले. ऋषभचरण जैन हे या नियतकालिकाचे संपादक होते. १९३५ हे वर्ष चित्रपट पत्रकारिता व नियतकालिके यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे भरले. बंगाली भाषेतील 'रूपरेखा', तामिळ भाषेतील 'सिनेमा उलगम' व चित्रपट नियतकालिकांसाठी दर्जा निश्चितीचे मापदंड निर्धारित करणारे भारतीय चिटपटसृष्टी विशेषत: हिंदी चित्रपटसृष्टीचा बहुआयामी व सूक्ष्म आढावा घेणारे बाबुराव पटेलांचे, इंग्रजी भाषिक 'फिल्म इंडिया' हे नियतकालिक याचवर्षी प्रकाशित होण्यास सुरुवात झाली. त्याकाळी १ रुपया अशी प्रचंड किंमत असूनही फिल्म इंडिया मासिकाचा खप लक्षणीय होता. बाबुराव पटेलांची निरपेक्ष, तटस्थ व कर्मकठोर समीक्षक वृत्ती फिल्म इंडिया मासिकाची प्रतिष्ठा व दबदबा निर्माण करण्यास कारणीभूत होते. मुख्य म्हणजे बाबुराव पटेल यांचे इंग्रजी भाषेवर अद्भुत प्रभुत्व होते व इंग्रजी भाषा शिकण्यासाठी अनेक जण आवर्जून फिल्म इंडिया मासिक वाचत. त्याचबरोबर बाबुराव पटेलांच्या समीक्षेनुसार चित्रपट व त्यातील कलावंतांचे मूल्य व स्थान निश्चित होत असे! १९३९ सालापासून सुरू झालेले द्वितीय विश्वयुद्ध व तद्नंतर अंतिम चरणात आलेला भारताचा स्वातंत्र्यलढा याचा भारतीय चित्रपटसृष्टी व चित्रपट पत्रकारिता यांच्यावर लक्षणीय प्रभाव पडला. १९४७ साली भारताच्या फाळणीमुळे चित्रपटसृष्टीवर दूरगामी परिणाम झाले. चित्रपट कलावंतांनी आपआपल्या धार्मिक मान्यतेनुसार व भविष्याचा अदमास घेऊन आपआपले देश निश्चित केले. बिनीचे बहुसंख्य मुस्लिम कलावंत पाकिस्तानात स्थलांतरित झाले. तर, बहुसंख्य हिंदू कलावंतांना निरुपाय म्हणून भारतात आश्रय घ्यावा लागला. संपूर्ण स्थिरता प्राप्त होईस्तोवर चित्रपटसृष्टी व पर्यायाने चित्रपट पत्रकारिता सुषुम्नावस्थेत होती. १९५० च्या दशकात पुनश्च चित्रपट पत्रकारिता आपल्या पूर्वीच्या उत्साहाने कार्यरत झाली. १९५१ साली इंडियन एक्सप्रेस वृत्तसमूहाने आपल्या 'स्क्रीन' साप्ताहिकाचा शुभारंभ केला तर पुढच्याच वर्षी शुभारंभ झालेल्या बेनेट कोलमन कंपनीच्या सुपरिचित व सुप्रतिष्ठित 'फिल्म फेअर' नियतकालिकाने चित्रपट पत्रकारिता व लेखन यांची परिमाणे बदलून टाकली. १९५३ साली 'फिल्म फेअर' पुरस्कारांची सुरुवात करून 'फिल्म फेअर' नियतकालिक उच्चभ्रू वर्गात मान्यता मिळविणारे पहिले नियतकालिक ठरले.


(पान ६ वर)

यशासाठी


डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

# वृत्ती संशोधनाची कास विकासाची

१ डॉ. वॉटसन शेरलॉक होम्सचा चांगला मित्र होता. त्याच्या अतुलनीय निरीक्षण आणि विश्लेषण पद्धतीचा भक्त होता. लंडनमध्ये घडलेल्या अनेक गुन्ह्यांच्या तपासणी कामात जेव्हा पोलिसांनी हार मानली होती तेव्हा शेरलॉक होम्सने त्याच्या धारदार बुद्धीच्या जोरावर खऱ्या गुन्हेगारांचा शोध घेऊन पोलिसांना व निरपराध लोकांना मदत केली होती. होम्सच्या विलक्षण व वैज्ञानिक सूक्ष्म पद्धतीने त्याने शत्रूंवर मात केली होती. अनेक रहस्यमय घटना व गुन्ह्यांच्या तपासणी कामात डॉ. वॉटसनने होम्सला मदत केली होती. लग्न झाल्यावर जवळपास चार महिन्यांनंतर आज डॉ. वॉटसन होम्सला भेटायला त्याच्या बेकरस्ट्रिटवर असलेल्या घरी आला. शेरलॉक होम्सने डॉ. वॉटसनला बसायला सांगितले. त्याच्या सवयीनुसार त्याने क्षणात वॉटसनचे निरीक्षण केले व म्हणाला, ''तुला लग्न मानवलेलं दिसतंय. तुझे साडेसात किलो वजन वाढलंय.'' वॉटसन म्हणाला, ''होय, माझे सात किलो वजन वाढलंय.'' होम्स पुढे म्हणाला, ''नुकताच घोड्याच्या तबेल्यात भेट दिलेली दिसतेय तसेच तू या आठवड्यात अनेक वेळा ओला झाला आहेस. तुझ्याकडे नोकरी करणारी मुलगी नीट काम करत नाहीय.'' डॉ. वॉटसन म्हणाला, ''तुझे हे अचूक वर्णन ऐकून तू चेटूक करणारा आहेस असे समजून लोक तुला मारायला तयार झाले असते. ओले कपडे मी बदलले होते. तुला कसं कळलं?'' होम्स म्हणाला, ''केसांवरून! आमच्याकडे नोकरी करणाऱ्या मुलीला तिच्या गलथान कामामुळे नोकरीवरून काढणार आहोत.'' डॉ. वॉटसनचे बोलणे ऐकून होम्स हसला व म्हणाला, ''तुझ्या डाव्या पायातील बुटाला लागलेल्या चिकण मातीत घोड्याची लीद मिसळलेली होती. त्यावरून कळले की, तू घोड्याच्या तबेल्यात पाऊस सुरू असताना गेला होतास. पण बुटाला लागलेला चिखल काढायला तू नोकर मुलीला सांगितला असेल. पण तिने ते काम नीट मन लावून केलं नाही. चिखलाच्या मातीच्या प्रकाराचे परीक्षण करून तू लंडनच्या कुठल्या भागात गेला होता ते सुद्धा सांगता येईल. पुरुष आणि स्त्रिया यांच्या शारीरिक क्षमतेचा प्रभाव त्यांच्या कामावर पडत असतो. चिखल ज्या पद्धतीने काढला आहे त्यावरून ती स्त्री साधारणत: रोड, ठेंगणी आणि २० वर्षांची असावी.'' हे सर्व ऐकून व समजून घेतल्यावर डॉ. वॉटसन म्हणाला, ''होम्स, तू सर्व नीट समजावून सांगितल्यावर मला सर्व कसं सोपी वाटतं, पण तरीही सुरुवातीला मला असे का लक्षात येत नाही?'' त्यावर होम्स म्हणाला, ''सांग, माझ्या ऑफिसमध्ये तू आजपर्यंत किती वेळा आलास?'' डॉ. वॉटसन म्हणाला, ''शेकडो वेळा!''



सर डॉ. आर्थर कॉनन डॉयल सुप्रसिद्ध लेखक व नेत्र-चिकित्सक




शेरलॉक होम्स संग्रहालय

''मग मला सांग, तळमजल्याहून या पहिल्या मजल्यावर यायला किती पायऱ्या चढाव्या लागतात?'' वॉटसन ते सांगू शकला नाही. होम्स म्हणाला, ''सतरा! तू अनेक वेळा पायऱ्या पाहिल्या, चढलास पण त्यांचे निरीक्षण करून मोजल्या नाहीस. कारण सूक्ष्म निरीक्षण करण्याची सवय आपोआप लागत नसते. ती लावावी लागते...'' डॉ. आर्थर कॉनन डॉयल यांचे मेडिकलचे शिक्षण सुरू असताना त्यांना डॉ. जोसेफ बेल नावाचे डॉक्टर शिकवत असत. त्यांची सूक्ष्म निरीक्षण करण्याची हातोटी व त्यावर आधारित अचूक अनुमान करण्याचे शास्त्रशुद्ध कौशल्य तरुण आर्थरच्या मनावर इतके ठसले की, काही काळाने लेखन करताना त्यांनी शेरलॉक होम्स नावाचे जबरदस्त काल्पनिक पात्र तयार केले. चोवीस गोष्टी व एक कादंबरी प्रकाशित झाल्यानंतर त्यांनी त्या पात्राचे एका गोष्टीत मरण दाखवून जेव्हा त्या गोष्टी लिहिणे थांबवले, तेव्हा वाचकांनी व प्रकाशकांनी प्रचंड विरोध केला. प्रकाशकांनी नाही म्हणावे म्हणून डॉ. आर्थर यांनी आपले मानधन खूप वाढवले, पण तरीही त्यांच्या प्रकाशकांनी ते आनंदाने मान्य केले. त्यामुळे शेवटी सर्वांच्या आग्रहामुळे त्यांनी त्यांच्या पुढच्या कथासंग्रहात शेरलॉक होम्स नाट्यमयरीतीने परत येतो असे दाखवून पुन्हा पुढे लिहिणे सुरू ठेवले. शेरलॉक होम्स हे पात्र असलेल्या एकूण ५६ गोष्टी व चार कादंबऱ्या त्यांनी प्रकाशित केल्यात. त्यावर अनेक सिनेमे व सिरियल्स निघाल्यात. त्यांच्या पहिल्याच कथेत लिहिलेल्या '२२१-बी बेकरस्ट्रीट' या लंडनमधील खऱ्या पत्त्यावर काल्पनिक पात्र असूनही शेरलॉक होम्सने वापरलेल्या वस्तूंचे संग्रहालय आहे. त्या पात्राची अजूनही इतकी जबरदस्त मोहिनी कायम आहे! का? कारण शेरलॉक होम्स हे पात्र आणि त्याच्या गोष्टी जरी काल्पनिक असल्या, तरी निरीक्षण करण्याच्या पद्धती, बारकावे आणि त्यावरून अचूक अनुमान कसे काढावे, हे शास्त्र आजही आणि केव्हाही सर्वांना मार्गदर्शक आहे. म्हणूनच शेरलॉक होम्ससारखा विचार कसा करावा? अशीही पुस्तके इंग्रजीत प्रकाशित झाली असून बाजारात तुफान विकल्या जात आहेत.




अनेकांनी तर ही पुस्तके अनेकदा वाचून, शेरलॉक होम्स व डॉ. वॉटसन यांच्या तोंडी नोंदवलेली वाक्ये यावर संशोधन करून त्यावर पुस्तके लिहिली आहेत. 'सीआयए' या अमेरिकेच्या हेरखात्यात प्रत्यक्ष हेर म्हणून काम केलेल्या अनेक अधिकाऱ्यांनी त्या निरीक्षण तंत्रांचा जीवनात प्रत्यक्ष उपयोग केला.

**शेरलॉक होम्सच्या कथांमधून काय शिकायचे?**

१. निसर्गाचे रहस्य सोडवण्याचा प्रयत्न करणाऱ्या शास्त्रज्ञाप्रमाणे, प्रथम त्या समस्येशी संबंधित असलेले सर्व उपलब्ध माहिती व पुरावे गोळा करावेत. २. काही वेळा, आवश्यक असल्यास नवीन माहिती मिळविण्यासाठी प्रयोग करावेत. ३. त्यानंतर सर्वात जास्त-संभाव्य गृहीतकांपर्यंत पोहोचण्यासाठी, समस्याबद्दलच्या उपलब्ध झालेल्या ज्ञानाच्या कक्षेत किंवा त्या संबंधित विज्ञानाच्या प्रकाशात एकूण माहितीचे व पुराव्याचे सर्वेक्षण करावे. ४. आधीच्या गृहीतकात नवीन संशोधनाच्या आधारावर अयोग्य मुद्यांची कपात करून, नेमक्या दिशेचा शोध निश्चित करावा. ५. नंतर नवीन माहिती व पुराव्यांचा संदर्भ घेऊन सिद्धांताची आणखी चाचणी घ्यावी व आवश्यक असल्यास गृहीतके सुधारावीत. ६. जोपर्यंत सत्य बाहेर येत नाही तोपर्यंत चिकाटीने व सखोल बुद्धीने, पूर्ण शक्तिनिशी संशोधन करीत राहावे. ७. सत्य बाहेर येतपर्यंत, आपण काय करतोय, कशासाठी करतोय त्याची गुप्तता पाळावी. ८. संबंधित व्यक्तींची व मुद्यांची शहानिशा केल्याशिवाय सत्य कळतपर्यंत कुणावरही विश्वास ठेवू नये.

२. बालवयापासूनच संशोधक वृत्ती कशी बाणवावी? माझा नातू तीन वर्षांचा असतानाच मी त्याच्यात संशोधक वृत्ती बाणवण्यासाठी खालील काही छोटेछोटे प्रयोग केलेत. त्याचा खूप फायदा झाला. १. छोट्या आकाराच्या गवतावर बारीक पिवळ्या व लाल रंगांची फुले उमलली होती. फुलांच्या पाकळ्या कशा सुंदर आहेत ते बारकाव्यांसह दाखवले; त्यात विविध रंगांची प्रत्यक्ष उदाहरणे देऊन ओळख करून दिली. आणखी कुठे कुठे तशी किंवा वेगळी फुले दिसतात ते शोधण्याचाच खेळ तयार झाला.

२. ऑस्ट्रेलियाच्या टाऊनशिप भागातील घर असल्यामुळे त्या भागात उंच इमारती नाहीत. आखीव रस्ते, रस्त्याला लागून दोन्ही बाजूला देखरेख केलेले लॉन आहेत. सगळी घरे जवळपास एकसारखी आहेत. प्रत्येक घरावर स्वयंपाकघरातील धूर व गरम हवा बाहेर काढण्यासाठी सुंदर नक्षीदार फिरणारी 'चकरी' आहे. रात्री त्या चकऱ्या फिरत नाहीत, पण सकाळी स्वयंपाक सुरू झाला की फिरू लागतात. हे त्याला लक्षात आणून दिले. सुरुवातीला कोणत्या घरावर चकरी फिरते फक्त हे नातू आता चकरी फिरताना पाहून त्यांच्या घरी स्वयंपाक सुरू झाला, हे अनुमान काढायला शिकला. आम्ही लहानपणी खेळायचो तशी दांडीला कागदाचे कोन लावून फिरणारी चकरी त्याच्यासोबत बसून बनवली. विविध रंगीत कागदाच्या पट्ट्या कापून त्या विणून चटई तयार केली. जाड कागदाचे सोफे, पलंग तयार केलेत. घराभोवतीच्या कुंपणाजवळ काळ्या मुंग्यांची एक रांग रोज सकाळी पश्चिम दिशेला नियमित जाताना दिसायची. संध्याकाळी तेथेच मुंग्यांची रांग पूर्वदिशेने परतीच्या वाटेवर दिसायची. त्या मुंग्यांच्या दिशेचा फरक त्याला कळला. मग त्या रोज स्वत:साठी व त्यांच्या बाळांसाठी खाद्य जमा करायला जातात, हे त्याला कळले. सगळे कीटक, पशू-पक्षी अन्न गोळा करायला जातात, हे अनुमान काढणे शिकला. घराजवळ मोठा बगीचा, ज्यात कांगारू, बदक व इतर पक्षी येतात. तिथेच एका बाजूला सुंदर तळे आहे व तिथून जंगल सुरू होते. तेव्हा वेगवेगळ्या पक्ष्यांमध्ये त्यांचे चोचीचे आकार, लांबी, रंग व पंखांचे रंग, पक्ष्यांच्या पायांची लांबी, झाडांमध्ये, हवेच्या वाहण्याच्या दिशेमध्ये कसा फरक आहे, ते त्याला लक्षात आणून दिले. यातून तो पशुपक्ष्यांना ओळखायला तर शिकलाच; शिवाय सर्वात महत्त्वाचा भाग आजूबाजूला असलेल्या सजीव-निर्जीव, स्थिर-चलित दोन्हींचे सतत निरीक्षण करण्याची व त्यातून अनुमान काढण्याची सवयच लागली. शिवाय भेटणाऱ्या लोकांशी नम्रपणे बोलणे, त्यांचे नीट ऐकून मग उत्तर देणे, बोलताना त्यांच्या दिशेने शरीराला वळवून, नीट आय-कॉन्टॅक्ट साधून बोलणे या सवयी लावल्या. खरे तर बालवयात जितक्या जास्त लोकांशी मुलांचा संवाद घडेल तेवढा जास्त आयक्यू म्हणजे बुद्ध्यांक वाढतो. या सगळ्या गोष्टी रोजच्या जीवनाचा भाग केल्यामुळे आई-बाबा, आजी-आबा काय सांगतात ते नीट ऐकण्याची व आज्ञापालनाची सवय मुलांना लावता येते. याच वयात अनेक मुलांना इतर लोकांशी संवाद साधायचीच समस्या असते. पण याप्रकारे आई-वडील, आजोबा-आजींनी मुलांना वेळ दिल्यास त्यांचे भविष्य उज्ज्वल होईल. बालवयापासूनच मुलांमध्ये संशोधक वृत्ती बाणवण्यासाठी फक्त डोळ्यांनी जे दिसतं त्यावरच लक्ष केंद्रित न करता, कानाने विविध आवाज, संगीत-वाद्ये ऐकून त्यातील फरक समजाविणे, जिभेने चव व वस्तूंच्या स्पर्शाने पोत, मऊ-कडक, खरखरीतचोपडेपणा, थंड-गरम तापमान समजणे, विविध नैसर्गिक व कृत्रिम वास ओळखणे याचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. पाचही इंद्रियांद्वारे निरीक्षण, फरक व आकलन करायला करायला शिकवावे; त्यात योग्य सिस्टिम किंवा प्रणाली कशी विकसित करावी? कोणत्या वयात मुलांच्या कोणत्या प्रशिक्षणावर लक्ष केंद्रित करावे? यासाठी पालकांचे प्रशिक्षण आम्ही नेहमीच घेत असतो. पण प्रत्येक कुटुंबातील धार्मिक व सामाजिक वातावरण वेगळे असल्यामुळे कुटुंबानुसार बदल करावे लागतातच. कारण मुलाचे आई-वडील यांचे वय, शिक्षण, स्वभाव, व्यवसाय, अनुभवाच्या कक्षा, सांपत्तिक स्थिती, घर, स्वच्छता, घराच्या भोवतालची वस्ती, दैनंदिन झोपण्याउठण्याच्या वेळा या सगळ्या गोष्टी खूप महत्त्वाच्या ठरतात. बूट-चपलांच्या रस्त्यावर घासल्या जाणाऱ्या विशिष्ट कोन व टाचेच्या गोलाकार भागावरून व चपलांच्या डिझाईनची, रंगांची निवड यावरून माणसाचा स्वभाव ओळखता येतो. बोटांच्या, टाचेच्या दबावखुणांवरून, आकारावरून उंची-वजन कळते तसेच देहबोली, डोळे, आवाज यावरून पारख करता येते. सर्वच क्षेत्रातील विकासासाठी आधी संशोधन करणे आवश्यक आहे. (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत.)



## वाणी अमृताची । मोक्ष देई ।।

बोलण्याचे भान । राखावे सदैव ।।
वाचाळ वैभव । घात करी ।।१।।

अंतरीची भाषा । मौन लिपी जाण ।।
परावाणी मान । विठु कृपे ।।२।।

अहंकार वाढे । अज्ञानाच्या पोटी ।।
ज्ञानीयांच्या ओठी । मितभाष्य ।।३।।

व्यासंगाची ओढ । लागो मज देवा ।।
परी माझ्या जीवा । दंभ नको ।।४।।

आत्म शुद्ध बोली । संत ज्ञानेशाची ।।
वाणी अमृताची । मोक्ष देई ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## रिमझिम

अंधारले नभ, ढग दाटलेले
तरंग उठले, मनोमनी..!
गारवा अंगात, पाऊस भिनला
हळूच शिरला, पानोपानी..!
नदी ओढे नाले, ओतप्रोत झाले
अवखळ चाले, प्रवाहाने..!
रानाच्या वाटेने, दरी नि कपारी
रंगते दुपारी, रिमझिम..!
वृक्ष लता वेली, हिरवे गालीचे
स्वप्न या मनीचे, बहरते..!
रान चिंबचिंब, माती मऊ ओल
अंकुरले खोल, कोंभ नवे!

रघुनाथ सोनटक्के

## पक्षी जगत

वसंतात गात नाही कोकिळा
पिंडास शिवण्या नाही कावळा
चिमण्या आल्या आता सरत
कधी दिसणार नाही आता परत
चिऊ काऊ दिसतील चित्रात
नाही दिसणार ते प्रत्यक्षात
पक्ष्यांच्या कथाही राहिल्या नाही
नाही उरल्या मैना अन् घारी
कधी दिसेल मोराचे नर्तन
कुक्कुटाचे हो होते कर्तन

केयुर देवगडे



# उलाढाल वाढणार, चांदी वधारणार...

**सरत्या आठवड्यामध्ये रोजगार, उद्योग आणि चांदीच्या दराबाबत काही लक्षवेधी बातम्या समोर आल्या. आखाती युद्धामुळे राजस्थानमध्ये तीन लाख युवक बेरोजगार झाले असल्याची पहिली बातमी कोड्यात पाडणारी ठरली. दरम्यान, अन्नसेवा उद्योगात भारताची ७.७६ लाख कोटींची उलाढाल झाल्याचे आकडेवारीमुळे स्पष्ट झाले. याच सुमारास भारत परदेशात कच्च्या तेलाचा साठा करणार असल्याची बातमी पुढे आली.**

अर्थोद्योग

महेश देशपांडे

सरत्या आठवड्यामध्ये रोजगार, उद्योग आणि चांदीच्या दराबाबत काही लक्षवेधी बातम्या समोर आल्या. आखाती युद्धामुळे राजस्थानमध्ये तीन लाख युवक बेरोजगार झाले असल्याची पहिली बातमी कोड्यात पाडणारी ठरली. दरम्यान, अन्नसेवा उद्योगात भारताची ७.७६ लाख कोटींची उलाढाल झाल्याचे आकडेवारीमुळे स्पष्ट झाले. याच सुमारास भारत परदेशात कच्च्या तेलाचा साठा करणार असल्याची बातमी पुढे आली. आणखी एक खास वृत्त म्हणजे चांदी प्रती किलो सव्वा लाख रुपयांवर जाणार असल्याची शक्यता वर्तवण्यात आली.

गेल्या दोन महिन्यांमध्ये राजस्थानमध्ये ८०० हून अधिक कारखाने बंद झाले असून सुमारे तीन लाख लोक बेरोजगार झाले आहेत. जोधपूर जिल्हा तर सर्वाधिक प्रभावित झाला आहे. येथील हस्तकला, कापड, मसाले आणि गवार गम यांसारख्या उद्योगांचे दरवर्षी दोन हजार कोटी रुपयांहून अधिक नुकसान होत आहे. हुथी बंडखोरांच्या सततच्या हल्ल्यांमुळे शिपिंग कंपन्यांनी राजस्थानमधून परदेशात माल पाठवण्याचे भाडे अनेक पटींनी वाढविले आहे. त्यामुळे शेकडो कोटींच्या ऑर्डर्स रद्द करण्यात आल्या आहेत. राजस्थानच्या जोधपूर आणि जयपूरसारख्या शहरांमध्ये तयार होणाऱ्या फर्निचरला परदेशात मोठी मागणी असते. हा व्यवसाय आता ४० टक्क्यांनी घटला आहे. राजस्थानमध्ये जोधपूर, जयपूर, रतनगड आणि सरदारशहर येथून हस्तकलेच्या सर्वाधिक वस्तूंची निर्यात केली जाते. त्याची वार्षिक उलाढाल सहा हजार कोटी रुपयांच्या आसपास आहे. अनेक नामांकित परदेशी कंपन्या येथे दोन महिने अगोदर ऑर्डर देतात. माल तयार झाल्यानंतर बंदरात जातो. नंतर तो शिपिंग लाईनद्वारे (मालवाहू जहाजे) परदेशात पोहोचतो. गेल्या दोन महिन्यांमध्ये हा व्यवसाय ४० टक्क्यांनी घसरला आहे. फक्त ४००० कोटी रुपयांचा व्यवसाय शिल्लक आहे. जयपूर येथील हस्तकला निर्यातदार आणि 'इंडियन एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल ऑफ हॅन्डीक्राफ्ट'चे अध्यक्ष दिलीप वैद्य यांनी सांगितले की, राजस्थानमधील दोन हजार निर्यातदार नोंदणीकृत आहेत. हस्तशिल्पांमध्ये राजस्थान सर्वात जास्त फर्निचरची निर्यात करतो. हुथी बंडखोरांमुळे सध्या ही समस्या निर्माण झाली आहे. येमेनचे बंडखोर किंवा हुथी सुएझ कालव्यातील मालवाहू जहाजांवर सतत हल्ले करत आहेत. हे बंडखोर जहाजांचे अपहरणही करत आहेत. यामुळे मालवाहू जहाजांना मार्ग बदलावा लागत आहे. परिणामी, राजस्थानपासून फ्रान्स-इटली इंग्लंडसारख्या शहरांचे सागरी अंतर दुप्पट झाले आहे. अशा परिस्थितीत मालवाहू कंपन्यांनी दरामध्ये अनेक पटींनी वाढ केली आहे. त्यामुळे राजस्थानमधील ८०० उद्योग बंद पडले आहेत.



दरम्यान, भारतात रेस्टॉरंट उद्योगातील उलाढाल ७.७६ लाख कोटी रुपयांची होईल, असे सांगणारा एक अहवाल समोर आला. या अहवालानुसार, भारतीय अन्न सेवा उद्योगातील सध्याची उलाढाल ५.७ लाख कोटी रुपये असेल, असा अंदाज आहे. २०२८ पर्यंत ती ७.७६ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढेल. अहवालामधील माहितीनुसार भारतात अन्न सेवा उद्योग ८५.५ लाख लोकांना रोजगार देतो. दिल्लीचे लोक डंपलिंग, टॅको या पदार्थांना तसेच दक्षिण भारतीय पदार्थांपेक्षा समोसे, कचोरी, पकोडे, छोले भटुरे आणि कबाब यांना अधिक पसंती देतात. येथे ५१ टक्के लोक रेस्टॉरंटमध्ये फक्त उत्तर भारतीय स्नॅक्स खाण्यास प्राधान्य देतात. गुरुग्राममध्ये ५३ टक्के लोक चायनीज पदार्थ खातात. देशातील २१ शहरांमधील ५,२०० रेस्टॉरंटमध्ये सर्वेक्षण करण्यात आले. या डेटासाठी 'एनआरएआय'ने देशातील २१ शहरांमधील ५,२०० रेस्टॉरंटमध्ये सर्वेक्षण केले आहे. दिल्लीतील ३० टक्के लोक चांगले जेवण घेण्यासाठी रेस्टॉरंटमध्ये जातात. दिल्ली आणि नोएडातील लोक रेस्टॉरंटमध्ये जाणे पसंत करतात. त्याच वेळी गुरुग्रामचे लोक द्रुत-सेवा रेस्टॉरंटमध्ये अधिक जातात. अहवालानुसार, दिल्लीत राहणारे ३० टक्के लोक उत्तम जेवण, २० टक्के लोक फास्ट फूड रेस्टॉरंट्स, १३ टक्के लोक कॅज्युअल जेवण, ११ टक्के लोक फूड कोर्ट आणि ९ टक्के लोक आईस्क्रीम आणि बेक्ड वस्तूंना आणि मिठाई, प्राधान्य देतात. भारतातील अन्न सेवा उद्योग वेगाने वाढत आहे. हे क्षेत्र ८५.५ लाख लोकांना थेट रोजगार देत असून भारतीय तिजोरीमध्ये ३३,८०९ कोटी रुपयांचे योगदान देते.





सध्या भारत सरकार देशाबाहेर कच्च्या तेलाचा साठा करणार असल्याची माहिती मिळाली आहे. भारत चार देशांमध्ये तेलाचे साठे तयार करणार आहे. जपान, दक्षिण कोरिया, सिंगापूर आणि संयुक्त अरब अमिराती या देशांमध्ये तेलाचे साठे तयार करण्याचा भारताचा विचार आहे; मात्र याबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. अंतिम निर्णय घेण्यापूर्वी देशाच्या हिताच्या अनुषंगाने संबंधित स्थान किती व्यावहारिक आहे. या घटकाचा विचार केला जाईल. 'स्ट्रॅटेजिक स्टोरेज'साठी जागा निवडताना गोदामाचे भाडे वाहतुकीच्या खर्चापेक्षा जास्त होणार नाही, याची पूर्ण काळजी घेतली जाईल. भारत देशाबाहेर कच्च्या तेलाचा साठा करण्याचा पर्याय पाहण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधीही भारताने अमेरिकेसोबत असा करार केला होता. २०२० मध्ये, भारत आणि अमेरिकेने स्ट्रॅटेजिक पेट्रोलियम रिझर्व्हसंदर्भात एक करार केला होता. या करारात अमेरिकेत भारतीय तेल साठवण्याच्या शक्यतांचाही विचार करण्यात आला होता. दरम्यान, आणिबाणीच्या स्थितीत कोणतीही अडचण निर्माण होऊ नये म्हणून भारताने सावध पवित्रा घेतला आहे. दरम्यान, येत्या काही दिवसांत चांदीची चमक आणखी वाढू शकते. लवकरच चांदीची किंमत १ ते १.२५ लाख रुपये प्रती किलोपर्यंत जाऊ शकते. 'ब्रोकरेज हाऊस'ने आपल्या अहवालात गुंतवणूकदारांना किमती घसरल्यास चांदी खरेदी करण्याचा सल्ला दिला आहे. 'मोतीलाल ओसवाल फायनान्शिअल सर्व्हिसेस'ने चांदीबाबतचा त्रैमासिक अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यात गुंतवणूकदारांना घट झाल्यावर चांदी खरेदी करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. या 'ब्रोकरेज हाऊस'ने चांदीच्या किमतींबाबत आपल्या जुन्या लक्ष्य किमतीत सुधारणा केली आहे. मोतीलाल ओसवाल यांनी चांदीची जुनी लक्ष्य किंमत एक लाख रुपयांवरून सव्वा लाख रुपये प्रती किलो केली आहे. अहवालात 'ब्रोकरेज हाऊस'ने म्हटले आहे, की, हे लक्ष्य १२ ते १५ महिन्यांत गाठले जाऊ शकते. अलिकडच्या काही महिन्यांमध्ये चांदीच्या किमतीत ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. चांदीची कोणतीही घसरण ही खरेदीची संधी म्हणून वापरली पाहिजे. ८६,००० ते ८६,५०० रुपये ही चांदीची प्रमुख आधार पातळी आहे. चांदी स्लो मूव्हरच्या टॅगमधून बाहेर आली आहे आणि यावर्षी किमतीत मोठी वाढ झाली आहे. अमेरिकेतील कमजोर आर्थिक डेटामधून धातूंना पाठिंबा मिळत आहे. चांदीची देशांतर्गत आयात वाढली असून २०२४ मध्ये चार हजार टनांपर्यंत पोहोचली आहे. चीनमधील वेगवान आर्थिक वाढीमुळे, औद्योगिक धातूंच्या मागणीत वाढ झाल्यामुळे चांदीच्या किमती वाढू शकतात. (लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)

# 'चार नगरांतले माझे विश्व' एका शास्त्रज्ञाच्या जडणघडणीतील शैक्षणिक संदर्भ

**जयंत विष्णू नारळीकर हे भारतातील एक महत्त्वाचे शास्त्रज्ञ म्हणून ओळखले जातात. असामान्य बुद्धिमत्ता लाभलेल्या शास्त्रज्ञाची आत्मकथा म्हणजे 'चार नगरांतले माझे विश्व' हा २०१२ मध्ये प्रकाशित झालेला आणि २०१४ मध्ये साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झालेला ग्रंथ होय. प्रेषित, यक्षाची देणगी अशा साहित्य कृतीमुळे नारळीकर शास्त्रज्ञ या जागतिक ओळखीशिवाय साहित्यिक म्हणूनही महाराष्ट्राला परिचित होते. चार नगरांतले माझे विश्व या आत्मकथनात बनारस, केंब्रिज, मुंबई आणि पुणे या चार शहरांमध्ये लेखकाने जे अनुभव घेतले, त्या काळात या घटना घडल्या या सर्वांचा आढावा दिसून येतो. जागतिक कीर्तीच्या शास्त्रज्ञाच्या आत्मकथनामध्ये खरे तर पान आणि पान, शब्द आणि शब्द हा शिक्षणाचे महत्त्व सांगणार आहे.**


साहित्य शिक्षण
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

जयंत नारळीकर यांचे आजोबा वासुदेवशास्त्री हे संस्कृतचे पंडित आणि प्रवचन काय होते, त्याशिवाय त्यांचे आजोबा शाळेत शिक्षक होते. लेखकाचे वडील वासुदेवशास्त्री यांच्या मृत्यूनंतरही शिकत राहिले, मॅट्रिकच्या परीक्षेत चौथा नंबर मिळवून मुंबईत बी. एस. सी. परीक्षेत प्रथम आले. बनारस हिंदू युनिव्हर्सिटी प्राध्यापक आणि गणित विभागाचे प्रमुख म्हणून ते वयाच्या २४ व्या वर्षी झाले. त्यांची निवड करताना ज्येष्ठ समाज सुधारक मदन मोहन मालवीय यांची शिक्षण विषयक आवड, सजग दृष्टिकोन इत्यादीवर सुद्धा लेखकाने प्रकाश टाकला आहे. मात्र, त्या काळात संस्थानिक राजे शाळा आणि विद्यापीठांना देणगी देताना डि. लीटसारख्या पदव्या स्वतःच्या नावापुढे मिळवून घ्यायचे.

जयंत नारळीकर यांची आई सुद्धा शिक्षित घराण्यात आलेली होती, त्यांचे सर्वच मामा स्कॉलर म्हणून ओळखले जात. त्यातही त्यांचा वसंता मामा युनिव्हर्सिटी गोल्ड मेडल मिळवणारा होता हे विशेष. १९४२ मध्ये डॉक्टर राधाकृष्णन यांनी कुलगुरू या नात्याने विद्यापीठाच्या आवारात पोलिसांनी पाऊल ठेवू नये अशी भूमिका घेतली होती हे सांगत असताना परीक्षेच्या वेळी हॉलमध्ये विद्यार्थी काही गडबड करते म्हणून त्यांच्या बंदोबस्तासाठी पोलिसांचे मागणी करणारे शिवाय दीक्षांत समारंभासाठी सुद्धा पोलिसांची मदत घ्यावी लागते, असे काही प्रसंग सांगून वर्तमान पिढीतील शिक्षण आणि पूर्वीचे शिक्षण यात किती तफावत निर्माण झाली आहे ते नारळीकरांनी सांगितले आहे.

आजच्या काळात शाळेतल्या प्रत्येक सीटसाठी प्रचंड संख्येने विद्यार्थी आणि पालक लाईन लावून असतात तसे दिवस लेखकाच्या पहिल्या वर्गाच्या प्रवेशाच्या वेळेस नक्कीच नव्हते.स्वातंत्र्यपूर्व काळात मदनमोहन मालवीय राजेरजवाडे, धनिकाकडून पैसा मागून विद्यापीठ चालवत ही जाणीव असल्यामुळे त्या काळातील शिक्षक अतिशय मर्यादित पगारावर संपूर्ण निष्ठेने काम करत असत. स्वातंत्र्य आल्यावर मात्र आपल्याला कशीही वागायचे मोकळीक मिळाली या भावनेपोटी गुणवत्ता असो नसो स्थानिक व्यक्तींचा भरणा केला पाहिजे. या वृत्तीतून गुरुजणांना आदर्श वाटणाऱ्या व्यक्तींची संख्या कमी होत गेली आणि विद्यार्थ्यांमध्येही अभ्यासू मनोवृत्ती कमी होऊ लागली. सर्व विद्याकी राजधानी अशा प्रेरक ओळी असलेल्या विद्यापीठात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाले, काही प्राध्यापकांना विद्यापीठ सोडावे लागले. हे सांगत असताना आपली शिक्षण व्यवस्था किती भ्रष्ट झाली आहे हे जयंत नारळीकर यांनी दाखवून दिले आहे.

१९४३ मध्ये शाळेत प्रवेश घेतल्यावर शाळेतील आंबट गोड आठवणी लेखकाने आपल्या आत्मकथनात लिहिले आहेत. त्या काळातही जलपान ह्या नावाखाली शाळेतून खाली दिले जाई, आज तर महाराष्ट्रातील सरकारी व्यवस्थापनाच्या सर्व शाळा खिचडी शाळा होऊन बसल्या आहेत. त्या काळातही शिकवणी घेणारे शिक्षक होते पहिला नंबर दुसरा नंबर यासंदर्भात सह कॉलर तर पुस्तकी किडा अशी विशेषण वापरण्याचा तो काळ होता. शाळेत वर्गावर्गात अंताक्षरी प्रतियोगिता होत. वेगवेगळे खेळ घेतले जातात.



आठवीत असताना खेड्यातून आलेल्या शिक्षकाची टिंगल करावी असा विचार त्या काळातही विद्यार्थी करत होते म्हणजे आज एका लक्षणीय कालानंतर सुद्धा आपल्या देशातील शिक्षण व्यवस्था जैसे थे या अवस्थेत आहे की काय असे वाटायला लागते. इयत्ता दहावी असताना लेखकाने पायथागोरसचे प्रमेय वेगवेगळ्या पद्धतीने सोडवून दाखवले तर त्याला शिक्षकांनी शाबासकी दिली. मात्र, परीक्षेत पाठ्यपुस्तकात दिलेल्या सिद्धता लिहाव्या असे आवर्जून सांगितले. त्या तुलनेत त्यांच्या मुलींना अमेरिकेत युक्लिडचा सिद्धांत वेगवेगळ्या पद्धतीने प्रत्यक्ष अनुभूतीतून शिकवणार्या शिक्षिकाबद्दल लेखक अतिशय सकारात्मक बोलतात. आपल्या परीक्षा पद्धतीवर त्या काळापासूनही जे प्रश्नचिन्ह होते ते आजही तसेच आहे.

आज शहरातील मध्यमवर्गाला इंग्रजी शिक्षणाची भुरळ घातली जात आहे. इंग्रजी विषयामुळे पुढील करिअर करता चांगली संधी मिळते असे त्याचे समर्थन केले जाते. मात्र ते योग्य वाटत नाही असे येणार जयंत नारळीकर आवर्जून सांगतात. केमिस्ट्री प्रॅक्टिकलमध्ये २५ पैकी आठ गुण देऊन लेखकाला पहिला येऊ नये म्हणून त्यांचे हितशत्रू म्हणजे त्यांचे काही शिक्षकच प्रयत्न करत होते असा उल्लेख आहे. नारळीकरांनी अगदी स्पष्टपणे करून शाळेतील अनागोंदी दाखवली आहे.

लेखकाची आई सुमती या संस्कृतमध्ये एम. ए. करून कोल्हापुरातील एका शाळेत शिक्षिका होत्या. लेखकाच्या वडिलांनी त्यांना गणित विषयात उत्तेजन दिले तर आईने संस्कृतची आवड जोपासायला सांगितले. आपल्या मुलांनी उन्हाळ्यात सुद्धा काही शिकावे असा त्यांचा हेतू असे. त्यात एका सुट्टीत त्यांना टायपिंग करायला शिकवण्यात आले. १९६२ मध्ये केंब्रिज विद्यापीठात प्रबंध टाईप करताना त्यांना टायपिंगचे शिक्षण कामी आले.

विद्यापीठाच्या नियमानुसार त्यावेळी धर्म हा विषय सर्वांना कंपल्सरी शिकवला जायचा. हा विषय शिकवणारे प्राध्यापक धर्माच्या विचारधारांची माहिती देण्याऐवजी कर्मकांडाबद्दल बोलत असत. लेखकाच्या मते शालेय अभ्यासक्रम निदान प्राथमिक शाळेत तरी विद्यार्थ्यांच्या मातृभाषेतून शिकायला मिळायला हवा. विद्यापीठात वेगवेगळ्या वयोगटासाठी भगवद्गीतेवर परीक्षा घेतल्या जात नारळीकरांना दोन वेळा गीता पुरस्कार मिळाला. त्या काळात गणितासारखे विषय इंग्रजी व हिंदी दोन्ही माध्यमातून बनारसमध्ये शिकवले जात. बनारसमधील आपल्या वास्तव्यात लेखकाने जे अनुभव लिहिले आहे. त्यात त्यांचे शैक्षणिक जीवालाच मोठ्या प्रमाणात दिसून येते. केंब्रिज शहरांमध्ये शिक्षण शिक्षणासाठी गेल्यावर तेथील शैक्षणिक संदर्भ लेखकाने मोठ्या प्रमाणात आपल्या आत्मकथनात लिहिले आहेत. त्या काळात नोबेल पुरस्कार विजेते अमर्त्यो सेन संपर्कात आले. अर्थातच त्यावेळी ते विद्यार्थी दशेत होते.

जयंत नारळीकर पीएचडी करत असताना पहिल्या वर्षासाठी पैशाची तरतूद कशी करावी याचा विचार करत. १९३० मध्ये लेखकाच्या वडिलांना मिळाले टायसन हे मेडल त्यांच्या वडिलांनंतर कोणाही भारतीयाला मिळाले नव्हते. त्यांच्या नंतर हे मेडल जयंत नारळीकर यांनाच मिळाले. विक्रम साराभाई यांचे शिक्षण आहे. केंब्रिजमध्ये झाले होते. जयंत नारळीकरांच्या वडिलांना मिळालेली न्यूटन शिष्यवृत्ती मिळण्यासाठी सुद्धा त्यांनी प्रयत्न केले. मात्र, काही चुकीचे पायंडे पडू नये म्हणून त्यांनी तो अर्ज मागे घेतला. रॉयल ग्रीनीच ऑब्झर्वेटरी या वेधशाळेत प्रत्येक विद्यार्थ्याला एक मार्गदर्शक खगोलशास्त्रज्ञ असे असे जेव्हा लेखक सांगतात.

तेव्हा पाश्चात्त्य शिक्षण प्रणाली आपल्यापेक्षा किती पुढे आहे ते लक्षात येते. मात्र, ब्लार्नी या किल्लयात असलेल्या दगडाचे चुंबन घेतले की वक्तृत्व शक्ती वाढते अशी आख्यायिका आपल्याला जगाच्या पाठीवर प्रत्येक कोपर्यात अंधश्रद्धा नांदते असे म्हणण्यास बाध्य ठरते. जयंत नारळीकर यांनी आपल्या संशोधनाला वेळ देता यावा म्हणून काही अटी शर्तीसह मिळणारी सुद्धा टाळली असे उल्लेख या आत्मचरित्रात आलेले आहेत. यावरून विशिष्ट ध्येयाने झपाटल्यावर लहान थांब्यावर थांबायचं नसते, अशी विचारसरणी लेखकाची होती असे दिसून येते.

भारतात अजमेर येथे गव्हर्नमेंट कॉलेजच्या विद्यार्थ्यांसमोर नारळीकरांनी दिलेले भाषण शिक्षणमंत्री छागला यांच्यासोबत त्यांचे मैत्री पूर्ण संबंध, लालबहादूर शास्त्री यांच्यासोबतची भेट, नोबेल विजेते सी. व्ही. रामन यांच्यासोबत भेट अशा प्रसंगाबाबत लिहिताना त्या व्यक्तींच्या व्यक्तिमत्वाबाबतही त्यांनी भाष्य केलेले दिसून येते. मात्र, गणित विभागातल्या जुन्या शिक्षकांना भेटल्यावर आपण स्वगृही आल्याची भावना झाल्याचे ते म्हणतात. यावरून आई-वडिलांप्रमाणेच माणसाच्या जीवनात शिक्षकाचे अनन्यसाधारण महत्त्व असते असे ते सुचवताना दिसतात. दोनाचे चार हात या भागात लेखकाचे लग्न, मंगला नारळीकर यांच्यासोबत होणे आणि त्यांच्या शिक्षण विषयक बाजूच्या संदर्भात बोलताना मंगला नारळीकर मुंबई विद्यापीठाच्या मास्टरच्या परीक्षेत गणित विषयातून सुवर्णपदक प्राप्त होत्या असे सांगितले आहे. **(पूर्वार्ध)**

पान १ वरून

## 'ती'चे दिवस... अश्विनातले!

सीतेनं लक्ष्मणरेषा ओलांडली, तरी ती लक्ष्मणरेषा मग युगे युगे ऊर्मिलेच्या दारी आडवी पडून असते. असे असले तरीही त्या दोघीही स्त्रीत्वाची बलस्थाने असतात. आदिमायेनं लक्ष्मणरेषा ओलांडली की, एका रावणाचा अंत नक्की असतो. आदिशक्तीचं हे असं सीमोल्लंघनाला निघणं सर्व स्त्री-जातीला बळ देऊन जातं. निदान बळ देऊन जावं, अशी तिची अपेक्षा असते. तिच्या हातात शस्त्रासोबत शास्त्रेही असतात. मूर्तिमंत सौंदर्याच्या हातात नेहमी ती असावीतच. ही आदिमाया मोह पडावा इतकी देखणी, सौंदर्यवती आहे; पण तिचं वाहन म्हणजे सिंह. ही शस्त्र आणि शास्त्रसंपन्न मोहमाया सीमांच्या उल्लंघनासाठी निघते, तेव्हा रौद्र व क्रुद्ध सिंहावर ती आरूढ असते. त्यामुळं तिच्या सौंदर्याकडे कुणी वाकड्या नजरेनं पाहूच शकत नाही. पाहणारे भक्तीनेच किंवा भीतीनेच तिच्याकडे बघतात. अंबा मग मोहाच्या सीमा ओलांडून विरक्तीच्या वनात प्रवेश करते. स्त्रीनं कसं असावं, हेच ती सांगत असते. अष्टभुजेच्या एका हातात कमळ, तर दुसऱ्या हातात सर्पसुद्धा असतो. ती अंहकारी पिशाचांच्या वधाला निघाली असते, म्हणून तिला मग मोहासोबतच मायेच्या सीमासुद्धा ओलांडाव्या लागतात. अर्थातच मग आश्विनातल्या दिवसांवर तिच्या दिसण्याची आणि असण्याची सावली पडणं अपरिहार्य असतं.

बदलत्या क्षणांसोबत आणि जिवाच्या भावविश्वासोबत रूप बदलणं म्हणूनच तिला जमतं. ती परत येते तेव्हा लक्ष्मीरूपात सुगीचे सुख घेऊन येते. महामायेचं हे श्रीमंत रूप अर्थ-कामातून मोक्षाला जाण्याचा मार्ग दाखविण्यासाठी असतं; पण साधकाच्या जातकुळीवर ते अवलंबून असतं. साधना सत् आणि असत्वाची असते. साधकाची कामनाही अर्थ-कामाची असू शकते आणि मोक्षाचीही. सीमा ओलांडून तिच्या जाण्याचा नि परत येण्याचा अन्वयार्थ कळला, तर मग साधकाचा सत्पुरुष होतो. माणूस संयमी झाला की, कुठल्याही ऋतूंचे हल्ले परतवून लावणं फार सोपं होतं. तिचं सीमेपलीकडे जाणं आणि परतणं संदर्भासह समजावून घेतलं पाहिजे. जाते का नि परतते कशासाठी... सुकाळात आणि दुष्काळात पुरुषार्थाला सारखीच संधी असते. विशेष म्हणजे त्यासाठी साधकाने विरक्तीच्या वनात जाण्याची गरज नसते; पण गावातही विरक्तीचं वन निर्माण करता यायला हवं. त्यासाठी ऋतू आणि मासांचं भान असणं गरजेचं असतं. सीमोल्लंघनाच्या फेऱ्यात एका टोकाला जीवन आणि दुसऱ्या टोकाला मृत्यू का असतो, हे मग आपोआप कळतं. माहिती असणं आणि कळणं यात फरक असतो. तसाच फरक डोळे असणं अन् नजर असण्यात असतो. हा फरक कळला की, मग आपण बघत नाही, दर्शन घेतो. दिसायला फक्त सगुण साकार रूपच दिसू शकतं, पण दर्शन मात्र निर्गुण निराकाराचंही घेऊ शकतो... हे ज्ञान आपल्याला व्हावं म्हणून त्या वेदप्रतिपाद्येने किती विविध स्त्री-रूपांत जन्माला येऊन किती अनंत लोक जन्माला घालण्याच्या यातना स्वीकारल्या, याची जाणीवही होते... ही जाणीव होण्याचा महिना म्हणजे अश्विन. खरंतर मोहाच्या सीमा ओलांडून विरक्तीच्या वनात गेलेल्या त्या श्रीशक्तीला परत श्रीमंत लक्ष्मीचं रूप घेऊन परत येण्याचं प्रयोजनच काय? तर त्याचं उत्तर आहे-तिच्या अनंत पुत्रांचे कल्याण! अश्विन हा कल्याणाचासुद्धा महिना आहे. अश्विन हा कल्याणाचा, चिंतनाचा, पूजेचा, प्रार्थनेचा महिना आहे. अशा या पूजेच्या, चिंतनाच्या, ज्ञानाच्या महिन्यात शक्तीनं अशिवतेकडे, पाशिवतेकडे न जाता शिवाकडे गेले पाहिजे. विचारांनी विवेकाकडे गेले पाहिजे. वासनांनी विकाराकडे न जाता शृंगाराने सौंदर्याकडे गेलं पाहिजे. हे सारं चातुर्मासातल्या या एका अश्विन महिन्यात शिकता आलं, तर कुठल्याही माणसाला घराचं दार न ओलांडताही सीमोल्लंघन घडू शकतं. कारण अश्विन हा शेवटी औषधांचा आणि उपचाराचा महिना आहे... चंद्रसुगीच्या दिवसांपर्यंत नेत सरस्वतीच्या विणेच्या झंकाराचा पूर्णचंद्र तुमच्या- माझ्या आयुष्यात ओला प्रकाश निर्माण करणारे हे दिवस आहेत. चंद्र दुधात मिसळून प्यायल्यावर ज्ञानाचा पान्हा पाझरू लागतो आपल्या अंर्तमनात ते दिवस अश्विनाचे असतात.

## 'क्वाड' देणार चीनला शह

या बहुराष्ट्रीय सरावामध्ये, सर्व देशांचे नौदल प्रगत पृष्ठभाग आणि पाणबुडी युद्ध सराव आणि थेट गोळीबार कवायती करतील. या सरावात सर्व देशांच्या नौदलांमधील जलद तैनातीचा समन्वय साधण्याचा सरावही केला जाईल. चीनला मिळालेल्या सागरी स्वातंत्र्याचा तो गैरवापर करून ऊर्जा व्यापारामध्ये अडथळे आणत असल्याचा आरोप आहे. या मार्गाचा ८० टक्के भाग मलाक्का सामुद्रधुनीतून जातो. त्यामुळे 'क्वाड' या युद्धसरावाद्वारे चीनला इशारा देत असल्याचे स्पष्ट होते. चीनला या व्यापारी मार्गावर धक्का देण्यात 'क्वाड' यशस्वी ठरले, तर ती मोठी घडामोड ठरणार आहे. तसे झाल्यास चीनला ऑस्ट्रेलियाच्या दक्षिण भागातून जाण्याशिवाय पर्याय नाही. मात्र, हे चीनला चांगलेच महागात पडणार आहे. त्याचवेळी, 'क्वाड' देशांदरम्यान लॉजिस्टिक आणि लष्करी करारदेखील आहेत. यामध्ये या देशांची नौदले एकमेकांच्या बंदरांना किंवा नौदलतळांना भेट देऊ शकतात. इंधनापासून ते दुरुस्तीपर्यंत आणि इतर प्रकारच्या सुविधांचा लाभ घेता येतो. याद्वारे चीनचा सागरी रेशीममार्गही खंडित होऊ शकतो.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिका दौर्यामध्ये 'क्वाड' शिखर परिषदेशिवाय अमेरिकेतील तंत्रज्ञान कंपन्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकार्यासोबतही चर्चा केली. त्यामध्ये 'गुगल', 'एनव्हीडीया' आणि इतर १३ कंपन्यांच्या तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गजांच्या प्रमुखांना संबोधित करताना, मोदींनी सेमीकंडक्टर क्षेत्रात जागतिक भागीदार बनण्याची भारताची क्षमता आणि भारतातील तांत्रिक प्रगती नवकल्पना कशी वाढवू शकते, यावर अधोरेखित केले. यादरम्यान ते म्हणाले की, भारताचा मंत्र 'सुधार, परिवर्तन आणि कार्यप्रदर्शन' असा आहे. ते पुढे म्हणाले की, तुमचे अनुभव माझ्यासाठी खूप महत्त्वाचे आहेत. २१वे शतक हे तंत्रज्ञानावर आधारित आहे. अशा काळात केवळ तंत्रज्ञान किंवा तंत्रज्ञान अधिक लोकशाही मानवी कल्याणाची हमी देते. तंत्रज्ञानामुळे लोकशाहीत संकट निर्माण होते. भारतात तरुणाई, तंत्रज्ञान आणि बाजारपेठ आहे. यावेळी पंतप्रधान मोदींनी सेमीकंडक्टर क्षेत्रातील चीनच्या वर्चस्वास भारत देत असलेल्या आव्हानाविषयीदेखील भाष्य केले. अर्थातच, त्यांनी चीनचे कोठेही नाव घेतले नाही.

सध्या सेमीकंडक्टर उत्पादन करणार्या देशांमध्ये चीन पहिल्या क्रमांकावर आहे. मात्र, लवकरच भारत या बाबतीत चीनला मागे टाकणार आहे. हे कसे होईल, हे पंतप्रधान मोदींनी तंत्रज्ञान कंपन्यांच्या सीईओंसोबतच्या गोलमेज परिषदेत सांगितले आहे. ते म्हणाले की, भारत सेमीकंडक्टरमध्ये १५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. चिपशिवाय कोणताही व्यवसाय चालवणे कठीण आहे. चिप्स आणि सेमीकंडक्टरच्या दिशेने आवश्यक असलेल्या मूलभूत गरजांसाठी आम्ही पूर्णपणे तयार आहोत. आजही जगातल्या मोठ्या कंपन्यांची संशोधन आणि नवोपक्रम केंद्रे भारतात आहेत. याची आठवणदेखील पंतप्रधानांनी करून दिली. सेमीकंडक्टर क्षेत्रासाठी भारताने 'पीएलआय योजना'देखील सुरू केली आहे. त्यामुळे आगामी काही वर्षांमध्ये सेमीकंडक्टर क्षेत्रामध्ये भारत एक महाशक्ती म्हणून उदयास येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. एकूणच पंतप्रधान मोदी यांचा अमेरिका दौरा अनेक अर्थांनी महत्त्वाचा ठरला आहे. एकीकडे अमेरिकेत निवडणुकीचे वारे सुरू आहेत. कदाचित तेथे सत्ताबदलही होईल. मात्र, सत्ताबदल झाला तरी 'क्वाड'चा अजेंडा कायम राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. हिंद-प्रशांत क्षेत्रामधील नवी समीकरणे आणि चीनचा वर्चस्ववाद या पार्श्वभूमीवर 'क्वाड'ची ही बैठकदेखील महत्त्वाची ठरली आहे. विशेष म्हणजे या बैठकीमध्ये भारतच केंद्रस्थानी होता. त्यामुळे 'क्वाड'मध्ये भारताचा अजेंडा केंद्रस्थानी येत असल्याचेही स्पष्ट झाले आहे.

# बहुआयामी साहित्यिक; प्राचार्य श्याम भुर्के

गौरव
प्रा. रवीन्द्र कोठावदे
भ्र.९८६०४२४३४९



शारदेचा वरदहस्त लाभलेले साहित्यिक, प्राचार्य श्याम भुर्के यांना स्नेहल प्रकाशनचा स्नेहांजली पुरस्कार जाहीर झालेला आहे. याबद्दल ह्या बहुआयामी साहित्यिकाचे अभिनंदन. साहित्य क्षेत्रात मुशाफिरी करतांना भुर्के यांनी साहित्याचे विविध प्रकार लीलया हाताळले. त्यांचा साहित्याचा कॅनव्हास विशाल आहे. अनेकविध विषयांवर त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांची संख्या ४० हून अधिक आहे. त्यांच्या या साहित्यसेवेबद्दल श्री. भुर्के यांना अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे, त्यांचा सन्मान करण्यात आला आहे. बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये लेखनिक म्हणून रुजू झालेले श्री. भुर्के बँकेच्या उपमहाव्यवस्थापक पदापर्यंत पोहचले हे विशेष.

आत्मवृत्त, स्थळ माहात्म्य, खुसखुशीत लेखन, एकांकिका, कथासंग्रह, बँकिंग, प्रवास वर्णन, कविता संग्रह, नभोनाट्य, वर्तमानपत्र, मासिके आणि विशेषांकात लेखन, व्याख्यानांचेच पुस्तक असे साहित्याचे नानाविध प्रकार श्री. भुर्के यांनी हाताळले आहेत. 'सभेत कसे बोलावे' या त्यांच्या पुस्तकाच्या नऊ आवृत्या निघालेल्या आहेत. 'मंत्र श्रीमंतीचा, 'माईंड जिम', आनंदाचे पासबुक (आत्मवृत्त) ही त्यांची गाजलेली पुस्तके. स्नेहल प्रकाशनने प्रकाशित केलेला यशस्वी जीवनची वाटचाल पुस्तक खूप गाजले. विनोद मेजवानी या पुस्तकाच्या अनेक आवृत्या काढाव्या लागल्या. मुक्काम पोस्ट सोलापूर हे त्यांचे पुस्तक सोलापूर महानगरपालिकेने प्रकाशित केले आहे. शिरीष पै यांची प्रस्तावना असलेले खुमासदार अत्रे हे असेच त्यांचे एक गाजलेले पुस्तक, पुणे एक साठवणं, बँकेत शेखर सुमन, पु.ल. एक आनंदयात्रा ही आणखी काही गाजलेली पुस्तके. अर्थमैत्री, बँकिंग ऍट अ ग्लान्स, की टू सक्सेस इन बँकिंग, सक्सेसुल बँकर, इ. बँकिंग क्षेत्राविषयीची त्यांची पुस्तके गाजलेली नाहीत, तर या पुस्तकांचा बँकिंग क्षेत्रात करिअर करणाऱ्या अनेकांना त्याचा लाभ झाला आहे. मंत्र श्रीमंतीचा ह्या पुस्तकास अमेरिकन काँग्रेस ऑफ लायब्ररीजने शिफारस पत्र दिलेले आहे. आनंदाचे पासबुक या त्यांच्या आत्मवृत्तास सेंट्रल बँक ऑफ इंडियाचा पुरस्कार मिळाला आहे.

पुण्यात प्रारंभ होऊन भारतभर व्यवसाय करणाऱ्या बँक ऑफ महाराष्ट्रचा ८६ वर्षांचा इतिहास त्यांनी मराठी आणि इंग्रजीतून लिहिला. अवघड लिहिणे सोपे असते, परंतु सोपे लिहिणे अवघड असते. भुर्के यांचेकडे सोपे लिहिण्याची हातोटी आहे. म्हणूनच त्यांचे लेखन वाचकाच्या मनाची पकड घेते. अतिशय आश्वासक, दमदार, कसदार, आशयपूर्ण परंतु रंजक अशा पुस्तकात ओघवती भाषा अनुभवास येते. मराठी साहित्याचा प्रचार करणे हा श्री. भुर्के यांचा छंदच आहे. ते गेली २० वर्षे आचार्य प्र.के. अत्रे, ज्ञानकोशकार केतकर, वि.स. खांडेकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, पु.ल. देशपांडे, राम गणेश गडकरी यांच्या स्मृति-स्थळाजवळ जाऊन त्यांचे चरित्र कथन करीत आहेत. ह्या निमित्ताने ते पुढील पिढीपर्यंत हे साहित्य पोहोचवत आहेत. रूढ अर्थाने त्यांनी पुस्तक या साहित्य प्रकारात स्वतःला बांधून न ठेवता साहित्य क्षेत्रात मुक्त संचार केला आहे, प्रचंड मुशाफिरी केली आहे. कवी मनाच्या भुर्के यांचा सुवासिक टोकन हा कविता संग्रह रसिकांच्या मनाचा ठाव घेतो. आघाडीच्या अनेक वर्तमानपत्रातून त्यांनी लेखन केलेले आहे. तसेच साहित्यशिवार, कथाश्री, गोमंतक कालिका, सह्याद्री लायन, अमेय, काशिनाथ घाणेकर स्मृति विशेषांक, मध्यमा, उत्तम कथा, वसंत अशा विविध अंकातून १००च्या वर त्यांचे लेख प्रसिद्ध झालेले आहेत. महाबँक गृहपत्रिकेच्या संपादकपदाची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे सांभाळली. संपूर्ण देशभर १०० हून अधिक गावातून अनेक संस्था, व्याख्यानमाला यांतून विविध विषयांवर श्री. भुर्के यांनी २००० हून अधिक व्याख्याने दिलेली आहेत. माईंड जिम विषयावर त्यांनी अनेक कार्यशाळा घेतल्या आहेत. अखिल भारतीय सांस्कृतिक संघातें युवकांसाठी नेतृत्वविकास कार्यशाळा यांनी घेतल्या. मराठी साहित्य परिषदेतें उत्कृष्ट दिवाळी अंक समिती सदस्य म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. भुर्के यांनी साहित्यसेवेला आपले योगदान सदस्य/पदाधिकारी या नात्याने अनेक संस्थांना दिलेले आहे. भुर्के यांनी आकाशवाणीच्या माध्यमातून श्रोत्यांशी नाळ जोडून या ही माध्यमात आपल्या साहित्याचा ठसा उमटवला. सोलापूर आकाशवाणीसाठी त्यांनी चार नभोनाट्ये लिहून सादर केली. नागपूर आकाशवाणीवर त्यांनी चेकच्या गंमतीजमती हा कार्यक्रम सादर केला. पुणे आकाशवाणीवर भुर्के यांचा पाच नभोनाट्यात सहभाग होता. दूरदर्शनवर मायबोली कार्यक्रमात द.मा. मिरासदार यांचे समवेत सहभाग घेतला. धनीफितींच्या माध्यमातूनही भुर्के यांची साहित्यसेवा रसिकांच्या सेवेत रुजू झालेली आहे. बोनस या विनोदी चित्रफितीमध्ये त्यांचे निर्मिती, कथा, पटकथा, संवाद, दिग्दर्शन यांमध्ये योगदान आहे. भुर्के केवळ विशेष लेखन करून थांबले नाहीत तर हे साहित्य त्यांनी त्यांची सुविद्य पत्नी गीता भुर्के यांच्या समवेत कार्यक्रम सादर करून श्रोत्यांपर्यंत पोहचवले आहे. खुमासदार अत्रे यांच्यावर तर ५०० हून अधिक कार्यक्रम त्यांनी सादर केले आहेत. याशिवाय त्यांचे गाजलेले कार्यक्रम म्हणजे पु.ल.- एक आनंदयात्रा, 'नंदादीप- वि. स. खांडेकर जीवनदर्शन, साहित्यिक सावरकर, मराठी विनोद परंपरा, गोनिदा-एक झंझावात, गुदगुल्या-शरद तळवलकर, मिरासदार, इत्यादी. गिर्यारोहण, समाजकार्य यातही भुर्के मागे नाहीत. बँक ऑफ महाराष्ट्रमधील भुर्के यांचा प्रवास विलक्षण आहे. क्लार्क म्हणून रुजू झालेल्या भुर्के यांनी मॅनेजर, रिजनल मॅनेजर, अशी पदोन्नती मिळवत ते उपमहाव्यवस्थापक पदावरून निवृत्त झाले. बँकेच्या नागपूर प्रशिक्षण केंद्राचे आणि पुणे महाविद्यालयाचे प्राचार्यपद त्यांनी भूषविले. ग्रामीण बँकात संचालकपद भूषविले. श्री. भुर्के यांना आतापर्यंत अनेक पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. स्नेहल प्रकाशनच्या स्नेहांजली पुरस्काराने प्राचार्य भुर्के यांना सन्मानित करण्यात येत आहे, यानिमित पुनःश्र त्यांचे, अभिनंदन आणि त्यांच्या साहित्ययात्रेच्या प्रवासासाठी शुभेच्छा.

'श्रीधरस्वामी' या नावाच्या महाराष्ट्रात तीन थोर विभुती प्रसिद्ध आहेत. पहिले श्रीधर हे 'आचार्य श्रीधर' असून ते गीता, भागवताचे संस्कृत भाष्यकार आहेत. दुसरे श्रीधर म्हणजे 'रामविजय' कर्ते 'संतकवी श्रीधर'(नाझरेकर). आणि तिसरे समर्थ रामदास शिष्य 'श्रीधरस्वामी' (देगलूरकर). 'रामविजय' प्रमाणेच संतकवी श्रीधरांचे 'हरिविजय', 'पांडवप्रताप', 'जैमिनी अश्वमेध', 'वेदांतसूर्य' आणि 'शिवलीलामृत' हे सारेच ग्रंथ भाविकवाचकांच्या भावविश्वातील आवडीचे ग्रंथ आहेत. आपल्या 'रामविजय' ग्रंथाचे महत्त्व सांगताना श्रीधरांनी त्याला समुद्रमंथनातून प्रकट झालेल्या अमृतकलशाची उपमा दिलेली आहे. 'रामविजय' हा भक्ती, कारुण्य आणि वीर रसांचा अमृतसंगम आहे.

लेखांक ३९

# थोर संतकवी श्रीधर यांचा रामविजय

(उत्तरार्ध)

...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५

**धन्य स्वामी श्रीधर।**
**त्याच्या ज्ञानासी नाही पार।**
**ज्याची कीर्ति हे अद्भुत।**
**वर्णिताती साधुसंत।।**

संतकवी श्रीधर हे प्रासादिक ग्रंथलेखक म्हणून विख्यात होते. तेव्हढेच कीर्तनकार म्हणूनही प्रसिद्ध होते. 'तवं कीर्तन जगजीवन भूषण श्रवणाचे।' असे त्यांच्या कीर्तनाचे त्यांच्या शिष्यांनी समर्पक-सार्थ शब्दात वर्णन केलेले आहे. इंग्रज काळात छपाई-मुद्रण व्यवसाय आला तेव्हा १८४० ते १८६० काळात जे प्रमुख लोकप्रिय ग्रंथ छापले गेले त्यात ज्ञानेश्वरी, तुकारामगाथे समवेत श्रीधरांच्या रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप या ग्रंथांनाही अग्रमान मिळाला होता. १८९६ ला श्रीधरांच्या एकाच ग्रंथाच्या वेगवेगळ्या प्रकाशकांनी पाच वेगवेगळ्या आवृत्त्या प्रकाशित केल्या होत्या. अशा प्रकारे श्रीधरांच्या ग्रंथांनी लोकप्रियतेचे शिखर गाठलेले होते.

महामहोपाध्याय द. वा. पोतदार, वि. ल. भावे, डॉ. सदानंद मोरे आणि गीतरामायणकार ग. दि. माडगूळकर अशा सर्वांनी संतकवी श्रीधरांच्या कवित्वाची प्रशंसा व गौरव केलेला आहे. ग. दि. माडगूळकर यांनी 'गीत रामायणाचे रामायण' लेखात आपल्या रामायण लेखनाची प्रेरणा लहानपणी वाचलेला संतकवी श्रीधरांचा 'रामविजय' ग्रंथ आहे असे स्वाभिमानपूर्वक म्हटलेले आहे.

### 'रामविजय' : साहित्यगुण विशेषः-

'हरिविजय' प्रमाणे श्रीधरांचा 'रामविजय' रस-अलंकार या साहित्य गुण विशेषांनी परिपूर्ण आहे. यामध्ये करूण, वीर, अद्भूत, भक्ती, शृंगार अशा सर्वच रसांचा यथायोग्य शब्दाविष्कार आहे. खर तर मूळ रामायण (वाल्मिकी) हे नवरसांनी डवरलेले महाकाव्य आहे. तरी पण 'करूण' रस प्रधान आहे. आद्य महाकवी वाल्मिकींना हे महाकाव्य रचण्याची प्रेरणाच मुळी एका करूण हृदयद्रावक प्रसंगाने झालेली आहे.

क्रौंच पक्षांचा तो करूण प्रसंग पाहताच वाल्मिकींच्या तोंडून शोकात्म उद्गार बाहेर पडतात आणि तोच रामायणाचा आरंभ बिंदू आहे. म्हणूनच ऋषी वाल्मिकी म्हणतात- 'शोकः श्लोकत्व मागतः' करूण रसाबद्दल महाकवी भवभूती म्हणतो- **एको रसः करूण एव निमित्तभेदात। भिन्न पृथक पृथभिवाश्रयते विवर्तान।।**



एक करूण रसच काव्याचा खरा रस व आत्मा असतो.

श्रीधरांनी रामविजयात वर्णीलेले श्रावणबाळ वध, रामाला वनवासात पाठवा कैकयीचा हट्ट, राम वनवास, सीताहरण असे अनेक करूण प्रसंग करूणरसाचा भावस्पर्शी शब्दगंध आहे. करूण, वीर, अद्भूत या रसांना श्रीधरांनी त्या त्या प्रसंगात यथायोग्य स्थान देत ते प्रसंग रसाळ वेधक- वाचनीय केले असले तरी श्रीधरांचा मुख्य भर हा भक्तीरसावरच आहे. रामभक्तीच्या प्रचार प्रसारार्थच रामकथेची विजयी रूपात श्रीधराने मांडणी केलेली आहे. सकल संतकाव्याचा स्थाईभाव हा भक्तीरसच आहे तसा तो श्रीधरांचाही आवडता रस आहे. जेथे जेथे मिळेल तेथे तेथे श्रीधरांनी भक्तीरसाची मुक्त उधळण केलेली आहे. 'रामविजय' या ग्रंथ नामात वीररसाचा निर्देश आहे. हा वीर रस या ग्रंथाचा आणखी एक प्रमुख रस आहे.

रामायणात वीररस प्रधान प्रसंगांची रेलचेल आहेच; विशेषतः 'युद्धकांड' हा संपूर्ण भाग वीररसाची सुग्रास मेजवानीच आहे. रसा प्रमाणेच साहित्यात अलंकारांनाही अनन्य असे स्थान असते. रामविजयातही श्रीधरांनी अनेक अलंकाराचा सुयोग्य वापर केलेला आहे. या अलंकारात अर्थालंकार आहेत तसेच शब्दालंकारही आहेत. दृष्टांत, उपमा आणि रूपक हे साहित्यालंकार श्रीधरांचे आवडते अलंकार आहेत. त्यापैकी दृष्टांत अलंकारावर श्रीधरांची हुकमत होती.

### रामविजयातील तत्त्वविचारः-

कथेतील पात्रांचे संवाद, स्थळ वर्णने, स्वभाव चित्रणे ही अभिजात साहित्यातील गुणवैशिष्ट्ये श्रीधरांच्या 'रामविजय' मध्ये ठळकपणे नजरेत भरतात पण श्रीधरांचे ग्रंथ प्रयोजन हे लोकरंजन नसून लोकप्रबोधन व भक्ती विचार प्रसाराचे आहे. यासाठी 'रामविजय' मधील तत्त्वविचार व बोध या गोष्टी विशेष महत्त्वाच्या आहेत. अद्वैत वेदान्त विचार हा श्रीधरांना अभिप्रेत असून मोक्ष प्राप्तीचे साध्य प्राप्त करण्यास भक्ती साधनास श्रीधरांनी महत्त्व दिले आहे. अर्थात ही भक्ती ज्ञानोत्तर भक्ती आहे. 'ज्ञानदेव तु कैवल्यम' या वेदांत सिद्धांताचे प्रतिपादन 'रामविजय' मध्येही श्रीधरांनी केलेले आहे. सामान्य भाविक वर्गाला रामकथेद्वारे परमार्थप्रवण करणे व सहजपणे नितीतत्त्वांचा बोध घडवून सदाचाराने अनिर्वचनीय आनंदाभिमुख करणे. या कार्यात श्रीधरांच्या 'रामविजय' ग्रंथाने मोठी कामगिरी केलेली सर्वश्रुत आहे. 'रामविजय' ग्रंथाचा शेवट शोकांतिका होऊ नये म्हणून श्रीधरांनी रामायणातील 'श्रीरामाचे नीजधाम गमन' हे प्रकरण वगळलेले आहे. तसेच सीतेचे शुद्धीकरण, दिव्य हा प्रसंगही टाळून आपला दृष्टिकोन कसा कालसापेक्ष आधुनिक आहे हे त्यांनी दर्शविलेले आहे.

श्रीधरांचे वडिल ब्रह्मानंद हे थोर अधिकारी पंडित होते. पंढरपूरच्या चंद्रभागेतिरी त्यांच्या समाधीच्या समोरच संतकवी श्रीधरांची समाधी आहे. इ.स.१७३० मध्ये माघ वद्य तृतीयेला आपल्या जीवनकार्याची समाप्ती केली. 'रामविजय' प्रमाणेच संतकवी श्रीधरांचे 'पांडुरंग माहात्म्य' प्रसिद्ध आहे. त्यावर थोर विदेशी अभ्यासक संशोधक डॉ.रिसाईड यांनी पाश्चात्य विद्यापीठात संशोधन प्रबंध लिहिलेला आहे.

असा श्रीधरांच्या कवित्वाचा दरवळ केवळ महाराष्ट्रभूमीतच नव्हे तर विदेशातही पोचलेला होता. श्रीधरांच्या 'रामविजय'चे आगळेपण म्हणजे श्रीधरांनी आद्य शंकराचार्यांपासून ते थेट मुक्तेश्वरांपर्यंत अनेकांचे नाव वैशिष्ट्यासह घेत वंदन केलेले आहे. यामध्ये संस्कृत व प्राकृत असे दोन्ही प्रकारचे कवी आहेत.

थोडक्यात श्रीधरांचा 'रामविजय' हा लोकरंजनासाठी नसून पारमार्थिक साधन आहे. रामायणातील उद्बोधक कथांनी श्रोत्यास नीति सदाचार संपन्न करून परमार्थ प्रवण-संपन्न करणे हे त्याचे ध्येय आहे आणि ते अपेक्षित ध्येय श्रीधरांनी प्राप्त झाल्याचे ग्रंथाच्या अपूर्व लोकप्रियतेने याचि देही याचि डोळा अनुभवले आहे. हीच श्रीधरांची थोरवी होय!

**'रामविजय' ग्रंथ सुंदर।**
**हे चाळीस खणांचे दिव्य मंदिर।।**
**'रामविजय' रत्नखाणी।**
**वर्णिता धन्य जाहली वाणी।**

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

(भाग १६)

थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२



रवींद्रनाथांनी साहित्याच्या आणि कलेच्या सर्व प्रांतात मुक्तपणे संचार केला आणि आपला एक वेगळा ठसा सर्व प्रांतात उमटवला. परंतु रवींद्रनाथ हे प्रामुख्याने कवी होते असे म्हणावे लागेल. मागच्या एका भागात मी त्यांना रवींद्रनाथ हे कवींद्रनाथ होते असे म्हटल्याचे आपल्याला आठवत असेलच. मागच्या भागांमध्ये रवींद्रनाथांना निसर्गाचा झालेला साक्षात्कार आणि त्याची त्यांनी 'निर्झरेर स्वप्नभंग' या कवितेत केलेली अभिव्यक्ती याचा उल्लेख मी केला होता. त्या कवितेत ते म्हणतात,

**आज पहाटे घेऊनी किरणे तो आला, कैसा न कळे, प्राणा माझ्या स्पर्शूनी तो गेला, गुहेत अंधार्या गाणे प्रभात पक्षाचे सामावले, कैसे न कळे, दिवसांनी इतक्या जागृत झाला प्राण माझा, कैसा न कळे.**

वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी रवींद्रनाथांनी ही कविता लिहिली. त्यात कल्पना अशी आहे की, नुसताच डोह होऊन पडलेल्या निर्झराच्या प्राणाला रविकिरणांचा स्पर्श होतो आणि तो निर्झर जागून उठतो. मग कड्यावरून उड्या टाकत अभेद्य खडक फोडत सारं जीवन एका नव्या चैतन्याने कसं फुलवून टाकतो हे सांगण्याचा प्रयत्न या कवितेत त्यांनी केला.

आपल्या आयुष्यात रवींद्रनाथांनी केवळ सत कर्मेच केली. आपल्या कार्यातून, साहित्यातून विविध प्रकारे समाजाला मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न केला. ज्याप्रमाणे रवी किरणांचा स्पर्श झाल्यानंतर तो निर्झर जागृत झाला, त्याला आपले जीवन ध्येय गवसले; त्याप्रमाणेच रवींद्रनाथांच्या प्राणांनाही विश्वशक्तीच्या चैतन्याचा स्पर्श झाला आणि त्यांनी मग सारे आयुष्य समाजासाठी समर्पित केले.

आपल्याला आणि जगाला देखील रवींद्रनाथांची ओळख आहे ती त्यांच्या 'गीतांजली' या काव्यसंग्रहाला काव्यसंग्रहाला मिळालेल्या नोबेल पारितोषिकामुळे. या काव्यसंग्रहात प्रामुख्याने भक्तीरसात भिजलेल्या कविता आहेत. गीतांजली म्हणजे गीतांची ओंजळ त्यांनी परमेश्वराला अर्पण केली आहे. रवींद्रनाथांच्या कवितांमध्ये ज्या विविध प्रकारच्या भाव-भावना व्यक्त झाल्या आहेत, त्यात परमेश्वराची, निसर्गाची आणि देशाची भक्ती यांना महत्त्वाचे स्थान आहे.

रवींद्रनाथांनी मूळ बंगालीत लिहिलेल्या गीतांजली या काव्यसंग्रहात एकूण १५७ कविता होत्या. परंतु त्यांच्या नोबेल पुरस्कार प्राप्त इंग्रजी 'गीतांजली' या काव्यसंग्रहात १०३ कवितांचा समावेश आहे. त्यातही गंमत अशी की मूळ बंगाली भाषेतील गीतांजलीमधील केवळ ५३ कविता या काव्यसंग्रहात आहेत आणि उर्वरित ५० कविता त्यांच्या इतर काव्यसंग्रहातून घेतलेल्या आहेत. 'गीतांजली' म्हणजे रवींद्रनाथांच्या काव्यसृष्टीचा आणि प्रतिभेचा एक छोटासा नमुना आहे असे म्हणता येईल. केवळ गीतांजली या काव्यसंग्रहातील त्यांच्या कविता या सर्वश्रेष्ठ आहेत, असे त्यांचे चाहते देखील म्हणणार नाहीत. तरी 'गीतांजली' या काव्यसंग्रह त्यांचे नाव अखिल विश्वात पोहोचवले. ते विश्वकवी ठरले. ते विश्वकवी झाले कारण त्यांच्या कवितेचे नाते अखिल विश्वाशी आहे. विशाल आणि व्यापक आहे. त्यात उदात्तता आहे. रवींद्रनाथांनी जगावर प्रेम केले आणि आपल्या कवितेच्या माध्यमातून ते व्यक्तही केले. ते जसे जगले, तसेच व्यक्त झाले आणि व्यक्त झाले तसेच ते जगले. त्यांच्या वागण्या बोलण्यात कुठेही अंतर नव्हते. त्यामुळेच त्यांचे कवितेला त्यांच्या व्यक्तिमत्वापासून वेगळे काढता येत नाही. त्यांच्यासाठी हे जग म्हणजे एक कविता होती तसंच ही कविता लिहिणारा कवी म्हणजेच परमेश्वर. त्याला ते विश्वकर्मा कवी म्हणजेच मास्टर पोएट म्हणत. त्यांची कवितेमागील ही भूमिका एकदा का समजून घेतली की आपल्यालाही त्यांच्या कवितेचा आस्वाद घेणे सोपे होते. या विश्वकर्मा कवीबद्दल रवींद्रनाथ फारच सुंदर शब्दात आपल्याला सांगतात. ते म्हणतात, या जगाच्या निर्मात्याने जीवनाचा एक उत्सव मांडला आहे आणि आपल्याला देखील त्या उत्सवात सामील होण्याचे निमंत्रण आहे. म्हणूनच आपण या जगात आलो आहोत मग असे जर असेल तर या उत्सवात आपण कशाप्रकारे सामील व्हायला हवे? आनंदाने की रडत कढत? या परमेश्वर रुपी विश्व कवीने हे जे सुंदर जग निर्माण केले आहे, त्याचा आपल्या पंच ज्ञानेंद्रियांनी अनुभव घेतला पाहिजे, सजग राहून सृष्टीतील होण-ारे बदल न्याहाळले पाहिजेत, ऋतुचक्रातील बदलांना दाद दिली पाहिजे. कारण त्या सगळ्या मास्टर पोएटच्या कलाकृती आहेत. तो नित्य नूतन काहीतरी घडविण्यामध्ये मग्न असतो, त्यातून स्वतःला व्यक्त करत असतो. त्याच्या या उत्सवात आपणही आपले सर्वस्व अर्पून भाग घ्यायला नको का? त्यांची एक कविता फार सुंदर रीतीने हा भाव व्यक्त करते.

या कवितेत एक मुलगी आपल्या आईला म्हणते. अग आई, घाई कर ना! आज आपल्या घरावरून राजकुमार जाणार आहेत. त्यांच्या स्वागतासाठी आपल्याला नीटनेटके सजून धजून जायला नको (पान ६ वर)

अमृतकुंभ
प्रा. वसंत गिरी
भ्र. ९०११२२९२३२

# चौर्यकर्माचा महाकाय वृक्ष, त्याचा अंत केंव्हा?

मृत्यू हे अंतिमसत्य आहे. हे असंख्य अति व्यवहारी महामानवांच्या लक्षात यावं, यासाठी स्मशानभूमी गावाच्या मध्यभागी असावी आणि मंदिर गावाच्या बाहेर असावं. असं तरूण सागर महाराज आपल्या प्रवचनात सांगत असतं. त्यामुळे या स्वार्थी जीवनाच्या पलीकडे जाऊन प्रत्येकाने आपल्या दुर्लभ मानवी जीवनाचा विचार करावा. ही अपेक्षा अध्यात्मक्षेत्रातील महान विभूतींची असते. मंदिरात जाऊन त्वरित आपल्या पापात परमेश्वराला सहभागी करुन घेण्यासाठी आपल्या पापकमाईचा हिस्सा परमेश्वराला देणगी स्वरूपात देऊन आपल्या त्या कमाईचे शुद्धीकरण करुन घेणारे महाभाग हे खरे ईश्वरभक्त, असे प्रमाणित करणारी व्यवस्था ईश्वरभक्तीचा फार मोठा विनोदच करत असते.



असे ईश्वरभक्त 'मरते दमतक' किती मोठी ईश्वरसेवा करत असतात? याचे छोटेसे उदाहरण पहावयाचे झाले तर, एक हिऱ्याचा तस्कर शेवटचे श्वास घेतं मरणासन्न अवस्थेत पडलेला असतो, तेव्हा तो आपल्या मुलांची चौकशी करतो, अरे जॉन कुठे आहे? तो अतिशय भावूक होऊन म्हणतो, मी आपल्या जवळच आहे पिताश्री पुढचा प्रश्न विचारला जातो. जॉनी कुठे आहे? तो अक्षरशः: रडतच म्हणतो, हा मी तुमच्या उशालाच उभा आहे पिताश्री. पुढची अत्यंत भावूक विचारपूस, अरे जुली कुठे आहे? हमसून हमसून रडतं उत्तर मिळते. मी ईथेच आहे पिताश्री, यावेळी तुम्हाला सोडून कुठे जाणारं बरं. तसा हा जन्मदाता ओरडतो, मग यावेळी हिरे डिलीव्हरीसाठी कोण गेलंय. एवढी आपल्या भावी पिढीची काळजी करुन त्या तस्कर महाशयांनी या जगाचा निरोप घेतला. आतापर्यंत अत्यंत भावूक झालेलं वातावरण सावध झालं. शेवटच्या क्षणापर्यंत आपल्या प्रगतीसाठी आपला जन्मदाता किती जागरूक होता. याचा त्या तिन्ही अपत्यांना अभिमान वाटला. अक्षरशः त्यांचा उर भरुन आला आणि सद्गदीत होऊन त्यांच्या डोळ्यातून अश्रूधारा वाहू लागल्या. काही कालावधीसाठी आयसीयूमध्ये आपल्या पिताश्रींचा मृतदेह त्यांनी ठेवला आणि तात्काळ आपल्या कामगिरीवर ते निघाले. त्यांनी समुद्राच्या त्या गोपनीय ठिकाणी जाऊन आपला मालं प्राप्त करुन आपल्या जन्मदात्याच्या आज्ञेचे पालन केले. त्यानंतर पुढील विधी पार पाडला. त्या प्रेताची राख होण्यापूर्वी त्या प्रेताच्या चेहर्यावर एक प्रसन्नता व समाधान दिसत होते. माझे आदर्श कार्य माझी भावी पिढी निश्चित पुढे नेईलं याची खात्री त्या आत्म्याला पटल्यामुळे तो आत्मानंद प्रेताच्या चेहर्यावरही पसरला असावा. वारसदारांनी आणलेल्या हिर्याचे तेजच प्रेताच्या चेहऱ्यावर दिसत होते, असेच म्हणावे लागेलं. अहो, हा विनोद नाही, हे प्रखर वास्तव आहे. पाहणारे पुन्हापुन्हा पहातच राहिले आणि म्हणाले, आमचे डोळे दिपून गेले. पुत्र असावे असे गुंडे ज्यांनी लावावे तिन्ही लोकी झेंडे. श्रद्धांजली देतांना अनेक वक्ते गौरवोद्गार काढत होते. कोणकोणत्या नेत्यांना, समाजसेवकांना, कलाकारांना पुढे जाण्यासाठी किती किती मदत झाली? हे गळा ताणून सांगणाऱ्या बोलघेवड्यांची स्पर्धाच सुरु झाली होती.

एवढे अफाट कार्य करुनही त्यांनी राजकारणात येणे पसंत केले नाही. त्यांनी ठरवलं असतं तर त्यांना काहीच कठीण नव्हतं. प्रत्येक पक्षानं त्यांचा सन्मान केला असता. अहो सन्मान म्हणून काय विचारता? अनेक पक्ष पायघड्या टाकून त्यांच्या स्वागताला तयार होते. पण...पण... त्यांनी राजकारण निषिद्ध मानलं. राजकारण विरहीत समाजकारणाचा मार्ग त्यांनी नेहमी पसंत केला. इतरांचे जीवन फुलांनी बहरुन टाकले, सुगंधीत केले. स्वतः मात्र ते काटेरी मार्गांनी चालत राहिले. 'वाटेवरी काटे वेचित चाललो' हे गीत आपल्या या भाऊसाहेबांच्या कार्यामुळेच त्या गीतकाराला सुचले होते. हे इथे जमलेल्या कुणालाच माहीत नाही. पण एकदा फक्त मलाच त्यांनी हे खाजगीत सांगितलं होतं. तर अशी ही महान विभूती आपल्यातून आज देहाने निघून गेली. त्यांचा आत्मा देहातून निघून गेल्यावरही त्यांचा देह काय हिर्यासारखाच चमकत आहे. त्यांच्या तेजस्वी कार्यामुळे लोक त्यांना तेजराव हीरेच म्हणायचे. आम्ही त्यांच्या पुढच्या पिढीला मात्र राजकारणाची गळ घालणार आहोत. या ठिकाणी जास्त काही मी बोलणार नाही. पण भाऊसाहेबांच्या आत्म्याला शांती मिळावी, यासाठी एवढं या ठिकाणी सांगणं मला गरजेचे होतं. असं पल्लेदार भाषण देणारा स्व.हिर्याचा हुजर्या लालचंद चुन्नीलाल सर्वांना चुना लावण्यात अतिशय तरबेज होता. त्यानंतर कित्येक दिवस त्या तस्कराची व त्याच्या पराक्रमी वारसांची चर्चा करण्यात तेथील अतिसामान्य जनता दंग झाली होती.

पैसा कमावयाला अशी अक्कल पाहिजे, हिम्मत पाहिजे नाहीतर आपली औलाद, नुसतं खाऊन खत केलं हो आमच्या नालायक औलादीनं. अशी स्तुतीसुमनं त्याच्यावर व त्याच्या मुलांवर उधळण्याचा एक कलमी कार्यक्रमगावात सुरु होतां आणि त्याबरोबरच आपल्या मुलांना शिव्या घालण्याचा. अतिसामान्य माणसांची असणारी कुवत लक्षात घेता ते असाच विचार करणार हे अगदी साहजिकच होतं. गावातील काही मोजके विचार करु शकणारे जाणकार मात्र अस्वस्थ झाले. गावातल्या या मेंढरांना नेमकं काय करावं आणि कसं समजावून सांगावं? त्यांना काहीच कळतं नव्हतं. स्वतंत्र विचार करता येत नाही. कुणी समजावून सांगितलं तर क्षुल्लक स्वार्थासाठी ते ऐकून घ्यायचं नाही. प्रामाणिक सल्ला देणाऱ्याला अडचणीत आणायचं, हा समाजहितचिंतकाच्या कार्यातील अडथळा दूर कसा करायचा? हा खूप मोठा प्रश्न सर्वांना भेडसावत होता. पल्लेदार भाषनं ठोकणारा लालचंद चुन्नीलाल तेजराव हिरे यांचा सर्व कारोभार सांभाळीत होता. त्याच्या कार्यालयासमोर पाटी लिहिलेली असे, लालचंद चुन्नीलाल कामात आहेत. उद्या भेटावे. एकदा एका बहाद्दर इन्स्पेक्टरने निर्धार केला. हा नक्की कोणत्या कामात असतो एकदा पाहून तरी घ्यावे. त्याचे नावाचं बहादूरसिंग. नावाप्रमाणे बहादूर असलेला हा इन्स्पेक्टर, उन्हे खतरों के साथ खेलनेका बहोत शोक था। आपल्या सहकार्यांना थोडे बाहेरच थांबण्यासाठी त्याने सांगितले. दरवाज्यातून आत गेल्यावर एक जीना दिसला त्यावर दुसरी एक पाटी होती.'वर जाण्याचा मार्ग' तो सरळ दोन मजले चढून वर गेला. लालचंद रागाने लाल झाला आणि अक्षरशः गरजलाच, तुम्ही इथे कशासाठी आलात? त्यावर उत्तर मिळाले. तुम्ही नेहमीच कामात असता पण कोणत्या कामात असता, हे जाणून घेण्यासाठी आज आम्हाला वर येण्याचा मार्ग शोधावा लागला. तर तुमची सर्व प्रकारची नशा मैफल सुरु आहे. सुरु आहे. सोबतचे फुकटछाप डोळे पांढरे करुन केविलवाण्या नजरेने अक्षरशः क्षमा याचना करत होते. लालचंदची टरेलबाजी मात्र सुरु झाली. मी पितो तेंव्हाच खरा कामात असतो. लगेच याची खरी कामकोणती? हे जाणून घेण्यासाठी खाली असलेली टिमवर आली. लालचंद रागाने आता तर आणखीच लालबुंद झाला. बराच अद्वातद्वा बोलायला लागला. त्याला आणि त्याच्या सोबतच्या फुकटछाप तळीरामांना सन्मानाने पोलिस स्टेशनला आणले. इन्स्पेक्टर बहादूरसिंगचा खूप विनोदी स्वभाव होता. त्यांनी लालचंदची विकेट घेण्यासाठी त्याला प्रश्न विचारला, लालचंद जगातले सर्वात मोठे प्रदर्शन कोठे आहे? तो म्हणाला, मला काय...काही माहित नाही. त्यावर बहादूरसिंग म्हणाले, अरे गाढवा... गाढवाच्या पोटातच त्यावर लालचंद, म्हणजे... माझ्या पोटात? बहादूरसिंगः- होय त्यासाठी तुझी बायपास सर्जरी करावी लागेल... टिमचे सर्च ऑपरेशन सुरु होते. बरेच द्रव्य आणि सुंदर ललनाचा जनानखाना असल्याचा शोधही लागला.

बहादूरसिंग म्हणाले, काय रे लाल्या कनक आणि कांता खूपच सुरक्षित ठेवल्या होत्यास की रे, बालपणी तुला खेळाचे प्रेमहोते की नाही मला माहित नाही, पण तरुणपणातील प्रेमाचे खेळ खूपच जोरात सुरु आहेत तुझे? असे म्हणून त्यांनी लालचंदला एक जोरात फटका मारला. लालचंद जोरात ओरडायला लागला. या फायटींगमध्ये आता आता तुझे अंग आणि माझे हात आहेत. तुझा फर्दापाश करण्याचा मी विडा उचलला. लाल्या जेवढा लाल केला जाईलं तेवढा माझा विडा लाल होणारं. आता तेजराव हिऱ्याचं तेज तुला किती वाचवते ते पहातोच की रे लाल्या. तुझा पर्दाफाश झाल्यावर आता तेजराव हिर्याचे आणि त्याच्या लालची औलादीचा पर्दाफाश करायला कितीसा वेळ लागणार?

लालचंदला त्याच्या उभ्या आयुष्यात मिळाले नसतील तेव्हढे धम्मकलाडू उर्फ मुष्टीमोदक मिळत होते. त्यामुळे तो कमालीचा लालेलाल झाला होता. अगदी फुटलेल्या टमाट्यासारखा. त्याच्या बाई बाटलीच्या व्यसनामुळे आणि त्याच्या वाईट कृत्याचे फळ त्याच्या आयुष्याचे आता पुरते वाटोळे करणार होते. त्याने तेजराव हिऱ्याच्या साम्राज्यात अशी काही ऐश करुन घेण्याची चतुराई केली होती. त्यामुळे अकलेचा कांदा म्हणून त्याची सर्वत्र ओळख निर्माण झाली होती. बहादूरसिंगानी त्याला चांगला फोडून काढल्यावर त्याच्या सोबतच्या हुजऱ्यांना चोप देण सुरु केल्यामुळे या सर्व अकलेच्या कांद्याच्या डोळ्यातून गंगायमुना सुरु झाल्या होत्या. याला जन्मात मिळाल्या नसतील एवढ्या चापटपोळ्या मिळत होत्या. त्याबरोबरच त्या सर्वांची कणीक चांगलीच तिंबून निघत होती. त्यामुळे स्व.तेजराव हिरेचे सर्व पराक्रम, त्यांनी वाढविलेले साम्राज्य बाहेर येत होते. ईडी चौकशी झाली. हिरेच्या नोटा मोजण्यासाठी चार दिवस लागले. त्यामुळं त्या सर्व अवेध संपत्तीतून हिर्याचे तेज लख्ख चमकत होते. त्याने परिसरातील सर्वांचे डोळे दिपून गेले. एकविसाव्या शतकात चौर्यकर्माचा महाकाय वृक्ष झालेला लोकांनी पाहिला आणि तो उन्मळून पडलेला सुद्धा पाहतील. याविषयी विश्वास वाटतो.

# ग्रहसंकेत

(रविवार, २९ सप्टेंबर ते शनिवार, ५ ऑक्टोबर २०२४)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

* **रविवार, २९ सप्टेंबर-** द्वादशी श्राध्द, मघा श्राध्द, संन्यासिनां महालय * **सोमवार, ३० सप्टेंबर-** सोमप्रदोष, शिवरात्री, युगादि, त्रयोदशी श्राध्द, श्री लाहिरी महाशय जयंती, कृष्णदेव महाराज पुण्यतिथी यात्रा पुसेसावळी * **मंगळवार, १ ऑक्टोबर-** पितृ श्राध्द, चतुर्दशी श्राध्द, ज्येष्ठ नागरीक दिन * **बुधवार, २ ऑक्टोबर-** सर्वपित्री दर्श अमावास्या, भादवी पोळा, अमावास्या श्राध्द, महात्मा गांधी जयंती, लालबहादूर शास्त्री जयंती, गजच्छाया योग, अन्वाधान, स्वच्छता दिन, (कंकणाकृती सूर्यग्रहण भारतात दिसणार नाही. वेधादि नियमपाळू नयेत.) * **गुरुवार, ३ ऑक्टोबर-** घटस्थापना, शारदीय नवरात्रारंभ, मातामह श्राध्द, अश्विन मासारंभ, श्रीदेवी करंजेश्वरी नवरात्रोत्सवारंभ गोवळकोट (चिपळूण), महाराजा श्री अग्रसेन जयंती, अंबाबाई नवरात्र संगीत महोत्सवारंभ मिरज, सप्तश्रृंगीदेवी नवरात्रारंभ, संत मुक्ताबाई जयंती मुक्ताईनगर * **शुक्रवार, ४ ऑक्टोबर-** चंद्रदर्शन (१९:२०), ब्रम्हानंद महाराज पुण्यतिथी बुरूंगवाडी (पलुस) * **शनिवार, ५ ऑक्टोबर-** सप्तरात्रोत्सवारंभ

**मुहूर्त:-** * ( पक्ष पंधरवाडा असल्याने या सप्ताहात साखरपुडा, डोहाळ जेवण आदि मूहूर्त नाहीत.)

### मेष :- स्पर्धांमध्ये विजय

नशीब केवळ आपल्या परिश्रमातून बदलत असते. केवळ विचार करीत बसण्याने नाही. सोमवारी पष्ठात रवि- बुधाची युती होत आहे. अंगीकृत कार्यात समाधानकारक यश मिळेल. कौटुंबिक जीवनात आनंददायी घटना घडतील. आर्थिकदृष्टया समाधानकारक घटना घडतील. नव्या विचारांना चालना मिळेल. शुभ ता. २९, ३

### वृषभ:- सुख-स्वास्थ लाभेल

मित्रत्त्व कोणता स्वार्थ नाही तर एक विश्वास आहे. पंचमात होणारी रवि-बुधाची युती शिक्षण, अनुभवातून प्रगती करणारी आहे. आत्मविश्वासाने वाटचाल करावी. खर्च वाढले तरी प्राप्तीही तशीच मनासारखी होत जाईल. नव्या कामांना गती मिळेल. कला-गुणांचा विकास होत जाईल. नव्या संधींचे स्वागत करावे. कौटुंबिक जीवनात सुखस्वास्थ लाभेल. शुभ ता. २९

### मिथुन:- कलेचा गौरव

चांगले करणे म्हणजे कर्तव्य नाही तर एक आनंद आहे. सुखस्थानी रवि-बुधाची युती होत आहे. त्यामुळे स्थावर, वाहन सौख्य लाभेल. उत्साह, धडाडीने विविध कामे मार्गी लावू शकाल. धार्मिक, सामाजिक कार्यात सहभागी व्हाल. कौटुंबिक जीवनात समंजस्याने रहावे. कार्यक्षेत्रात प्रत्येक निर्णय विचाराने घ्यावा. कलेचा गौरव होईल. शुभ ता. ३

### कर्क:- अपेक्षीत संधी

चांगलेपणा आपल्या स्वास्थ, सुखाची वृध्दि करणारा आहे. पराक्रमस्थानी रवि-बुधाची युती होत आहे. अपेक्षित संधी लाभत जाईल. वेळीच लाभ उठवावा. शरीरिक तक्रारींकडे दुर्लक्ष करू नये. प्रकृतीसाठी खर्च करावा लागेल. ज्ञानदान, बॅक, विमा क्षेत्रात अपेक्षीत प्रगती होईल. कौटुंबिक जीवनात सुख स्वास्थ लाभेल. नव्या संधी लाभतील. प्रगतीच्या घटना. शुभ ता. २९, ३

### सिंह:- सरकारी कामे होतील

जे नशिबात आहे ते स्वतःहून मिळेल. जे नाही ते येत नाही, निघून जाईल. धनस्थानी रवि- बुधाची युती होत आहे. सरकारी कामे मनासारखी होतील. नव्या संधींचे स्वागत करावे. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नये. कला-गुणांचा विकास होईल. वैद्यकिय, कृषि, मेकॅनिकल अशा क्षेत्रात विशेष चांगला कालावधी राहिल. अपेक्षित फलप्राप्ती होईल. शुभ ता. ३

### कन्या:- धैर्याने सामोरे जाल

जीवन एवढे चांगले असते तर आपण जीवनात रडत रडत आलो नसतो. राशीतच सोमवारी रवि- बुधाची युती होत आहे. त्यामुळे आत्मविश्वासाने कोणत्याही प्रसंगाला धैर्याने सामोरे जाऊ शकाल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. धार्मिक कार्यात पुढाकार घ्याल. स्पर्धांमध्ये यश मिळेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. गायन, वादन कलेत अनुकूलता. शुभ ता. २९

### तुला:- सुखस्वास्थ लाभेल

जीवन वाईट असले तर जाताना कोणी कोणाला रडविले नसते. राशी स्वामी शुक्र आपल्या राशीतच आहे. त्यामुळे प्राप्त परिस्थितीत सर्वच गोष्टींतून आनंद मिळवू शकाल. विविध समस्यांवर मात कराल. गृहनिर्माण, विधी अशा क्षेत्रात विशेष अनुकूलता राहील. सुखस्वास्थ लाभेल. चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. शुभ ता. २९, ३

### वृश्चिक:- फार चिंता करू नका

सहनशिलतेची मर्यादा जेव्हा संपते, तेव्हा मन कणखर बनत असते. लाभस्थानी रवि-बुधाची युती होत आहे. त्यामुळे आर्थिक बाबतीत अनुकूलता राहिल. शनि-मंगळ प्रतिकुल असले तरी फार चिंता करून नका. वेळीच मार्ग निघत जाईल. नवे विचार विचाराने स्विकारावेत. नव्या कामांना गती मिळेल. नव्या संधी विचाराने स्विकाराव्यात. दगदग टाळावी. शुभ ता. २९

### धनु:- समाधानकारक घटना

कणखर मनावर कोणत्याही सहानुभूतीचा परिणाम होत नसतो. कर्मस्थानी रवि-बुधाची युती होत आहे. त्यामुळे कार्यक्षेत्रात सामाधानकारक घटना घडतील. स्थावर प्रश्न वाढवू नका. विचाराने रहावे. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. अपेक्षित संधी लाभतील. कलेतून अर्थाजन घडेल. नव्या कामांना गती मिळेल. प्रकृतीस सांभाळावे. शुभ ता. ३

### मकर:- आर्थिक स्थितीत सुधारणा

ज्या परिवारात सर्वजण एकमेकांचे हात पकडून चालतात, त्यांना कधी दुसऱ्याचे पाय धरण्याची गरज भासत नाही. भाग्यस्थानी रवि-बुधाची युती होत आहे. त्यामुळे अनुकूलता वाढत जाईल. कारखानदारी, गृहनिर्माण, विधी अशा क्षेत्रात असणार्यांची विशेष प्रगती होत जाईल. आर्थिकस्थितीत सुधारणा होत जाईल. हितशत्रूंवर मात कराल. प्रगती होईल. शुभ ता. ३

### कुंभ:- नव्या कामांना गती

समस्या आल्या नाहीत तर कोण आपले कोण परके हे समजणार कसे? राशी स्वामी शनि राशीत आहे. त्यामुळे चिकाटीने केलेले मार्गक्रमण विशेष शुभ फलदायी ठरेल. नव्या कामांना गती मिळेल. नव्या संधींचे स्वागत करावे. वैद्यकिय, संरक्षणादि क्षेत्रात प्रगती होईल. व्यवहार विचारपूर्वक करावेत. सरकारी कामांसाठी अधिक पाठपुरावा करावा लागेल. शुभ ता. ३

### मीन:- धास्ती बाळगू नका

पडायची भिती वाटत असेल तर पुढे चालणार कसे? चालत रहावे. सप्तमात रवि-बुधाची युती होत आहे. निष्ठेने वाटचाल चालू ठेवावी. प्रगतीचा मार्ग लाभेल. विनाकारण कोणतीही धास्ती बाळगू नका. सर्व परिस्थितीत आत्मविश्वासाने रहावे. प्रगतीच्या नव्या संधी लाभतील. सर्व व्यवहार विचारपूर्वक करावेत. अनुकूलता वाढेल. शुभ ता. २९, ३


!! शुभ भवतु !!

# तो हा महामेरू। ज्ञाना माझा।।

साधता संवाद

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी(वतनी)
भ्र. ९४०३०२९१७८

(भाग-४२)



खरं तर मानवी जीवन हे फार अनाकलनीय आहे. कधी काय होईल ते कुणालाच काही सांगता येत नाही. आपण आपलं कर्तव्य कर्म करत राहावं आणि सारा भार त्याच्यावर म्हणजे विठ्ठलावर सोपवावा. इतकं साधं सरळ सुखी जीवनाचं सुत्र आम्हाला संतांनी सांगितलं आहे. पण आम्ही पडलो अती हुशार केलेले कर्म विठ्ठलाला अर्पण करणे तर सोडाच पण करायचं वितभर आणि हे कर्म मी केलं म्हणून मिरवत दाखवायचं हातभर. 'मी'पणाचा अहंकार ठासून भरलेला आहे. आणि इथेच सारा गोंधळ होतो. आणि मग आपण विचार करतो एक आणि होतं मात्र भलतंच. यालाच सुरेश भट म्हणतात की,

**मनाप्रमाणे जगावयाचे किती किती छान बेत होते।**
**कुठे तरी मी जात होतो कुठे तरी दैव नेत होते।**

बऱ्याच वेळा आपण मोठे होण्याची स्वप्नं पाहतो पण नशिबी मात्र त्या स्वप्नांचा चकनाचूर होऊन भलतेच काही तरी भाळी येते.अशी आमची अवस्था होते. हे सगळे प्रब्धाचे खेळ असतात. अशावेळी जगद्गुरु तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे ती परिस्थिती बदलेपर्यंत **ठेविले अनंते तैसेची रहावे। चित्ती असू द्यावे समाधान।।** असे जगलो तरच सुखी होऊ, नाही तर जन्मभर दुःखाशिवाय हाती काहीच लागणार नाही.

आमच्या जन्मा सोबतच काही गोष्टी ह्या आपल्या देहाला चिकटून येतात. उदा. कर्म आणि मृत्यू हे जसे आमच्या देहाला चिकटून अगदी जन्मापासूनच आलेले असतात, पण आम्हाला त्याचा पूर्णपणे विसर पडतो आणि मी जसा काही अजरामरच आहे. कधी मरणारच नाही याच तोऱ्यात वागु लागतो आणि वेदनेचा किंवा दुःखाचा गुलाम होऊन जगु लागतो. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे ईश्वराने प्रत्येक माणसात जन्मतःच तीन गुण दिले आहेत ते म्हणजे सत्वगुण,रजोगुण व तमोगुण. पुढे माणूस जसा जसा मोठा होत जाईल आणि संस्काराने, संगतीने किंवा विचारसरणीने जो गुण प्रभावी होईल त्या वृत्तीचा तो बनतो.

**आता या त्रिगुणा विषयी थोडा विचार करू...**

**सत्वगूण** हा परावाणी म्हणजेच आकाशतत्वशी निगडित आहे.

**रजोगुण** हा तेजाशी म्हणजेच राजसुख, विलास, सुखासीन याच्याशी निगडित आहे. याच्यात अहंकार हा असतोच. आणि...

**तमोगुण** हा पृथ्वीशी म्हणजे जडत्वाशी निगडित आहे. हा तामसी, क्रोधी, रागीट, अहंकारी, अज्ञानी असतो. एवढेच नव्हे तर तमोगुण हा अज्ञानाचं प्रतिकच आहे. यात चंचल आणि आलस्य हा गुण असतो. खरं तर चंचलता व आलस्य हे दोन्ही विरूद्ध टोकं आहेत पण तमोगुणाची ही सहज प्रवृत्ती असते, आणि त्यातल्या त्यात आळस तर इतका तामसी आहे की तो मनुष्याला सतप्रवृत्तीकडे जाऊच देत नाही. कितीही प्रयत्न केला तरी तामस गुणाचा दुष्प्रवृत्तीकडेच ओढ असतो.

**सत्वगुण** हा मुळातच ऊर्ध्वगामी असतो. त्यामुळे तो आपल्या भौतिक व पारमार्थिक जीवनाला उन्नतच करतो. तर **तमोगुण** हा अधोगामी असतो त्यामुळे तो आपल्याला अवनत करतो. म्हणजे रसातळाला नेतो. **रजोगुण** हा मात्र मध्यभागी असतो. म्हणजे हा सत्वगुणाकडेही जातो आणि तमोगुणाकडेही जातो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे सम्राट अशोक होय. सम्राट अशोकांनी कलींगच्या युद्धानंतर तमोगुण तर सोडलाच सोडला पण रजोगुणही सोडला आणि ते सत्वगुणाकडे वळाले आणि श्रमण झाले. म्हणजे बौद्ध झाले. अशी उदाहरण फार थोडी आहेत.

थोडक्यात रजोगुण हा सत्वगुणाकडे जाऊ शकतो आणि तमोगुणाकडेही जाऊ शकतो पण तमोगुण हा तमोगुणांनीयुक्त राजस गुणांवर अधिकार गाजवून तो त्याला आपलंसं करतो. म्हणजे आपला तमोगुण न सोडता रजोगुणाचे फायदे मात्र घेतो. असे असले तरीही तमोगुण हा सत्वगुणाकडेही झेप घेऊ शकतो पण सत्वगुणाच्य सामर्थ्यामुळे तमोगुण हळूहळू कमी कमी होत जातो. यासाठी संतसंगती, संतकृपा, संतोपदेश प्रभावी ठरतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे महर्षी वाल्मिकी. त्यांना काही काळ नारदांचा (सहवास) लाभला त्यांनी 'राम नाम' जपण्याचा उपदेश केला आणि त्याचा वाल्याचा पुढे वाल्मिकी मुनी कसे झाले याचा सर्व इतिहास आपल्याला ज्ञात आहेच.

'**तमोगुण**' हा व्यक्तिकेंद्रित असतो, '**रजोगुण**' हा समुह केंद्रित असतो तर '**सत्वगुण**' हा समष्ठी केंद्रित असतो. **म्हणून संत हे समष्ठीचा विचार करणारे सत्वगुण संपन्न असतात.** त्यांच्या ठायी रजोगुण व तमोगुण यत्किंचितही नसतो. ज्याप्रमाणे सूर्य उगवला की जसा अंधार नाहीसा होतो त्याप्रमाणे सत्वगुणाच्या उदयामुळे रजोगुण व तमोगुण लुप्त होतात. हे तिन्ही गुण ईश्वरदत्तच आहेत. सृष्टी रचना अबाधित राहण्यासाठी हे तिन्ही गुण आवश्यकच आहेत. पण आमच्या धर्मशास्त्राप्रमाणे व्यक्तिगत अभ्यूदयाबरोबरच व्यष्ठीचा व समष्ठीचाही अभ्यूदय होणे आवश्यक आहे आणि तो केवळ सत्वगुणामुळेच घडतो.

तमोगुण हा व्यक्तिगत विकासासाठी उपयुक्त ठरतो पण व्यष्ठीच्या व समष्ठीच्या विकासासाठी उपयुक्त ठरू शकत नाही.

रजोगुण हा व्यक्तिगत विकासासाठी व विकासासाठी उपयुक्त ठरतो पण व्यष्ठीच्या विकासासाठी उपयुक्त ठरेलच असे नाही. पण **सत्वगुण** मात्र व्यक्तिगत विकासा बरोबच व्यष्ठीच्या व समष्ठीच्या विकासासाठी फारच उपयुक्त असतो. म्हणूनच आमचा **तमोगुणाकडून सत्वगुणाकडे होणारा प्रवास म्हणजेच अध्यात्मिक किंवा पारमार्थिक प्रवास होय.** ऐहिक जीवन जगतांना विशिष्ट प्रसंगी तमोगुण व रजोगुण हे आवश्यक असतातच पण जीवनात त्यांचे प्रमाण चवीपुरत्या मिठाइतकेच असावे.

अर्जुनाचा जो विषाद होता तो या त्रिगुणांच्या असंतुलित संयोगामुळे झाला होता. म्हणून भगवंतांनी त्याला तमोगुण व रजोगुणयुक्त क्षात्रधर्माचा अंगिकार करायला सांगितला. रजोगुण दुप्पट करण्यासाठी तमोगुणाचा उपयोग झाला. म्हणजेच सांसारिक जीवन जगताना चवीपुरते रजोगुण व तमोगुण असणे आवश्यक आहेत. पण सत्वगणाला मात्र अशी मर्यादा नाही. कारण सत्वगुणामुळे संसार व पलमार्थही करता तर येतोच, पण मनुष्य जन्माचे जे मुळ ध्येय आहे त्या मोक्षाकडे सुखरूप वाटचाल करता येते. उदा. समोर युद्धासाठी रावण उभा आहे. तो सराखा बाणांचा वर्षाव करत आहे आणि प्रभु रामचंद्र मात्र त्याच्याकडे पाहून स्मित करत आहेत. त्यांना क्रोधच येत नाही. तेव्हा लक्ष्मण म्हणतात की, दादा, असे स्मित काय करता? समोर शत्रू उभा आहे. करा प्रतिकार. तेव्हा प्रभु म्हणतात की, काय करू लक्ष्मणा मला क्रोधच येत नाही रे? त्यानंतर प्रभुंनी क्रोध देवतेला आवाहन करावे लागले. त्यावेळी प्रभु रामचंद्रांच्या सत्वगुणाचा एवढा धाक असतो की, क्रोध देवता थरथर कापत प्रकट होते, आणि काय आज्ञा आहे प्रभु? म्हणून हात जोडून उभी राहते. तेव्हा तिला प्रभु म्हणतात की, समोर शत्रू उभा आहे. तू माझ्या अंत:करणात काही काळासाठी विराजमान हो, आणि शत्रूचा नाश झाल्याबरोबर तू आल्या पावली निघून जा. जशी आज्ञा प्रभु. असे म्हणत क्रोध देवता प्रभुंच्या अंत:करणात विराजमान झाली. आणि प्रभुंनी रावणाचा अंत केला.

**रजोगुणासाठी:-** सम्राट हर्षवर्धन हे सत्वगुणाकडे झुकलेले आहेत, पण त्यांनी रजोगुणाचाही कसा उपयोग केला याचे उदाहरण म्हणजे ते वर्षभर कराच्या रूपाने किंवा अन्य रूपाने प्रजेकडून संपत्ती गोळा करत व वर्षाच्या एका विशिष्ट दिवशी ती सर्व संपत्ती सर्व प्रजा जनांना राज वस्त्रासकट कसलाही भेदभाव न करता मुक्तहस्ते वाटप करून टाकायचे. **हा रजोगुणाचा सत्वगुणाकडे झुकलेला उत्तम उपयोग आहे.** नंतर सम्राट हर्षवर्धन बहिणींने दिलेली राजवस्त्रे परिधान करून पुन्हा वर्षभर राजकारभार करायचे. कर्ण तर तमोगुणाकडून रजोगुणाकडून सत्वगुणाकडे जाणारे उत्तम उदाहरण आहे. सत्वगुण म्हणजे ज्ञानाकडे झुकलेला आहे. कर्णाचा प्राण जायच्या वेळेला त्याच्याकडे युध्दात मारल्या गेलेल्या यो सैनिकाचा बाप अंत्यसंस्कार करण्यासाठी दान मागण्यासाठी येतो. तेव्हा क्षणाचाही विलंब न करता कर्ण आपल्या मुलाला माझे समोरचे दोन सोन्याचे दात काढून या याचकाला द्यायला सांगितले. तमोगुणाकडून सत्वगुणाकडे गेलेले उत्तम उदाहरण म्हणजे वाल्याचा महर्षी वाल्मिकी होणे होय. त्यांच्यात रजोगुण आलाच नाही. तो वगळलाच आहे.

थोडक्यात सज्जनहो, मुळात आपण तमोगुणी असो की रजोगुणी असो सत्वगुणी होण्यासाठी आपण काय केले पाहिजे याचा विचार मी माझ्या अल्पशा बुद्धीला जसा जमेल तसा **तो हा महामेरू । ज्ञाना माझा ।।** या अभंग रचनेत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचे थोडे सविस्तर विवेचन करू. **(क्रमशः)**

पान २ वरून

# संतांनी सांगितलेला आचारधर्म...

वेदविहित जीवन जगावे व विहितच कर्म करावे. जोपर्यंत देह बुद्धीशी एकरूपता किंवा तादात्म्य भावना असेल तोपर्यंत प्रत्येक जीवाकडून कर्म घडणे अपरिहार्य आहे. आज जी सुखदुःख प्राप्त झालेली आहेत ती मागच्या बऱ्यावाईट कर्माची फळे आहेत. आता जी आणि जशी कर्मे आपण आचरणात आणू त्यानुसार पुढे फळ मिळेल. वेदनिषिद्ध कर्माला 'पाप' म्हणतात आणि वेदविहित आचरणाला 'पुण्य' म्हणतात. म्हणूनच पाप आणि पुण्य हे बुद्धिगम्य नसून शास्त्रगम्य आहे. बुद्धीने चांगले-वाईट ठरविलेल्या किंवा मानलेल्या कर्मांना किंवा आचरणाला पाप म्हणता येणार नाही. त्यासाठी वेद काय सांगतात ते आचरावे. वेदविहित कर्मे करावीत. पाप करणारा राजा जरी असला, तरी त्याचे आचरण चांगले नसेल तर त्याला एक दिवस रंक व्हावे लागेल. राजा किंवा कोणत्याही जबाबदार व्यक्तीने कसे वागावे त्याचा आचारधर्म कसा असावा, याविषयी तुकाराम महाराज सांगतातजया शिरी कारभार। बुद्धी सार तयाची।। वर्ते तैसे वर्ते जन। बहुतां गुण तयाचा ।। (तु. गा. २७२१) सर्व संतांनी वेदप्रामाण्य, धर्मानुष्ठान, ईश्वरकारणवाद, हरिभक्ती या मूल्यांचा पुरस्कार केला. व्यक्तिगत उत्कर्षाकरिताच नव्हे तर समाजातील नैतिक स्थैर्याकरितादेखील आज सर्व समाज व देशाला या मूल्यांची गरज आहे. कुटुंबप्रमुखाने केलेल्या अनैतिक कार्याचे दुष्परिणाम जसे सर्व कुटुंबाला भोगावे लागतात.

पान ५ वरून


# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

का कदाचित त्यांचे आपल्याकडे लक्ष जाणार नाही म्हणून काय झाले पण या एका क्षणा करतात मी स्वतःला जास्त आकर्षक बनवेल माझ्या चेहऱ्यावरील ओढणी दूर करून मी त्यांच्याकडे पाहीन माझ्याकडे जे काही सर्वोत्तम आहे ते मला त्यांना द्यायचे आहे. झाले! त्यांचे दर्शन झाले. माझ्या गळ्यात असणारी लाल कंठी मी त्यांच्याकडे फेकली. त्यांचे माझ्याकडे लक्ष गेले नाही. पण जाऊ दे. त्यांचे लक्ष त्या कंठीकडेही गेले नाही. हरकत नाही. ती त्या मिरवणुकीच्या गडबडीत पायाखाली तुडवली गेली. हे कळले मला. पण ती माती बघ. त्या कंठीमुळे लाल लाल झाली. ती कोणी दिली आहे हे कोणाला सुद्धा कळले नाही. पण ही गोष्ट महत्त्वाची नाहीच. त्यांचे दर्शन घेत असताना मला माझ्याकडीलचे सर्वोत्तम आहे ते देता आले याचा आनंद आहे. किती सुंदर समर्पणाची भावना आहे या कवितेत. या कवितेतील राजकुमार म्हणजे परमेश्वराचे प्रतीक आहे. रवींद्रनाथांचे आयुष्य म्हणजे जणू ही कविताच असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. ते स्वतः ही कविता जगले. आपल्याजवळील जे जे उत्तम, ते ते त्यांनी परमेश्वराला अर्पण केले. जीवनावर असे रसरसून प्रेम करणारी माणसे विरळी. जीवनाप्रती असे प्रेम आणि संपूर्ण समर्पण असल्याशिवाय जीवन जगण्याची कला साधत नाही. असे जगता येणे ही सुद्धा एक कला आहे. या परमेश्वराने आयोजित केलेल्या विश्वरूपी उत्सवात आपल्या कलेचे दर्शन घडवण्याचा ध्यास हवा असे त्यांचे म्हणणे होते.

रवींद्रनाथांच्या इंग्रजीतील 'गीतांजली'चा पहिला मराठी अनुवाद प्रसिद्ध कादंबरीकार हरि नारायण आपटे यांनी १९१७ मध्ये केला. त्याचप्रमाणे बंगालीतील 'अभंग गीतांजली' वामन मंगेश दुभाषी यांनी मराठीत आणली. यानंतर त्र्यंबक रघुनाथ देवगिरीकर, काका कालेलकर आणि राम म्हैसाळकर यांनीही गीतांजलीचे गद्य अनुवाद प्रकाशित केले आहेत. गोविंद वासुदेव कानिटकर यांनी देखील इंग्रजीत अनुवाद केला आहे. प्रा. नरेंद्र जाधव यांनी देखील टागोरांच्या कवितांचा सुरेख अनुवाद केला आहे. खरंतर बंगाली भाषेतील लय आणि शब्द यांची जादू अनुवादात पकडणे अवघड आहे पण तरीसुद्धा अशा अनुवादातून त्यातील उदात्त असा आशय आपल्यापर्यंत सहजपणे पोहोचतो. जे साहित्य जीवनावर प्रेम करायला शिकवते आणि माणूसधर्म शिकवते तेच खरे शिक्षण असे त्यांना वाटत होते. परंतु अशा शिक्षणाचा अभाव असल्यामुळेच आपल्या देशाची प्रगती होऊ शकली नाही याची खंत त्यांना होती. त्यासाठीच तर त्यांनी शांतीनिकेतनची स्थापना केली होती. जीवनात कितीही अडचणी, अडथळे आले तरी खचून जाऊ नये, निराश होऊ नये अशी आपली वृत्ती असावी. त्याप्रमाणेच ते आयुष्यभर वागले. आपल्या ध्येयाशी ते ठाम राहिले. विचलित झाले नाहीत.त्यांची एक कविता अतिशय सुंदर आणि प्रेरणा देणारी आहे. जदी तोर डाक शुने केउ ना आशे, तबे एकला चलो रे। एकला चालो, एकला चालो, एकला चालो रे।। म्हणजेच...तुझी हाक ऐकून कोणी आले नाही तर तू एकटाच चालू लाग. अरे, एकटाच चालू लाग. तुझ्याशी कोणी शब्दसुद्धा बोलले नाही, तर तू एकटाच चालू लाग. सारे जण भय वाटून, तोंड फिरवून बसले, तर काळीज उघडून मनातील गोष्टी स्वतःचीच मोकळेपणाने बोल. (क्रमशः)

पान २ वरून

# एक चिरंतन उपेक्षित...



जणू ते हिंदी चित्रपटसृष्टीचे मुखपत्र बनले. फिल्म फेअर हे भाषा, मजकूर विषयांची विविधता व चित्रपटांच्या विविध अंगांचा घेतलेला रसिला आढावा यासाठी अल्पावधीतच ओळखल्या जाऊ लागले. चित्रपटाच्या कलात्मक व तांत्रिक बाजूंचा घेतलेला वेध, उत्तम छपाई, कुशल विपणन ही फिल्म फेअरची वैशिष्ट्ये होती. फक्त एकच बाब, फिल्मफेअरच्या सर्वंकष प्रभावास आडकाठी करत होती ती म्हणजे हे नियतकालिक फक्त इंग्रजी भाषेत प्रकाशित होत होते. जनसामान्यांच्या इच्छा व बृहत क्षेत्रात प्रभाव निर्माण करण्यासाठी टाईम्स वृत्त समूहाने 'माधुरी' हे दर्जेदार हिंदी भाषिक नियतकालिक १९६४ च्या प्रजासत्ताक दिनाच्या मुहूर्तावर प्रकाशित करण्यास सुरुवात केली. प्रारंभी या नियतकालिकाचे नाव 'सुचित्रा' होते. हिंदी भाषेत समानार्थी व समांतर शब्दकोश निर्माण करणारे अरविंदकुमार हे त्यांचे प्रारंभापासून दीर्घकाळ मुख्य संपादक होते. पण माधुरी हे नियतकालिक विनोद तिवारी व लच्छीराम चौधरी या प्रचंड कुशल उपसंपादकांच्या अथक परिश्रम व ज्ञानाच्या बळावर उभे राहिले, ही वस्तुस्थिती. 'माधुरी'चा साहित्यिक दर्जा व एकंदरीत शिष्ट दृष्टिकोन विशेष उल्लेखनीय! १९७० च्या सुमारास चित्रपटांचा हलक्या फुलक्या व चुरचुरीत शैलीत परामर्ष घेणारे 'स्टार डस्ट' व 'स्टार ॲन्ड स्टाईल', 'मूव्ही' या मासिकांचा बोलबाला सुरू झाला. देवयानी चौबळ यांनी चित्रपट सिताऱ्यांच्या वैयक्तिक आयुष्याच्या दंतकथा करणारी व त्यांना अति-मानव म्हणून प्रस्तुत करणारी पत्रकारिता सुरू केली व चित्रपट नियतकालिकांचे वेगळे आयाम मुखर केले. १९७४ साली उदयास आलेले 'मायापुरी' दिल्लीहून प्रकाशित होणारे 'सुषमा' ही नियतकालिके समाजाच्या बृहत जनसामान्यांना केंद्रिभूत ठेवून कार्यान्वित होती.

मराठी भाषेत 'रसरंग' व तद्नंतर चित्रपटांचा बृहत ज्ञानकोश इसाक मुजावर संपादित 'चित्रानंद' या नियतकालिकांनी सभ्यपणा, मर्यादा व शुचित्व जपून स्तरीय चित्रपट पत्रकारिता केली. १९९० च्या दशकात वजू कोटक यांच्या 'जी' चित्रपट नियतकालिकाने उज्ज्वल परंपरा निर्माण केली; पण ते अचानकच बंद पडले. 'तारांगण' हे सद्यस्थितीत प्रकाशित होणारे दर्जेदार मराठी चित्रपट नियतकालिक! आवर्जून उल्लेख करावा असा संपूर्णत: चित्रपटांना वाहिलेला 'कमांडर' हा अतीव दर्जेदार मराठी दिवाळी अंक. राजू पाटोदकर हे ज्ञानी, उत्साही व साक्षेपी कलावंत मनाचे उमदे संपादक सातत्याने चित्रपटांच्या विविध अंगांचा सांगोपांग अभ्यास करणारे दर्जेदार दिवाळी अंक अतीव निष्ठेने व परिश्रमाने प्रकाशित करतात. छापील माध्यमांना लागलेली घरघर, चित्रपटांचे बदललेले स्वरूप, चित्रपटांसाठी जीव टाकणाऱ्या पिढीचा झालेला अस्त, माहिती व तीही क्षणार्धात मिळण्याची झालेली सोय या सर्व बाबींचा एकत्रित परिणाम म्हणून छापील चित्रपट नियतकालिके हळूहळू अस्तंगत होत आहेत. पण, या नियतकालिकांनी चित्रपट रसिकांच्या मनात वर्षानुवर्षे फुलवलेले इंद्रधनुष्यी रंग, सदैव टवटवीत राहतील. (लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत.)

सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

# कर्तृत्वाचा अहवाल




मानवी कर्तृत्व त्याच्यानंतरही काळाच्या पटलावर ठसे उमटवू शकतं. त्याअर्थाने ते अजरामर करण्याची संधी आपल्या सगळ्यांच्या हाती असते. मात्र जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर कर्तृत्वाचा लेखाजोखा घेणे अपरिहार्य असते कारण कारकीर्द कधी उड्डाण घेते, कधी पडझड वाट्याला येते म्हणून आपटी खाते तर कधी फिनिक्स सारखी पुन्हा झेप घेते. यशापयशाचे थांबे प्रवासात लागणे अपरिहार्य असते. शिक्षणातील कर्तृत्व मोजायला गुण, टक्के असे मदतनीस असतात जे शाळा, महाविद्यालय आणि विद्यापीठासारख्या आखाड्यात जोखले जातात. मनाजोगते हासील झाले तर कौतुकाचे झेंडे आणि नापास झाल्यास स्वप्नांचे इमले जमीनदोस्त. नोकरीव्यवसायात पदोन्नती, सुखसोयी आणि सवलतींची बौछार, परदेशवाऱ्या, प्रसिद्धी म्हणजे कर्तृत्व सिद्ध करणे असे मानले जाते तर गर्दीतील एक चेहेरा होऊन संस्थेत अनामिक राहणारे संख्येने कमी नसतात. त्यांच्या वाट्याला नाही चिरा, नाही पणती अशी अवस्था येते. कौटुंबिक, राजकीय, सामाजिक कारकिर्दीमध्येही मैलाचे दगड स्थापित करता येतात.

आपल्याला अपेक्षित असे यश मिळाले नाही किंवा ठरविलेले साध्य झाले नाही तर आपण नवीन काही पावले टाकलीच नाहीत असा त्याचा संकेतार्थ होतो.

कारकिर्दीची इमारत बांधत असताना काही गोष्टी आवर्जून लक्षात ठेवायच्या असतात, तरच शिखर नजरेस पडते-

(१) संस्थेत कायम तुमचा पर्याय उपलब्ध असतो किंवा शोधला जाऊ शकतो, तेव्हा स्व-मूल्य वर्धिष्णू ठेवावे म्हणजे तुमचे स्थान अबाधित राहू शकते.

(२) यशामध्ये कायमच अपयशाचा आणि नकाराचा मोठा वाटा असतो.

(३) स्वजनांचे जाळे भरभक्कम असावे म्हणजे कष्ट/ प्रयत्न यशस्वी होऊ शकतात.

(४) शिक्षण आणि अनुभव हे कर्तृत्वाचे दोन निकष असतात. फक्त शिक्षण एका टप्प्यावर औपचारिकपणे थांबते, अनुभवाचे थर वाढत जातात.

(५) वर्तन आणि मनःसामर्थ्य यशाकडे जाण्याच्या पायऱ्या असतात आणि त्या कित्येकदा कौशल्यांपेक्षा/ क्षमतांपेक्षा महत्वाच्या असतात.

(६) नशीब नक्कीच यशामध्ये महत्वाची भूमिका बजावत असते, पण प्रयत्न आणि पूर्वतयारी त्या नशिबाची शक्यता वाढवितात.

(७) स्पर्धा नेहेमीच स्वतःशी असावी. कालपेक्षा आज आपण अधिक चांगले असावे. आपल्या क्षमतांना मागे टाकेल अशी आपली कायम तयारी असावी.

(८) आपला नावलौकिक आणि प्रतिष्ठा आपल्यासाठी कायम क्रमांक एकवर असायला हवे.

(९) वेळ हे सर्वात महत्वाचे संसाधन असल्याने आपल्या कामांचे अग्रक्रम विचारपूर्वक ठरवावेत.

(१०) स्व- विकास हे गंतव्य स्थान नसते, तर तो एक न-संपणारा अथक प्रवास असतो.

(११) बदलांना सामोरे जाणे हीच यशाची गुरुकिल्ली असते.

(१२) तुमचा आनंद सगळ्यात महत्वाचा असतो.

आपण शिक्षणाच्या मदतीने, अनुभवांच्या साहाय्याने कारकिर्दीची सुरुवात तर मोठ्या झोकात करतो आणि हळूहळू पण निश्चितपणे स्वप्ने साकार होतील याची खूणगाठ मनाशी घट्ट बाळगतो. मात्र सुरुवातीपासून काही कटू गोष्टी समजून घेत वाटचाल केली तर आपटी खाण्याची वेळ येत नाही.

(१) पुढे झेप घ्यायची असेल तर कौशल्यांइतकेच महत्व सहकाऱ्यांशी नाते टिकविण्याला असते.

(२) स्वतःची खास अशी प्रतिमा निर्माण केली की आपोआप इतरांपेक्षा आपल्याला वरचढ मानले जाते.

(३) प्रत्येक जबाबदारीत काही नावडते भाग असतात. त्यांनाही मनापासून हाताळले तर शिस्त असावी लागते.

(४) कामासाठी आवश्यक असलेली तांत्रिक कौशल्ये जरी शिक्षणातून मिळत असली तरीही माणसांना हाताळण्याची कौशल्ये शिकावी लागतात.

(५) शीर्षस्थ भूमिकांसाठी असाधारण गुण असावे लागतात.

(६) कामात नवं काही शिकायला मिळत नसेल तर बाहेर पडण्याच्या (बहिर्गमन) रस्त्याचा शोध घ्यावा हे उचित.

(७) स्वतःच्या बलस्थानांना आणि कमजोर स्थानांना अधून मधून चाचपत राहावे.

(८) हेतू/उद्दिष्ट्ये झाकोळली गेली असतील तर नवी शोधावी.

(९) तक्रारी करण्याच्या प्रवृत्तीवर आळा घालावा, इतरांना निर्हेतुक मदत करावी, कधी ना कधी ती उपयोगी पडते.

(१०) परिपूर्णतेचा ध्यास अथक बाळगावा.

(११) माणसे वाचायला,समजून घ्यायला सुरुवात करावी त्यामुळे नाती सघन होतात.

(१२) समस्येचे निराकरण करण्यास हातभार लावावा, भलेही ती तुमची प्रत्यक्ष जबाबदारी नसेल तरी.

(१३) मिळालेल्या प्रतिक्रियेचा, अभिप्रायाचा आदर करून स्वतःमध्ये अविरत सुधारणा करावी.

**हार याचा अर्थ पराभव असा घ्यायचा नसतो.**

कोणीही सकाळी उठताना मनाशी एक संकल्प करून दिवस सुरु करत नाही- आज अपयशी व्हायचं आहे.

आपण सगळेच अपयश टाळायचा प्रयत्न करतो. आणि बरेचजण त्या शिक्क्याला इतके घाबरतात की जणू अपयश म्हणजे शत्रू नंबर एक.

काही वेळा अपयश हा यशाचा एक महत्वपूर्ण घटक असतो.

**पण हे कां होतं?**

आपल्या मनोभूमीत एक व्याख्या घट्ट बसलीय- अपयश इज इक्वल टू पराभव!

**सत्य असं आहे-** बरीच यशस्वी मंडळी कसे अपयशी व्हायचे याचा मूलमंत्र जाणून असतात. योग्य प्रकारचे अपयश कसे हस्तगत करायचे याचे पाठ ते शिकले असतात. यालाच नव्या परिभाषेत स्मार्ट फेल्युअर म्हणतात. म्हणजे प्रत्येक हार वाईट असतेच असे नाही. काही वेळा आपल्या वाढीसाठी अपयश गरजेचे असते. अपयशाला कवटाळलं की यशाचे नवे टप्पे दृष्टीस पडू शकतात.

**१) प्रत्येक अपयश एकसारखे नसते-** अपयश तीन प्रकारचे असते. ते ध्यानी ठेवले की विकासाच्या वाटा खुल्या होतात.

२) अपयश स्मार्ट असावे. व्यावहारिक उत्तरे शोधली तर अपयशाचे रूपांतर यशात होऊ शकते. त्यांतून अधिक मोठया, अधिक आकर्षक जोखिमी उचलता येतात.

३) उत्तरदायित्व ही मोठी शक्ती असते. आपण जशी यशाची जबाबदारी घेतो, तद्वत हरलो म्हणजे आपण जबाबदार नाही असा अर्थ काढू नये. उत्तरदायित्व म्हणजे आपण अपयश मान्य करण्याची, स्वीकारण्याची जबाबदारी घेण्याची हिंमत दाखवितो.

**अपयशाशी नाते**

एमी एडमंडसन आपल्या नव्या पुस्तकात (राईट काइंड ऑफ रॉंग) म्हणतात- अपयशाशी आपले नाते नव्याने आखावे, जोखमी घेण्याचा आत्मविश्वास वाढवावा आणि प्रत्येक पीछेहाटीशी हातमिळवणी करावी. पुढे जात राहावे कारण अपयश भयप्रद नसतं. आपल्या यशामध्ये त्याचा अदृश्य वाटा असतो.

अपयश आणि यश कायम विरुद्धार्थी घेण्याची सवय आपल्याला लागलेली असते. अपयशाची संस्कृती आपल्याला दोन कप्प्यात विभागून ठेवते- एका कप्प्यात शिकविले जाते काय वाटेल ते झाले तरी अपयश टाळावे. आणि दुसरा कप्पा म्हणतो- आधी हार जगायला शीक, त्यासाठी वारंवार अपयशी होत राहा. अडचण एवढीच आहे या दोन्ही कप्प्यांना चांगल्या आणि वाईट अपयशांमध्ये फरक करता येत नाही. परिणामस्वरुप चांगल्या प्रकारे हरण्याची संधी आपण गमावून बसतो.

**त्या म्हणतात-** मी अपयश या संकल्पनेवर वर्षानुवर्षे संशोधन केलंय. अपयशाचा अभ्यास करण्यासाठी विचार, चर्चा आणि सराव या तिघांची चौकट तयार करावी. याबरोबर अपयशाचे तीन घटक लक्षात ठेवावे लागतात- मूलभूत, जटील (क्लिष्ट) आणि बुद्धिमान. आपले अनुत्पादक अपयश कमी करता आले पाहिजे आणि एखाद्या उफ क्षणापासून स्फूर्ती घेत कमाल कामगिरी करता आली पाहिजे. त्या पुढे असेही विधान करतात- आपण आणि आपल्या संस्थांनी स्खलनशीलता स्वीकारली पाहिजे, अपयश केव्हा गळाभेट घेत असते. मग टाळता येण्याजोग्या घावांना प्रतिबंधही घालता येतो. आपले आयुष्य जवळून बघता आले पाहिजे. ते शोषून घेता आले पाहिजे.

सतत टीकेचा सामना करावा लागला तर अपयशाचे फिलिंग येते. म्हणून लज्जा, दोषारोपण यांच्या जागी जीवनात शक्य असेल तितके कुतुहल, जिज्ञासा भरले तर व्यक्तिगत विकास संभवतो. मग अपयश या संकल्पनेकडे बघण्याचा चष्माच बदलून जातो.

भावनिक लवचिकता

मुझे मेरी सफलता से मत आँकिए,
मुझे इस बातसे आँकिए कि मैं कितनी बार
गिरा और फिर खड़ा हुआ!

हा विचार सतत केला तर मन सकारात्मकतेने भरून जाते.

**त्वरित सावरणे-**

आयुष्यात पीछेहाट ठरलेली असते पण कर्तृत्ववान माणसे त्यांतून त्वरित सावरतात. पडझड, आपटी खाणे यांत नवीन काही नसते पण कर्तृत्वाचा अहवाल लिहिताना कोणीही तशा प्रसंगांचा बोलबाला करीत नाही. सावरणे फक्त शारीरिक कुवतीवर अवलंबून नसते तर मानसिक आणि भावनिक लवचिकताही विचारात घ्यावी लागते.

या विषयी लिअँडर पेसचे विचार उदबोधक आहेत. तो म्हणतो, रडायला हरकत नाही. एकाकी वाटणे हेही मी समजू शकतो. स्वतःवर नाखूष असणेही मला अनुभवले असल्याने माहित आहे. निराशा, दुःख माझ्याही वाट्याला आलंय.

महत्वाचं हे आहे की त्या आघातामधून तुम्ही कसे आणि कितपत सावरता? काहीतरी गमावणे किंवा काहीतरी कमावणे यांतले सावरण्याचे क्षण किती असतात आणि पुढील टप्प्याकडे किती कमी वेळात तुम्ही वाटचाल करतात यांवर सगळे अवलंबून असते. हा आगे बढो चा कालावधी जितका कमी तितकी यशाची शक्यता बळावते.

आयुष्यातील आव्हानांना सामोरे जाताना स्वतःला किती मर्यादेपर्यंत ताणता येईल आणि परत जुन्या आकारावर स्थिर होता येईल ती असते लवचिकता. परीक्षा घेणाऱ्या विविध भावनिक प्रसंगांना आपण स्वीकारून अनुरूप प्रतिसाद देणे आपल्या हाती असते. याचा अर्थ भावनांचा कोंडमारा अभिप्रेत नाहीए. भावनांचा पूर्णतया अनुभव घेऊन मगच पुढले पाऊल टाकावे. मात्र ते ठाम असावे आणि मनाशी काहीतरी खूणगाठ बांधून टाकलेले असावे.

लहान बाळं भावनिकदृष्ट्या सक्षम असतात कारण ती मनाशी काही धरून ठेवीत नाहीत लगेच एका भावनेवरून दुसरी वर प्रवास सुरु करतात.

चार्ली मुंगेर यांचे तत्वज्ञान असे मानते- ईर्षा, प्रतिशोध, मत्सर, संताप अशा भावना विनाशक, अनर्थकारी असतात. आयुष्य घणाघाती घाव घालत असते. ते अन्यायकारी असतात. भयंकर असतात. काही त्यांतून सावरतात. बऱ्याचजणांना हे शक्य होत नाही. अशावेळी एपिक्टेटस यांचे विधान पटते. ते म्हणतात- आयुष्यातील अनपेक्षित दुर्दैवी घटना बरेचदा चांगले वर्तन दाखविण्याची संधीही देतात, नवं काही शिकण्याकडे अंगुलीनिर्देश करतात. अशावेळी आत्म-दया एखाद्याला बुडवून टाकू शकते. पण त्याच भयावह ठोशाने सकारात्मक, विधायक वागण्याची शिकवणही मिळू शकते. या कल्पनेचा क्षणभर विस्तार करून विचार करू या- कितीवेळा आपण नकळत नकारार्थी विचारांच्या विळख्यात गुंतून पडतो. निराशा आणि अपयश यांचे वेटोळे वारंवार स्वतःभोवती वेढून घेतो.

लिअँडर पेस वेगळा पर्याय सुचवितात, ते म्हणतात भावना स्पर्शून जातात तेव्हा त्यांना कवटाळावे आणि अलगद सोडून द्यावे. हे वाटते तितके सोपे नसते. त्यासाठी संयम, सराव आणि अनुकंपा यांची नितांत गरज असते. भावनेचा सन्मान आणि त्याचवेळी स्वतःचे स्थितीस्थापकत्व साधून सावरणे या सगळ्यांमधील समतोल साधणे अतिशय अवघड असते. मात्र या लवचिकतेतून फिरुनी नवी जन्मेन मी या वृत्तीची जोपासना करता यावी. मग वाटचाल ताकतीने आणि डौलदारपणे संभवते.

अमेरिकन मनानुभूतीचा प्रशिक्षक जॉन काबत-झिंन म्हणतो- तुम्ही लाटा थांबवू शकता पण पोहोणे जरूर शिकू शकता. म्हणून भावनेच्या लाटेला सामोरे जाताना नेहमी लक्षात ठेवावे- लाट टाळू नका, तिला सामोरे जा आणि तुम्ही कायम विजेते घोषित व्हाल.

अहवालात दोन्ही बाजू नमूद कराव्या लागतात तर प्रामाणिक चित्र दिसतं. बेरजेच्या रकान्यात काय साध्य केलं आणि कसं तर वजाबाकीच्या रकान्यात काय जमलं नाही आणि कां याचे खुलासे करावे लागतात. गमावणं आणि कमावणं यांची गोळाबेरीज शेवटी यशापयशाचे मापदंड ठरवीत असते. आणि त्यांच्या व्याख्या मुळातून सुस्पष्ट असाव्या लागतात तर गोंधळ उडत नाही. कर्तृत्वावर बरेवाईट शिक्के मारायला जग टपून बसलेलं असतं पण अंतरात्मा खरं, सच्च चित्र जाणून असतो. त्याला शरण जावं मग हा अहवाल अभिमानाने सादर करता येईल.



# निसर्गाबरोबर रहा, आयुर्वेदाचा जीवनमंत्र

आजीचा बटवा
नारायण कारंजकर
भ्र. ९४२३७५८४०१

दासबोध आणि समर्थ रामदासांचे अन्य वाङमय म्हणजे ज्ञानाचा सागर आहे. सागरात विविध प्रकारचे अगणित मोती असतात. परंतु ते शिंपले पाणबुड्याला त्यात बुडी घेऊन हुडकून काढावे लागतात किंवा सागराच्या परिसरातील वाळूमधून ते शोधून काढावे लागतात. तसे समर्थांच्या वाङमयातून ज्ञानाचे मोती शोधून काढावे लागतात.

जीवन कसे जगावे आणि कसे जगू नये, अध्यात्म, जन्म- मृत्यू, व्यवहार, अर्थकारण, राजकारण अशा असंख्य विषयासंबंधी असलेला हा ज्ञानाचा सागर आहे. त्यामध्ये ठिकठिकाणी असे दिसून येते की, समर्थ रामदास हे स्वतः अत्यंत निसर्गप्रेमी होते. डोंगर, नद्या, झाडे, वेली, फुले, पशु-पक्षी यावर त्यांनी अपार प्रेम केले आहे.

**प्रसन्नतेत खरे सुखः-**

माणसाचे जीवन सुखी असावे हाही एक प्रधान हेतू त्यांच्या निर्मिती मागे दिसून येतो. मनाच्या प्रसन्नतेत माणसाचे खरे सुख दडलेले असते आणि ही प्रसन्नता त्याच्या मनात सतत निर्माण होण्याची जी अनेक साधने आहेत, त्यामध्ये निसर्ग म्हणजेच वृक्षवल्ली याचे फार मोठे स्थान आहे. या गोष्टीचे समर्थ हे उत्तम जाणकार असल्याने त्यांनी स्वतः ही निसर्गावर व वृक्षवल्लीवर अपार प्रेम केले आणि ते ठिकठिकाणी पेरून ठेवले आहेत. 'दास डोंगरी राहतो' या त्यांच्या स्वतः विषयीच्या लिखाणातून तसेच तपोवन, आनंदवन यासारख्या नामविधानामधूनही ही गोष्ट लक्षात येते.

परळीला समर्थांनी मठ स्थापन केला. तेव्हा त्यांनी निवासस्थान कसे असावे हे लिहिले आहे. 'बाग प्रकरण' म्हणून ते प्रसिध्द आहे. आजही त्यातील शक्य तो भाग आचरणात आणण्यासारखा आहे. इ.स. १६६१ च्या सुमारास समर्थ रामदासानी चाफळ येथे श्रीरामाचे मंदिर उभारले. वास्तविक तेथे त्यापूर्वी स्मशान होते. परंतु त्याची स्मशानकळा घालवून त्यांनी तेथे नंदनवन फुलविले.

आकाश काय किंवा निसर्ग काय, याचा विस्तार अमाप आहे. माणसाने त्या निसर्गाच्या सानिध्यात जास्तीतजास्त राहून मनाने विशाल व्हावे, किंवा विशाल दृष्टीने जगाकडे पहायला शिकणे हा त्यांच्या मनातील भावार्थ असावा, असे वाटते.

**निसर्गाकडे जा...**

मनोबोध किंवा मनाचे श्लोक समर्थांनी केलेले आहेत. माणसाचे मन प्रसन्न नसेल तर जीवनात त्याला कशातच राम वाटणार नाही. तेव्हा त्यांच्या जीवनात हा राम निर्माण व्हावा. याकरिताही मनाच्या श्लोकामध्ये त्यांनी अधूनमधून मानवाला निसर्गाकडे जाण्याचा सल्ला दिला आहे.

**'नसे राम ते. धाम सोडून द्यावे। सुखा लागी आरण्य सेवित जावे।।** तसेच 'मना चाल उठी वना दुर्गमाते'. असेही दुसऱ्या ठिकाणी समर्थांनी म्हटले आहे. याचा अर्थ घरदार, कामधंदा सोडून माणसाने वनात जाऊन राहावे, असा नाही. पण अधूनमधून तरी त्याने निसर्ग सानिध्यात जावे. निसर्गाचे सानिध्यात गेल्याने मन आनंददायी होते. चिंतन, एकांतवासाने होईलच पण त्याचबरोबर या निसर्गातील पशु-पक्षी, वनस्पती यांचाही परिचय घडेल.

समर्थांनी लिहिलेल्या सुंदरकांड आणि युध्दकांड या प्रकरणामध्ये निसर्ग, नद्या, पर्वत, झाडे यांची सुंदर तर कांही ठिकाणी रौद्र स्वरूपातील वर्णने आलेली आहेत.

**झाडे लावणे, सत्त्व गुणः-**

समर्थांनी सत्त्व, रज, तम वगैरे गुणाविषयी बरेच लिहिलेले आहे. बागा करणे, झाडे लावणे, घरात तुळशी वृंदावन असणे, अशाना त्यांनी सत्त्वगुणात गुंफले आहे. त्यांनी चंदनासारखी झाडे कमी असतात पण शेरबाभळी मात्र उदंड वाढतात हा दृष्टांत चांगल्याची निर्मिती ही इतराचे मानाने कमीच असते याकरिता दिलेला आहे.

झाडाच्या मुळाशी पाणी घालणे म्हणजे अंतरात्म्याची उपासना करण्यासारखे आहे. तर झाडाच्या शेंड्यास पाणी घालणे हे उपास्य देवतेची उपासना करण्यासारखे आहे. असा विचार त्यांनी तुळस आणि मोठी झाडे व त्यांना घालण्यात येणारे पाणी त्याच्या माध्यमातून मांडला आहे.

माणसे जन्माला येतील आणि जातील पण मग त्याने कसे व्हावे तर चंदनासारखे अशी समर्थांची अपेक्षा आहे. पण चंदन झाले तरी ते झिजल्यावाचून त्याचा सुगंध लोकांना कळू शकत नाही.

**'वृक्षमहात्म्य' मोठेः-**

प्राणीमात्रांचे जीवन वनस्पतीवरच आहे. मानवांवर तर वृक्ष किती मोठे उपकार करीत आहेत. वृक्ष आपले जीवनदाते आहेत. वर्षानुवर्षे एका जागी ऊन-पावसात उभे राहून ते सेवा करीत असतात. 'वृक्ष महात्म्य' फार मोठे आहे. आयुर्वेदाची उभारणी तर पूर्णतः वनौषधीवर झाली आहे. आयुर्वेदाची भूमिका निसर्गाशी सुसंगत तर आहे. त्यामुळे ती अधिक नैसर्गिक आहे. ज्या परिसरात माणूस जन्म घेतो ते हवामान, त्या परिसरात वाढणाऱ्या वनस्पती त्या परिसरात पिकणारी धान्ये, त्या परिसरातील पाणी अशा कितीतरी गोष्टी सुसंगत असतात. त्याची योग्य ती सांगड आयुर्वेद घालतो.

**निसर्गाबरोबर रहा...:-**

निसर्ग नियमांना धरून माणसाने आपल्या परिसरातील धान्याचा वापर करावा. परिसरातील वनस्पतीच औषध म्हणून वापराव्या. त्याच त्याला तारक असतात. कोकणी माणूस भातावर जगतो, तर सोलापूर, सांगली भागात ज्वारीची भाकरी इष्ट असते. देशावर चपाती पचते. एकूण विचार करता निसर्गाबरोबर रहा निसर्गनियम पाळा, असे आयुर्वेद सांगतो.

आयुर्वेदाचा हा जीवनमंत्र आहे. मन मानेल तसे वागण्याने आरोग्याचा अकारण हास होतो. आयुर्वेद अतिप्राचीन असल्यामुळे आयुर्वेदिक संशोधन पूर्णावस्थेत नाही, अशी प्रचलित समजूत आहे. परंतु शरीरशास्त्राचा अभ्यास प्राचीन काळी पूर्णत्वास गेलेला होता. वाग्भट, चरक, सुश्रुत आदि ग्रंथावरून ते आढळून येते.

**आयुर्वेदाचे महत्त्वः-**

'पी हळद नि हो गोरी' अशी एक म्हण आहे. आयुर्वेदिक उपचार असे झटपट रंगारी नाहीत. नव्या झटपट औषधोपचारामुळे आयुर्वेद चिकित्सेवर फार मोठा आघात झाला आहे. वरवर किंवा तात्कालिक परिणामांच्या दृष्टीने अशी औषधे परिणामकारक आहेत, परंतु मूळ रोगापर्यंत तो जात नाहीत.

उदाहरणार्थ- डोके दुखी, डोकेदुखीचे मूळ शोधून ते दूर केल्याने डोकेदुखी कायमची बरी होते. पोटाचे विकार हेही त्याच धर्तीचे आहेत. मूळ आतड्यातील अनेक क्रिया. अशक्तपणा, यामुळे ताप, अपचन, सर्दी असे अनेक रोग उद्भवतात. यासाठी दीर्घकालीन असली तरी आयुर्वेदिक उपाययोजना परिणामकारक ठरते.

कांही जुनाट रोगावर आयुर्वेदिक औषधे वेळीच घेतली तर उत्तम उपायकारक ठरतात. परंतु इतर सर्व उपचार करून थकल्यावर रोगी वैद्याकडे गेलेला आढळतो. आयुर्वेदिक औषधे गुणकारी होण्यासाठी



त्यांचा ताजेपणा व खरेपणा इत्यादी गोष्टी महत्त्वाच्या आहेत. आज बाजारातील औषधांचा म्हणावा तसा गुण येत नाही. त्याचे कारण त्यातील जुनी औषधे वापरणेचा दोष, एकच पाठाचे औषध, अनेक कंपन्यानी केल्यावर त्यात वेगळेपणा आढळतो, ते खरे-खोटेपणामुळेच.

**घरी औषधे बनवाः-**

औषधे घरीच बनवली तर ती अधिक गुणकारी तर होतातच, पण स्वस्तही पडतात. 'आजीबाईचा बटवा'साठी घरगुती औषधोपचार करावयाचे असल्याने अशी औषधे घरीच बनवून ठेवावी. निश्चितच मोलाची ठरतात. ताप, खोकला, सर्दी, पोटदुखी, अपचन आदि नेहमीचेच आजार आहेत. अशा आजारावर सहजरित्या उपलब्ध व्हाव्या म्हणून अशा वनस्पती घराजवळ अवश्य लावाव्यात.

**आपली बाग फुलवाः -**

तुळस, बेल, दुर्वा, सुगंधी फुले -उदा. गुलाब, चाफा, निशीगंध, जाई-जुई, पारिजातक, इत्यादी फुलांचे सुगंध शरीरास आरोग्यकारक वाटतात. आपल्या बागेत, परड्यात गवती चहा, गुळवेल, ब्राम्ही, अडुळसा, आघाडा, पुदीना वनौषधी विपुल प्रमाणात असाव्यात. त्या उपयोगी तर पडतातच पण त्यांच्या सुगंधाने घराचे परिसरातील हवा शुध्द राहते.

**आजीबाईचा बटवाः-**

कीटक, होत नाहीत. तसेच रोज आपल्या घरात ऊद, चंदन, गुग्गुळ, धूप, कापूर यांचा वापर करावा. त्यामुळे घरातील वातावरण उत्तम राहून हवा शुध्द राहते. 'आजीबाईचा बटवा' सुरू होण्यासाठी अशा विविध वनौषधी घरोबरी उपलब्ध झाल्या पाहिजेत. ज्यांना शक्य आहे त्यांनी बराच्या अंगणात परड्यात, लहान-मोठ्या कुंड्यात अशा विविध वनस्पती आणून लावाव्यात. त्यांचे औषधी गुणधर्म माहीत झाले की त्यांचा औषधी उपयोगही केला जाईल.

विशेषतः भगिनी वर्गानि यासाठी पुढाकार घ्यावा. त्याच हे 'आजीबाईचा बटवा चालविण्याचे कार्य निष्ठेने करू शकतील. एकद करावयाचे ठरविले की काहीच अशक्य नाही. विविध उपक्रम त्यासाठी राबविता येतील.

**समाजप्रबोधनाचे कार्यः-**

सुदैवाने आपल्या सोलापुरात आयुर्वेद महाविद्यालय आहे. तसेच लहान-मोठ्या शहरी गावातही आयुर्वेदाचे जाणकार आहेत. त्यांची व्याख्याने आयोजिली गेली. वनौषधीचा परिचय करून घेतला तर त्याचा उपयोग करणे सहज शक्य आहे. या विषयावर मिळेल तेथून ज्ञान आत्मसात करावे. महिला मंडळांनी स्वयंसेवी संघटनांनी पुढाकार घेऊन हे कार्य करावे असे मला वाटते. हे समाज प्रबोधनाचे कार्य आहे. ते एका दिवसात होणार नाही पण त्या दिशेने प्रयत्न तरी व्हायला हवेत ना. वृत्तपत्रेही यासाठी मौलिक कामगिरी बजावू शकतील.

वनौषधी प्रदर्शने, वनौषधी. परिचय शिबिरे, व्याख्याने आदी प्रमाणे 'वनौषधी प्रचाराची मोहीम' सुरू झाली तर समाजात लाखमोलाचे कार्य होईल. निष्ठेने प्रामाणिकपणे कार्य करणारांची समाजात वानवा आहे, हे तर आपल्या समाजाचे दुःख आहे. ज्यांना आयुर्वेदाचे ज्ञान आहे, वनौषधीची जाण आहे, त्यांनी अवश्य पुढे यावे, त्यांचे सर्वत्र स्वागतच होईल.

# पोर्ट ब्लेअरचे श्रीविजयपुरम कशासाठी?



**देशाला गुलामगिरीच्या प्रतीकांपासून मुक्त करण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पापासून प्रेरित होऊन पोर्ट ब्लेअरचे नाव 'श्री विजयपुरम' करण्याचा निर्णय घेण्यात आला. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात आणि इतिहासात या बेटाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पूर्वीच्या नावाला वसाहतवादी वारसा होता. श्री विजयपुरम हे आपल्या स्वातंत्र्यलढ्यात मिळविलेल्या विजयाचे आणि त्यात अंदमान व निकोबार बेटांनी बजावलेल्या भूमिकेचे प्रतीक आहे.**


नोंद
डॉ. सच्चिदानंद शेवडे
साहित्यिक आणि व्याख्याते


ब्रिटिश भारत सोडून गेले; त्याला आता ७७ वर्षे झाली. आपण मात्र ब्रिटिशांनी आपल्या सोयीसाठी पोसलेल्या जुन्या आठवणींना कवटाळून बसलो आहोत. ब्रिटिशांनी इथल्या गावांना आणि शहरांना, त्यांनी बनवलेल्या इमारतींना, पुलांना आणि बंदरांना त्यांच्या अधिकाऱ्यांची, सैनिकांची आणि नेत्यांची नावे दिली. त्यांनी भारतावर प्रचंड अन्याय आणि अत्याचार केले. त्यांना दिलेले ते पुरस्कार होते. ते गुलामगिरीचे ओझे आपण आजही सोबत बाळगत आहोत. कदाचित सवयीने किंवा सहनशीलतेने किंवा उपेक्षेनेही. परंतु अशी नावे बदलण्याचा विषय येतो, तेव्हा त्याला विरोधच केला जातो.

आपण वर्षानुवर्षे वापरत आलेली नावे ठीकच आहेत की; नावे बदलून असा काय मोठा फरक पडणार, असा एक उदासीन विचार सातत्याने मांडला जातो. पण नाव बदलून काहीच होत नाही, ही कल्पनाच मुळी चुकीची आहे. नाव बदलल्याने खूप फरक पडतो. विशेषत: गुलामगिरीचा वास असलेल्या, अत्याचारांची आणि अन्यायाच्या आठवणी जागवणारी नावे तर बदलायलाच हवीत. कारण परकीयांनी दिलेल्या जखमा या व्रणासारख्या असतात. त्या आभूषणासारख्या मिरवायच्या नसतात. आपण नेमके त्याकडेच दुर्लक्ष करतो. त्या स्थानाला, त्या नावाला चिकटलेले ते व्रण, त्या जखमा भरून यायला हव्यात. तसे झाले तरच आपल्या अस्मिता जाग्या होतील.

स्वत्व जागे होईल. या देशाविषयी प्रत्येकाच्या मनाच्या कुपीत बंद असलेल्या प्रेमाला मुक्त मोकळा श्वास घेता येईल. खरे तर परकीयांनी दिलेली नावे बदलणे किंवा त्या इमारती पाडणे जगाच्या इतिहासात नवीन नाही. रशियापासून स्वतंत्र झाल्यानंतर पोलंडनेदेखील रशियाने बांधलेले चर्च तोडून त्याच जागी स्वत:चे नवीन चर्च बांधले. कारण त्यांना त्या चर्चशी जोडलेल्या कटू आठवणी पुसायच्या होत्या. 'सिलोन' हे नाव टाकून स्वत:चे 'श्रीलंका' हे नाव नव्याने व्यवहारात आणणे किंवा देशाच्या मूळ म्यानमार या नावाचा अभिमान वाटणे आणि म्हणून त्या नावाचा अंगीकार करणे हे खऱ्या देशप्रेमाचे लक्षण आहे. ते जोपासणे ही काळाची गरज आहे.

नेमकी हीच भावना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी हेरली आणि ब्रिटिशांनी मागे ठेवलेल्या या गुलामगिरीच्या प्रतीकांची नावे बदलून त्यांना या भूमीची, या मातीतली नावे देण्याचे कार्य हाती घेतले. ही एकूण ५३७ बेटांची साखळी आहे. त्यातील केवळ २२-२५ बेटांवर वस्ती आहे. बाकी सर्व बेटे अद्याप मानवी स्पर्शापासून दूर आहेत. अंदमान-निकोबारच्या या बेटांच्या शृंखलेत असलेल्या हॅवलॉक बेट, नील आयलॅण्ड आणि रॉस आयलॅण्ड या तीन बेटांची नावे २०१८ मध्ये मोदीजींनी बदलली. हॅवलॉक आणि नील हे अत्यंत क्रूर ब्रिटिश अधिकारी होते. १८५७ च्या युद्धात त्यांनी भारतीयांवर अनन्वित अत्याचार केले होते.

उत्तरप्रदेशमधल्या अनेक गावांमध्ये या सैतानांनी एकाही झाडाची एकही फांदी अशी ठेवली नव्हती, जिथे हिंदुस्तानी माणूस फासावर लटकावला नव्हता. त्यांच्या या पराक्रमाचे परितोषिक म्हणून ब्रिटिशांनी या बेटांना त्यांची नावे दिली. मोदीजींनी हॅवलॉक बेटाला 'स्वराज बेट', नील आयलॅण्डला 'शहीद बेट' आणि रॉस आयलॅण्डला 'नेताजी सुभाषचंद्र बोस' यांची नावे देऊन त्या बेटांना बिलगलेला काळा इतिहास पुसून टाकला आहे.

या बेटांच्या साखळीतल्या २० बेटांना परम वीरचक्रप्राप्त वीरांची नावे बहाल करून मोदी सरकारने भारतीयांचा अभिमान उंचावला आहे. या भूमिकेतूनच केंद्र सरकारने अंदमान-निकोबार बेटांची राजधानी असलेल्या पोर्ट ब्लेअरचं नाव बदलले. म्हणूनच पोर्ट ब्लेअर बंदर हे आता 'श्रीविजयपुरम' या नावाने ओळखले जाणार आहे. पोर्ट ब्लेअर शहर हे अंदमान आणि निकोबार बेटांचे प्रवेश केंद्र आहे.

ब्रिटिशांच्या नौदलातला एक सामान्य अधिकारी आर्चीबाल्ड ब्लेअर यांच्या नावावरून हे नाव देण्यात आले होते. डिसेंबर १७७८ मध्ये आर्चीबाल्ड ब्लेअर एलिझाबेथ आणि वाइपर या दोन जहाजांसह कोलकात्याहून अंदमानच्या पहिल्या सर्वेक्षणासाठी रवाना झाला. या मोहिमेदरम्यानच पूर्वेकडील किनाऱ्याने उत्तरेकडे जाताना त्याची जहाजे एका नैसर्गिक बंदरावर पोहोचली.

ब्लेअर यांना त्यांच्या शोधाचे महत्त्व लगेचच कळले आणि त्यांनी त्यांच्या सर्वेक्षणाचा सविस्तर अहवाल लिहिला. या अहवालाला ईस्ट इंडिया कंपनीतील अधिकाऱ्यांनी खूप सकारात्मक प्रतिसाद दिला आणि या बेटांवर वसाहत स्थापन करण्याचा निर्णय घेतला. पुढे या बेटाचे नाव आर्चीबाल्ड ब्लेयर नावावर ठेवण्यात आले. इथून मुख्यत: चाचेगिरीवर लक्ष ठेवणे सहजशक्य होते. जहाज बुडाल्यास वाचलेल्या लोकांसाठी आश्रयस्थान आणि इतर शक्तींशी शत्रुत्व झाल्यास त्यांचे अधिकारी आश्रय घेऊ शकतील अशी जागा म्हणून हे स्थान तयार करण्यात येणार होते. परंतु, गंभीर आजार आणि मृत्यूमुळे ही नवी वसाहत फार काळ टिकू शकली नाही.

१८५७ च्या उठावाच्या काळात ब्रिटिशांनी असंख्य लोकांना कैद केले होते. त्यामुळे पोर्ट ब्लेअरचे त्वरित नूतनीकरण आणि दंड वसाहत म्हणून पुनर्वसन करण्यात आले. बहुतेक कैद्यांना पोर्ट ब्लेअर येथे जन्मठेपेची शिक्षा दिली जाई. त्या तुरुंगात अनेकांना फाशी देण्यात आली होती तर अनेकांचा रोगामुळे आणि प्रदेशातील खराब परिस्थितीमुळे मृत्यू झाला होता. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय स्वातंत्र्य चळवळ तीव्र होत गेली. तेव्हा राजकैद्यांना ठेवण्यासाठी लवकरच अंदमानला एका मोठ्या सेल्युलर तुरुंगाची स्थापना करण्यात आली.

'काळे पाणी' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या जीवघेण्या सेल्युलर जेलमध्ये वीर विनायक दामोदर सावरकरांसह अनेक स्वातंत्र्य सैनिकांना कैद करून ठेवण्यात आले होते आणि त्यांचा अमानुष छळ करण्यात आला होता. किंबहुना, काळ्या पाण्याची शिक्षा भोगणारी व्यक्ती परत जीवित येतच नसे. पोर्ट ब्लेअरला श्रीविजयपुरम हे नाव देण्यामागे मोठा इतिहास आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात नेताजी सुभाषचंद्र बोस भारताचे पंतप्रधान म्हणून आझाद हिंद सेनेसह तिथे उतरले होते. ती बेटे जपान सरकारने नेताजींना म्हणजेच भारत सरकारला दिली होती. नेताजींनी या बेटांवर मिळविलेला हा आपला पहिला विजय होता.

नेताजी या बेटांवर आले तेव्हा या बेटांना स्वराज बेट आणि शहीद बेट ही नावे दिली होती. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्या असंख्य क्रांतिकारकांनी आणि स्वातंत्र्य सैनिकांनी तिथे शिक्षा भोगली आहे. आज स्वतंत्र भारताने हे नाव देऊन त्यांच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त केली आणि इतिहासाचा विचार करत औचित्य साधले. या बेटांचे भौगोलिक महत्त्व ओळखून सावरकरांनी अंदमान हे भारताचे खड्गहस्त व्हावे, ही सूचना केली होती. परंतु सरकारचे त्याकडे बराच काळ दुर्लक्ष झाले. मधल्या काळात न्यूझीलंडने या भागात हातपाय पसरण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर भारत सरकारने आपला नौदल तळ तिथे वसवला. अर्थातच त्या अनुषंगाने त्या बेटांवर विमानतळ आणि इतर आवश्यक सुविधाही निर्माण केल्या गेल्या. कोलकाता आणि चेन्नई ही दोन्ही राज्ये जवळ असल्यामुळे येथे बंगाली आणि तामिळी लोकांची वस्ती लक्षणीय आहे.

अलिकडे रोहिंग्या मुस्लिम इथे अतिक्रमण करू लागल्यामुळे सध्या शांत असलेला हा भाग पुढे अशांत होऊ शकतो. अर्थातच सध्याचे गृहखाते आणि पंतप्रधान मोदीजी इकडे नक्कीच जागरूकतेने पाहत असतील. हे नामांतरण व्हावे यासाठी मी स्वत: खूप प्रयत्न केला होता. याविषयी समाजमाध्यमातून जनजागृती करण्याचा प्रयत्न केला होता. दिल्लीहून माझ्याकडे बेटांचा इतिहास समजावून घेण्यासाठी विचारणाही केली गेली होती.

आज अशा या अंदमाननिकोबारच्या या राजधानीला अत्यंत सुयोग्य नाव प्राप्त झाले, याचा मला मनापासून आनंद आहे. मला निश्चितपणे वाटते की, एखादी गोष्ट चांगली होत असेल आणि ती कोणत्याही सरकारने केली असली, तरी सर्वांनी एकत्र येऊन त्या गोष्टीला पाठिंबा दिला पाहिजे. उगाचच विरोधाला विरोध करू नये. कारण योग्य गोष्टीसाठी सारे एकत्र आले तर देश प्रगतिपथावर जायला वेळ लागणार नाही.

# ऐतिहासिक बदलांना प्रारंभ

**'एक देश, एक निवडणूक' धोरणाला नुकतीच केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्याने विरोधकांना अपेक्षेप्रमाणे पोटशूळ उठला आहे. पण, यानिमित्ताने मोदी सरकारने आपल्या तिसर्या कार्यकाळातही देशातील ऐतिहासिक बदलांना प्रारंभ केला असून, रालोआसह त्यांचे नेतृत्वही भक्कम असल्याचा संदेश विरोधकांना दिला आहे.**




विशेष
पार्थ कपोले


देशात लोकसभा व विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकाचवेळी घेण्याचा मुद्दा पुन्हा एकदा केंद्रस्थानी आला आहे. त्यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीची नियुक्ती करण्यात आली होती. समितीने आपल्या शिफारसी सरकारकडे सादरही केल्या होत्या. त्यानंतर आता केंद्रीय मंत्रिमंडळाने या शिफारसी स्वीकारल्या आहेत. मात्र, इतक्या सहजतेने 'एक देश, एक निवडणूक' धोरणाची अंमलबजावणी होणार का, हा प्रश्न आहे. कारण, या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यघटनेत दुरुस्ती करावी लागेल, ज्यासाठी विरोधी पक्षांचाही पाठिंबा लागेल. मोदी सरकारच्या तिसर्या कार्यकाळात भाजपकडे एकट्याचे बहुमत नाही, तर भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे अर्थात रालोआचे सरकार आहे. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही याची पूर्ण कल्पना आहे. म्हणूनच विविध राजकीय पक्षांचे तीन मंत्री समन्वयासाठी तैनात करण्यात आले आहेत.

माहितीनुसार, संसदेच्या हिवाळी अधिवेशनात दुरुस्त्या मांडल्या जाऊ शकतात. गृहमंत्री अमित शाह यांनी मंगळवारी मोदी सरकारच्या सध्याच्या कार्यकाळात हे पाऊल अमलात आणण्याच्या सरकारच्या इच्छेचा पुनरुच्चार केला होता. मात्र, संसदेत पुरेसे संख्याबळ नसताना मोदी सरकार हा मुद्दा एवढ्या तातडीने ऐरणीवर आणेल, याची अनेकांना कल्पना नव्हती. देशातील प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेस याला सरकारची मनमानी म्हणत आहे, त्याचवेळी काही विरोधी पक्षदेखील एकत्रित निवडणुका व्यावहारिक नसल्याचे मत मांडत आहेत. इया वर्षाच्या प्रारंभी, ४७ राजकीय पक्षांनी एकाचवेळी निवडणुका घेण्याबाबत कोविंद समितीसोबत आपली मते मांडली होती.

त्यांपैकी ३२ पक्षांनी या कल्पनेला पाठिंबा दिला, तर १५ पक्षांनी विरोध दर्शविला. रालोआचा मित्रपक्ष तेलुगू देसम पक्षाने त्याला तत्वतः पाठिंबा दिला आहे. समितीसमोर या निर्णयाला पाठिंबा देणारे सर्व ३२ पक्ष एकतर भाजपचे मित्र होते किंवा पक्षाशी मैत्री ठेवणारे होते. मात्र, बीजेडीने भाजपला सोडचिठ्ठी दिली आहे. समितीसमोर या निर्णयाला विरोध करणार्या १५ पक्षांपैकी पाच काँग्रेससह रालोआबाहेरील आहेत. महत्त्वाचे म्हणजे, समाजवादी पक्षाने सर्वपक्षीय बैठकीची मागणी करून आपला मित्रपक्ष काँग्रेसने केलेल्या विरोधाला काट दिली आहेत. बसपाने या कल्पनेला पाठिंबा दिला आणि पूर्वीचा विरोध मागे घेतला आहे.

कोविंद समितीने आपल्या शिफारसींमध्ये दोन टप्पे सांगितले आहेत. पहिला टप्पा, ज्यामध्ये लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेणे समाविष्ट आहे. यासाठी घटनादुरुस्तीची आवश्यकता असेल, ज्याला संसदेच्या दोन्ही सभागृहांत दोन-तृतीयांश बहुमताने मंजुरी मिळणे आवश्यक आहे.

दुसरा टप्पा-सार्वत्रिक निवडणुकांच्या १०० दिवसांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेणे. याची अंमलबजावणी करण्यासाठी दुसरी घटनादुरुस्ती करावी लागेल. यासाठी किमान निम्म्या राज्यांकडून मंजुरी घ्यावी लागेल. यासोबतच सर्व मतदारांची यादी तयार करण्यासाठी बहुतांश राज्यांच्या विधानसभांची संमतीही घ्यावी लागणार आहे.

घटनादुरुस्ती करण्याच्या पद्धतीबाबत, 'कलम ३६८ (२)' मध्ये असे म्हटले आहे की, या घटनेतील दुरुस्तीची सुरुवात केवळ संसदेच्या कोणत्याही सभागृहात त्या हेतूसाठी विधेयक सादर करून आणि जेव्हा विधेयक प्रत्येक सभागृहाने मंजूर केले असेल, तेव्हाच केली जाऊ शकते. जर ते त्या सभागृहाच्या एकूण सदस्यसंख्येच्या बहुमताने आणि त्या सभागृहात उपस्थित असलेल्या आणि मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी कमीतकमी दोन-तृतीयांश सदस्यांच्या बहुमताने मंजूर झाले, तर ते राष्ट्रपतींसमोर सादर केले जाईल, जे विधेयकाला आपली संमती देतील. त्यानुसार विधेयकातील तरतुदींनुसार घटनादुरुस्ती केली जाईल. लोकसभेत कोणतीही घटनादुरुस्ती मंजूर करण्यासाठी दोन तृतीयांश बहुमत आवश्यक आहे. म्हणजे उपस्थित असलेल्या दोन तृतीयांश सदस्यांचा पाठिंबा आणि मतदान आवश्यक आहे. जर सर्व ५४३ खासदार उपस्थित असतील, तर ३६२ खासदारांचा पाठिंबा आवश्यक आहे.

सध्या विरोधी आघाडी 'इंडिया'चे २३४ खासदार आहेत. घटनादुरुस्तीसाठी साध्या बहुमतासोबत विशेष बहुमतही आवश्यक आहे. म्हणजे ही घटनादुरुस्ती मंजूर करण्यासाठी सत्ताधारी पक्षालाही विरोधकांच्या पाठिंब्याची गरज भासणार आहे. दुसरीकडे रालोआचे राज्यसभेत ११३ खासदार असून सहा नामनिर्देशित सदस्यांनी त्यांना पाठिंबा दिला आहे. 'इंडिया' आघाडीचे ८५ खासदार आहेत. जर सर्व खासदार मतदानासाठी आले, तर दोन तृतीयांश बहुमतासाठी १६४ मतांची आवश्यकता असेल.

काही घटनात्मक बदलांना राज्य विधानसभांची मंजुरीदेखील आवश्यक आहे.त्यामुळे सत्ताधारी भाजपला संसदेतील 'फ्लोअर मॅनेजमेंट'सह देशातील प्रत्येक राजकीय पक्षासोबत विशेष संवाद साधावा लागणार आहे. कारण, राज्य विधानसभांचा पाठिंबा हवा असल्यास प्रादेशिक पक्षांनाही याचे महत्त्व पटवून देणे आवश्यक आहे.

आवश्यक सहमती निर्माण करण्याचा एक मार्ग म्हणजे दुरुस्ती विधेयके संसदीय समितीकडे पाठवणे, जसे की स्थायी समिती किंवा संयुक्त संसदीय समिती. या समित्यांमध्ये विरोधी सदस्यांचा समावेश केला जातो आणि तेथे चर्चेतून एकमत होऊ शकते. केंद्राला राज्यांनाही सहभागी करून घ्यावे लागेल. स्थानिक स्वराज्य संस्थांना एकाचवेळी निवडणूक योजनेचा भाग बनवण्यासाठी किमान निम्म्या राज्यांना आवश्यक घटनादुरुस्ती मंजूर करावी लागेल.

भाजपची सध्या डझनहून अधिक राज्ये असली तरी हरियाणा, महाराष्ट्र आणि झारखंडमधील आगामी विधानसभा निवडणुका राजकीय समतोल बदलू शकतात. तरीही संपूर्ण देशात एकाचवेळी निवडणुका घेणे सोपे नाही. लोकसभेच्या निवडणुका यावर्षी मे-जूनमध्ये झाल्या होत्या, तर ओडिशा, आंध्र प्रदेश, सिक्कीम आणि अरुणाचल प्रदेश या राज्यांमध्ये लोकसभा निवडणुकांसोबत विधानसभा निवडणुका झाल्या होत्या. जम्मू-काश्मीर आणि हरियाणामध्ये विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया सुरू आहे, तर महाराष्ट्र आणि झारखंडमध्येही या वर्षाच्या अखेरीस निवडणुका होणार आहेत. २०२५ मध्ये ज्या राज्यांमध्ये निवडणुका होणार आहेत, त्यात दिल्ली आणि बिहारचा समावेश आहे. आसाम, केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल आणि पुदुच्चेरी येथील विद्यमान विधानसभांचा कार्यकाळ २०२६ साली संपणार आहे, तर गोवा, गुजरात, मणिपूर, पंजाब, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड विधानसभांचा कार्यकाळ २०२७ साली संपणार आहे. हिमाचल प्रदेश, मेघालय, नागालँड, त्रिपुरा आणि तेलंगण या राज्यांच्या विधानसभांचा कार्यकाळ २०२८ मध्ये संपणार आहे. यावर्षी झालेल्या लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांचा कार्यकाळ २०२९ मध्ये संपणार आहे. त्यामुळे हा विषय अतिशय काळजीपूर्वक हाताळावा लागणार आहे. मोदी सरकारनेदेखील या मुद्द्यावर सर्वसहमती निर्माण करण्यासाठी कंबर कसली आहे. त्यासाठी मोदी सरकारमधील ज्येष्ठ आणि अनुभवी मंत्री राजनाथ सिंह यांच्यावर प्रमुख जबाबदारी सोपविल्याचे समजते.

संरक्षणमंत्री राजनाथ यांचा राजकीय अनुभव वादातीत आहे. देशातील सर्व राजकीय पक्षांसोबत ते अतिशय सहजपणे संवाद साधू शकतात, हे वेळोवेळी स्पष्ट झाले आहे. काही दिवसांपूर्वीच द्रमुकचे सर्वेसर्वा आणि तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टालिन हे राजनाथ सिंह यांच्यासोबत एकाच व्यासपीठावर ज्या सहजतेने वावरत होते, ते पाहता राजनाथ सिंह यांच्यावर एकत्रित निवडणुकांविषयीची जबाबदारी का सोपविली असेल; याचा अंदाज येतो. त्यांच्यासह केंद्रीय मंत्री अर्जुन राम मेघवाल आणि किरेन रिजिजू यांच्याकडेही विविध राजकीय पक्षांसोबत चर्चा करण्याची जबाबदारी दिल्याचे सूत्रांनी सांगितले आहे. त्यामुळे 'चर्चा-वाद-संवाद' या फॉर्म्युलावर मोदी सरकार काम करणार असल्याचे सध्या तरी दिसत आहे.